

# झपाटलेल्या माणसांच्या देशात

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू. प्रवास
क्र. ७५८

बाळ गाडगीळ

REFBK-0027237

संदर्भ
श्री-प्रकाश
६५८
२६२३६
१।१।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
श्री-प्रकाश
दा. क्र. ६५८
२६२३६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# झपाटलेल्या माणसांच्या देशात

बाळ गाडगीळ

REFBK-0027237

श्री:

गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे

■

ISBN-81-9000073-19-6

■

श्री २०/ ऑगस्ट १९९३

■

प्रकाशक / मुद्रक

सौ प्राची प्रदीप चिकटे
गोकुळ मासिक प्रकाशनाकरिता
११९४, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी ४४२०५५ / ३३२३६१

■

© बाळ गाडगीळ

■

आवृत्ती पहिली / शके १९१५, सन १९९३

■

अक्षरजुळणी
ला प्रिंट

■

मुद्रण स्थळ
श्रीपाद ऑफसेट
नवी पेठ, पुणे

■

मूल्य रु चाळीस

*With warm regards to Dr Kim Duk Su*

*former*

*Vice Chancellor of JUCHE University*

*who invited us to North Korea*

*and the Korean Academy of Social Scientists,*

*We enjoyed every moment of our stay in the D P R K*

*Prin. P L Gadgil*

*and colleogues*

# १९८८ - १९९३,
# रशिया : उत्तर कोरिया
# एक चिंतन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५९
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

प्रा बाळासाहेब गाडगीळ यानी मला त्याच्या कोरियावरच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहायला सागितले तेव्हा मी थोडासा चक्रावून गेलो कालिदासाच्या भाषेत हा आपल्या आवाक्याबाहेरच्या उच्च ठिकाणी पोचण्याचा 'उद्बाहुरिव वामना'चा प्रयत्न म्हणता येईल ग.दि.मा च्या भाषेत ही 'ज्योतीने तेजाची आरती' करण्यासारखे आहे माझ्या लेखनाचे स्वरूप 'प्रस्तावनेचे' नसावे, तर एक प्रकारे माझे प्रकट चितन असावे, हे देखील त्यानीच मला सागितले म्हणजे रशिया व कोरिया याच्या भेटीने आणि त्यानतरच्या १९८८ ते ९३ पर्यंतच्या काळात झालेल्या घटना, त्याचप्रमाणे कम्युनिझम व कॅपिटॅलिझम नियंत्रित बाजारपेठ आणि मुक्त बाजारपेठ हे सध्याचे महत्त्वाचे प्रश्न यावर देखील, माझे मत म्हणण्यापेक्षा काही प्रश्न आणि विचार सागावेत असे त्याचे मत होते म्हणून मी कित्येक ठिकाणी 'मी', 'मला' असे शब्द वापरले आहेत त्याबद्दल मला वाचकानी माफ करावे कोणत्याही प्रश्नावर सर्वांच्या किंवा एखाद्या गटाच्या

बाजूने मी लिहिलेले नाही

त्याचप्रमाणे त्या वेळच्या सवेदना आज कशा वाटतात त्या लिहिण्याच्या ओघात तुटकपणा जाणवणे अपरिहार्य आहे. त्याचे सुसूत्र वर्णन करून एखादा निबध लिहिणे हाही या लेखनाच्चा उद्देश नाही या अर्थाने वाचकाशी सवाद साधावा एवढाच या लेखाचा उद्देश आहे.

प्रा बाळासाहेब गाडगीळ याच्या शिफारसीवरून व निवडीमुळे मी १९८८ च्या मे मध्ये किलउन सो , याच्या निमत्रणाचा स्वीकार करून सहा प्राध्यापक मडळीच्या जध्यासह प्रथम रशिया मग उत्तर कोरिया आणि परत पेकिंगमार्गे रशिया - भारत असा प्रवास केला

## किंचितशी तयारी

दौरा करायचा ठरल्यावर सहज म्हणून मी काही गोष्टी केल्या त्या म्हणजे रशियन लिपी आणि बोली भाषेतील बलशोये स्पसीब (Thank you), दस्वीदानिया - By-bye, दोबरे द्येन Good day - अशी काही वाक्ये मराठी लिपीत लिहून ठेवली

उत्तर कोरियाविषयी माहिती आपल्याकडे इतकी कमी होती की लिपी, भाषा जाणणारे कोणीच मला भेटले नाही पण केवळ एक प्रयत्न म्हणून भगवान रजनीशाच्या आश्रमात गेलो आणि चौकशी केली तेव्हा अमेरिकेत स्थायिक झालेल्या पण उत्तर दक्षिण कोरियातल्या एक बाई भेटल्या त्याच्याशी दोन तीन वेळा गप्पा झाल्या त्यानी मोठे सहकार्य दिले, एवढेच नव्हे तर त्यानी जवळ जवळ एक भाषणच (कोरियन भाषेत) लिहून दिले अशा प्रकारे समाज विज्ञान सशोधकाच्या प्रतिनिधींचे नेतृत्व करायचे म्हणजे एवढा खटाटोप करणे क्रमप्राप्त होते

## मुंबई - मॉस्को - ३० एप्रिल

परदेशी प्रवासाची नवलाई नव्हती पण साम्यवादाच्या गगोत्रीबद्दल विलक्षण उत्सुकता होती प्रा गाडगीळाच्या पुस्तकात याचे सुरेख वर्णन आले आहे आम्ही ३०-४-८८ ला मुबई - मॉस्कोमार्गे प्रवास केला आणि मॉस्कोला जवळ जवळ ३ ते ४ तास उशिरा पोचलो भाषेची अडचण, आणि आमच्यासाठी विमानतळावर येणारा मनुष्य येऊन वाट पाहून निघून गेला त्यामुळे पुन्हा त्याला कोरियन दूतावासातून बोलावणे करण्यात वेळ गेला कस्टममध्ये त्रास झाला

नाही रात्री जरा उशिराच आम्ही दूतावासाच्या विश्रामगृहात पोचलो याच प्रसगाने या गोष्टीचा उल्लेख निराळ्या पद्धतीने मला माडावासा वाटतो

## हुकुमशहांच्या युक्त्या

टेलिफोन करणे रशियात किती कठीण हे सागताना दळणवळणाच्या साधनाचाच उपयोग दळणवळणावर किती साध्या युक्तीने नियत्रण ठेवण्यासाठी होऊ शकतो याचे मला आश्चर्य वाटले म्हणजे टेलिफोन दिले तरी जर टेलिफोन डिरेक्टरी दिली नाही तर बहुताशी गप्पा मारण्यासाठी टेलिफोन कमी वापरले जातील व आवश्यक त्या टेलिफोनवरील सभाषण 'टॅप' करणे कठीण जाणार नाही म्हणजे थोड्याशा प्रशासकीय चतुराईने दूरध्वनीच्या जाळ्याचा उपयोग भाषण स्वातत्र्य सकुचित करण्यासाठीदेखील करता येईल यातही काही गट किंवा माणसानी काही पळवाटा काढल्याच असणार हुकूमशहाच्या देशात सुविधा आहेत पण राजकारणी मडळींनी त्याची उपलब्धी मर्यादित केली आहे

## कामगार दिन

१ मेच्या १९८८ सोहळ्याचे दृश्य मी टी व्ही वर व प्रत्यक्षात पाहिले माझ्या मनात रशियाविषयी विलक्षण आत्मीयता आहे त्या मे दिनाच्या मिरवणुकीचे स्वरूप फार आनदाचे आणि बऱ्याच लहान-मोठ्या मडळीच्या सामूहिक सहभागाचे होते गोर्बाचेव्ह एखाद्या कुटुबवत्सल माणसासारखा आला-मानवदना किवा - भेट किंवा दर्शन द्यावे तशातला प्रकार होता युद्धसाहित्याच्या प्रदर्शनावर भर कमी झालेला होता स्टालिनच्या वेळचे समाज आणि सत्ता यात दिसणारे अतर बरेच कमी झाल्याच्या खुणा होत्या

## प्रश्नांचे विश्वरूपदर्शन

मी हे लेखन १९९३ च्या मेमध्ये करतो आहे आणि उत्तर कोरियाच्या बाबतीत देखील काही प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर आता उपस्थित होताहेत त्यावर थोडेसे भाष्य करणे अनुचित ठरणार नाही सत्तर वर्षाच्या साम्यवादी सत्ता वर्ष दीड वर्षाच्या काळात धरणीकप व्हावा एवढ्या वेगाने नामशेष झाल्या म्हणजे पहिले खरे होते की आताचे खरे आहे याबद्दल भ्रम निर्माण होतो 'किम् कर्म, किम् अकर्मेति कवयोप्यत्र मोहिता ' या गीतेतल्या वचनाची आठवण होते सामाजिक कणवेतून, उदात्त तत्त्वाच्या आदर्शातून आणि विलक्षण त्यागातून निर्माण झालेला साम्यवाद या सकल्पनेत खरोखरीच शाश्वत काही नव्हते का ?

## तेथे कर माझे जुळती

मॉस्कोमधील मेट्रोतळ, प्रवास, सामान्य माणसाचे आतिथ्य, भारतीय दूतावासातील विचार विनिमय यासबधी कोरियाच्या वाटेवर या प्रकरणात उल्लेख आला असल्याने मी फार लिहीत नाही पण पुष्किन म्युझियमचे वर्णन ''रशियाचे हृदय (पान ११)'' कितीही केले तरी अपुरेच ठरेल लालचौकातला फेरफटका आणि लेनिन-मार्क्स-एजल्स-स्टालिन याच्या समाध्यासमोर नतमस्तक होताना मला गलबलून आले मानवाच्या इतिहासावर ज्यानी क्रातिकारक परिणाम केला ''तेथे कर माझे जुळती'' हे म्हणताना मला नाही कमीपणा वाटला

## सामान्यांचे आयुष्य

अगदी स्टालिनच्या काळातल्या रशियन देहाती कथाचे एक पुस्तक ''ताबड्या आयाळीचा सिह आणि इतर कथा'' मी वाचले होते त्यात आपला नवरा दारू पिऊन येतो पण ते बाहेरच्या लोकाना फार लक्षात येऊ नये म्हणून काळजी घेणाऱ्या एका वयस्क बाईचे चित्रण केले आहे 'जगभर मातीच्याच चुली' या अर्थाने हे वर्णन इतके बोलके आहे, की कुठल्याही देशात असे दृश्य दिसू शकेल सामान्य माणसाच्या आयुष्यातली सुखदुःखे जगभर सारखीच आहेत मग रशियात जेवणखाण, काम, आरोग्य, स्वच्छता हे सर्व पुरविणाऱ्या, उत्तम प्रशासन देणाऱ्या हुकूमशाही राजवटीवर हे वाईट आणि हे चागले, हे मत कोणी व कसे द्यायचे ? सामान्य माणसाच्या दृष्टीने लोकशाही किंवा हुकूमशाही हा रोजच्या आयुष्याच्या दृष्टीने निरुपयोगी प्रश्न आहे त्यामुळे निव्वळ सैद्धातिक चर्चा करून यावर मत देणे कितपत बरोबर होईल ? आज येलत्सिन करतो आहे ती लोकशाही आहे का ? खुल्या बाजाराचे अर्थशास्त्र म्हणजे ७५० टक्के महागाई वाढ का ?

## रुबल - डॉलर दराचे कोडे

हॉटेल रशियामध्ये आम्ही चहाला गेलो तेव्हा डॉलरला १० रुबल्स एवढा अनधिकृत दर होता आणि सरकारी दर होता $\frac{७९}{१००}$ रुबल = एक डॉलर ही विसगती एवढी अनाकलनीय होती, की याच्यावर अभ्यास करणे आणि मत देणे आवश्यक आहे

उत्तर कोरियातील दौऱ्यात आलेल्या अनुभवावरून हे प्रश्न आणखी टोकदार झाले म्हणून हे एवढे लिहितो आहे

## साम्यवादात भावना मोजतात का ?

श्री व्ही पी सिंग याच्याबरोबर व नतर श्री मधू दडवते याच्याबरोबर झालेल्या पत्रव्यवहारात अर्थव्यवहारातील जनतेचा सहभाग हा मुद्दा मी माडला होता श्री गोर्बाचोव्ह याना लिहिलेल्या पत्रात "वर्कर्स ऑफ द वर्ल्ड युनाइट" या सामाजिक विघटनाच्या घोषणे ऐवजी " पेरेंटस् ऑफ द वर्ल्ड युनाइट" अशी कल्पना मी लिहिली होती म्हणजेच त्या वेळच्या साम्यवादी तत्त्वज्ञानात शिक्षणाच्या मार्गातून विकास असे काही माध्यम दिल्याशिवाय नुसत्या आर्थिक प्रश्नाच्यावर अवलबून राहून पर्यायी रचना समोर ठेवता येणे कठीण आहे असे मला वाटले

## कुटुंब - एक अर्थातीत संस्था

मिखाइल गोर्बाचेव्ह हे शाळेत असताना त्याच्या आईला त्याच्या वडिलानी जर्मनीविरुद्धच्या लढाईत, आघाडीवरून पाठविलेले पत्र आहे त्यात उल्लेख आहे की "मिशाला शाळेत पाठविण्यात हयगय करू नकोस त्याला चागले बूट घेऊन दे" अत्यत कठीण परिस्थितीत देखील कुटुबसस्था आयुष्याला अर्थ देऊन जाते ह्याचा विचार साम्यवाद काय किंवा भाडवलशाही काय कुठेही रुपये आण्यात करता येत नाही समाजवाद किंवा भाडवलवाद यात आर्थिक प्रेरणाचा अतिव्याप्त विचार आहे माणसाच्या आयुष्यात अर्थव्यवहारापलिकडे काही आहे हे मानल्याशिवाय नवीन जगाचा रचनाआराखडा आधारहीन बाधकामासारखा होईल असे नाही का वाटत ?

## सामान्यांचे सुखी जीवन (?)

८८ मध्ये मी पाहिलेला रशिया हे एक मोठे कुटुब होते टेलिव्हिजनवरच्या बातम्या बघायला गमत वाटायची मस्कवा नदीच्या पात्रातून एक फेरफटका मारला क्रुशेव्ह जेथे सत्ताहीन अवस्थेत रहात होता ती नजरबदीची जागा लाबून बघितली मस्कवा विद्यापीठाच्या इमारतीत सहज गप्पा मारता प्रवेश मिळाला सगळ्या ठिकाणी नियमाची चाकोरी कडक होती तसेच थोड्या परिचयानेदेखील सोयी करण्याची सवलत होती इच्छा होती एक सरदारजी विद्यार्थी विद्यापीठाच्या हॉस्टेलमध्येच भेटला खोल्या किंवा हॉल्स अमेरिकन विद्यापीठाएवढे सपन्न किंवा प्रशस्त नव्हते पण वैज्ञानिकाचा दर्जा अर्थातच निश्चित कमी नसावा साहित्य, कला, नृत्य, खेळ, ऑलिंपिक स्पर्धा साऱ्या क्षेत्रात कसून प्रयत्न करणारी आणि जागतिक यश सपादन करणारी मडळी होती

Towards a Better World नावाचे गोर्बाचेव्हचे पुस्तकदेखील वाचनीय आणि अर्थवाही होते व्यासंगी आणि विचारवंतानादेखील सामाजिक प्रतिष्ठा असावीसे दिसले

## उत्तर कोरिया

मॉस्को ते प्यॉंगयांग हा प्रवास तसा कंटाळवाणा पण आमच्या बरोबरच्या प्रा आबेकर, डॉ अशोक जोशी, डॉ सौ शीला पटवर्धन, प्रा सौ नीला कर्णिक, प्रा अकिल पूनावाला यांच्या सहवासाने सह्य झाला दुसऱ्या दिवशी सकाळी प्यॉंगयांग विमानतळावर उतरल्याबरोबर स्वागतोपचार झाले परिचय, भाषणे, उत्तरे, परस्पर प्रशंसा झाल्यावर अलिशान गाड्यातून आमच्या निवासस्थानावर आलो या साऱ्यात केवळ औपचारिक भाग होता असे मला जाणवले नाही नेहमीचे झाले तरी प्रसंग भावनाप्रधान होत नाहीत हे तरी कशावरून ? देवाचे नाव पुन:पुन्हा न घेतल्याने भक्तिहीन म्हणायलाच पाहिजे का ? रस्त्यात भेटलेल्या माणसांना पाहूनसुद्धा आनंद होतो ना ! काही हजार किलोमीटरचा प्रवास करून आम्ही तिथे गेलो तर त्यांना आणि आम्हाला आनंद झाला असे मानण्यास हरकत नसावी

## बौद्धिक वर्ग

आम्ही ज्या ज्यूच्ये 'वेदपाठशाळेच्या' विश्रामधामात उतरलो होतो तेथे व्यवस्था उत्कृष्ट होती कोरियन - इंग्रजी दुभाषे म्हणून काम करणारे किमचांग ह्युआन व किमयांग युल हे तरुण कार्यकर्ते तळमळीने प्रत्येक गोष्टीत प्रश्न आणि उत्तरे समजावून देत होते ही ज्यूच्ये वेदपाठशाळा च्योंगबांग म्यांगनगे विभागात होती जेवणाच्या व्यवस्थेसाठी किमयंग हुआी व इतर मैत्रिणी आदरातिथ्य करीत होत्या आणि सकाळी ९ ते १२ व २॥ ते ५॥ असे भरगच्च बौद्धिकाचे कार्यक्रम होते व शनिवार, रविवार किंवा इतर काही दिवशी प्रेक्षणीय स्थळे, प्रदर्शने, भेटी गाठी, म्यॉंगटानडे पर्वतावर सहल फार देखणा उत्साहवर्धक पण थोडासा श्रमाचा कार्यक्रम पण त्यात होता शेजारी टेनिस कोर्ट होते सगळ्याच अर्थाने कार्यक्रम सुखावह झाले

## व्यक्तिपूजा - मूर्तिपूजा

प्रेक्षणीय स्थळामध्ये उत्तर कोरियातील लोकसभेची इमारत पाहण्याजोगी होती बहुतेक ठिकाणी 'ग्रेट लीडर' किम उल सुंग यांचे खूप भव्य पुतळे होते आपल्याकडे महात्मा गांधींचे पुतळे दिसतात, रशियात लेनिन-स्टालिनचे पुतळे

होते याचे काय गमक असावे ? बहुधा प्रतिमापूजन किंवा मूर्ति पूजा हा एक मानवी स्वभावाचा स्थायी भाव असावा म्हणजे लोकाना एकत्र येण्यासाठी नुसत्या सकल्पना पुरेशा नसतात याचाच एक व्यत्यास म्हणजे राग आला तर मूर्तिभजन साहजिकच होते का ?

## कल्याणकारी योजनांना भेट

ज्यूच्ये वेदपाठशाळेत फार परिश्रमपूर्वक आमची बौद्धिके घेतली जात होती सर्व प्राध्यापक मडळी बोलण्यात हार न जाणारी पण ज्या कळकळीने दुभाषे आमच्या प्रश्नोत्तरात भाग घेत होते त्यावरून त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल दुमत होण्यासारखे नव्हते एक बालभवनाच्या भेटीचा प्रसग आठवतो लहान मुलाच्यासाठी एवढ्या प्रचड प्रमाणावर सुविधा होत्या की मन थक्क होते. सार्वजनिक खर्च करण्याचे अग्रक्रम तपासायचे ठरले तर उत्तर कोरियाच्या सरकारला फार गुण द्यावे लागतील आरोग्यसेवा, स्वच्छता, आदब ही वरवरची नव्हती नुसते हस्ताक्षर सुधारण्याचे वर्ग होते तर लहान मुलानी देवनागरीत "स्वागतम्" ही अक्षरे सुदर लिहून दाखविली ज्या राष्ट्राला इतिहास नाही त्याना भविष्य नाही असे म्हणतात "ग्रँड पीपल्स स्टडी हाउस", "कोरियन रेव्होल्यूशन म्युझियम", "मुलासाठी राजवाडा" या सर्वांच्या भव्यदिव्य वर्णनावर मुळी एक प्रकरणच आहे व त्यानतर "किमयाघर आणि प्रकाशाची झाडे" या प्रकरणात देखील फार देखणे वर्णन आले आहे हे खरे असले तरी अमेरिकेविरुद्धच्या स्वातत्र्य लढ्याची चित्रे, दस्तऐवज दृष्ट लागेल असे माडून ठेवले आहेत विद्यार्थ्यांच्या सहली इथे येतात कुठे तरी मने घडवली जातात

## सामूहिक शेती

सामूहिक शेतीवर गेलो तेव्हा माणसे भाताची रोपणी करत होती भाताचा हगाम आला की सर्वांनाच शेतात काम करावे लागते असे दिसले सहकारी शेती हा फार धोक्याचा खेळ आहे शेवटी यश आणि अपयश हे प्रामाणिक कष्टाशिवाय दुसऱ्या कशावरही अवलबून नाही प्रशासनात कागदी घोडे नाचवून भाताचे उत्पन्न वाढवून एखादा प्रयोग यशस्वी किंवा अयशस्वी करणे अशक्य नाही त्यात काही निर्णय देणे फार चुकीचे होईल पण सहकारी शेतीत थोडेसे तथ्य असले पाहिजे भाडवलशाही, साम्यवाद, सहकाराचे तत्त्वज्ञान यात वादापेक्षा कृतीचे आणि सकल्पनेपेक्षा अम्मलबजावणीचे महत्त्व जास्त आहे असे दिसते

## पोटपाण्याची तरतूद

जेवण अधिक सोयीचे व्हावे म्हणून बऱ्याच जणानी लोणची- लाडू वगैरे पदार्थ आणले होते खाण्याचे तेल निराळे, गहू कमीच प्रा आबेकराना तेल व मीठ कमी लागायचे म्हणून ते भाज्या पाण्याने धुवून घेत मास व मासे फारसे सुखावह नव्हते म्हणून एक दिवस बाजारात जाऊन आम्हीच तादूळ, गव्हाचे पीठ- आटा- भाज्या आणल्या आणि त्याच्याच स्वयपाकघरात साग्रसगीत जेवण पकवले मला पोळ्या करताना पाहून आमचे सहकारी प्राध्यापक तर पहातच राहिले आमच्या बरोबरच्या तीनही प्राध्यापिका स्वयपाकातदेखील चागल्याच् तरबेज असाव्यात असे अनुभवास आले

## सेवकवर्गाचे आर्जव

त्यातही आनदाची गोष्ट अशी की आमचे दुभाषे हॉटेलातील सेविका वगैरे सर्वानी आम्ही स्वयपाकाचे काय करतो हे शिकून घेतले आणि त्याप्रमाणे पुढील काही दिवस तसे करून घालण्याचा यशस्वी प्रयत्न केला ३० वर्षापूर्वी फ्रान्समध्ये पिण्याचे पाणी फारसे लोकप्रिय नाही असा मला अनुभव आला होता त्यावेळी विद्यापीठातील जेवणगृहातदेखील जेवणाच्या इतर थालीबरोबर ताबड्या किंवा पाढऱ्या वाईनच्या बाटल्या घेण्याचा प्रघात होता पण आपल्याकडे पाण्याशिवाय जेवण पुरेसे होत नाही त्यामुळे बहुतेक वेळा आम्ही पाणी मागायचो तो थोडासा विनोदी प्रकारच समजला जायचा सहलीला एका रात्री आम्ही ज्या हॉटेल मध्ये उतरलो होतो तेथे सापाची दारू असा प्रकार दिसला फिलीपाईन्स किंवा तैवानमध्ये माकडे मारून त्याचे मास दिले जाते हे अघोरीपणाचे समजायचे की 'रुचिभिन्नता' असे म्हणून सोडून द्यायचे ?

## चर्चेतील सहभाग

उत्तर कोरियातील जेवणे व चर्चासत्रे यात बोलताना आमच्या सहकारी मित्रानी भरपूर सवादचातुर्य दाखविले त्यात काही कमी नव्हते प्रा आबेकर राजकारणशास्त्राचे तज्ज्ञ होते डॉ अशोक जोशी व्ययचिकित्सा (Costing) आणि डावी विचारसरणी यामुळे कोठल्याही सवादात बाजू सभाळत होते सौ शीला पटवर्धन इतिहासाच्या दृष्टिकोनातून चर्चेत भाग घेत अकील पूनावाला कायदेशीर तरतुदींचा उहापोह करी श्रीमती सध्या देवरुखकर सास्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून कलाटणी देत प्रा नीला कर्णिक यानी तर इग्रजीत कविताच करून दिली म्हणजे मगलाष्टके करतात तशी नव्हे तर ज्यूच्ये

तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर !

## सहयोगासाठी योजना

शैक्षणिक दृष्टिकोनातून डॉ किम च्याग ह्यान याच्या बरोबर झालेल्या चर्चासत्रात उत्तर कोरिया आणि भारत यांच्यात कितीतरी गोष्टीत सहयोग करता येईल असे मी सुचविले सगणकाद्वारे भाषा, कोरियन इंग्लिश शिकण्याचा प्रयत्न, उत्तर-दक्षिण कोरियाची फाळणी रद्द व्हावी यासाठी चाललेले प्रयत्न, ज्यूच्ये तत्वज्ञानाचा प्रसार असे विषय होते

प्रभावी शोकान्तिका - स्वत किम इल सुग यानी लिहिलेल्या Flower Girl या नावाच्या नाटकाचा एक अपूर्व प्रयोग आम्हाला दाखविण्यात आला वर्षानुवर्षे किवा पिढ्यान्पिढ्या छळणाऱ्या पुरुष बायकासकट व्यक्तींना सावकारी पाशाची ही कथा आणि त्यानतर त्यातून लढाऊ वृत्तीने क्रान्ती करणाऱ्या एका फूलवालीची ही कथा आहे मानवी दैन्याची ही कारुण्यपूर्ण गाथा आहे तेथील हजार प्रेक्षकाच्या मध्ये ज्याच्या डोळ्यातून पाणी आले नसेल असा एकही प्रेक्षक सापडला नसता केवळ भावनावेगाने भारावलेल्या मन स्थितीत आम्ही बाहेर आलो

## परस्परविरोधी अनुभव

पुन्हा एकदा या दोन्ही जीवनपद्धतीत काय योग्य आणि काय अयोग्य हा प्रश्न मनाला पिडायला लागला अमेरिकेतले माफिया गुडगिरीतून, दहशतवादातून हत्ते जमा करून श्रीमत झाले युरोपच्या आर्थिक मदतीसाठी काढलेल्या बँकेने अगोदरच ६० टक्के भाग इमारती, आलिशान सोयी यावर खर्च केले आणि कर्ज द्यायला अजून सुरुवातदेखील होते आहे न होते आहे ही देखील मुक्त अर्थव्यवस्थेतील वस्तुस्थिती नव्हे का ? म्हणजे कुपणानेच शेत खाणे हा कुठल्याही व्यवस्थेच्या अध पतनाचा नैसर्गिक धर्म दिसतो भारतात १२ लाख कोटी रुपयाचे शेअर्सचे चुकीचे व्यवहार झाले आणि जबाबदार कोणी नाही ? Systems failure (प्रशासनातील चुका) या नावाखाली काहीही खपून जाणार का ?

## शब्दांची हेराफेरी

ही अशी Systems failure या शब्दाची कसरत करून लोकाच्या शोषणाचे दु ख कमी होते का ? Flower Girl चे सावकारी शोषणाविरुद्धचे

लढे निरर्थक होते ? रशियासारख्या देशाचे विघटन झाले, आर्थिक सत्तेचे सतुलन नाहीसे झाले आणि अमेरिका साऱ्या जगाला वेठीला धरणार का ? उत्तर कोरियात आणखी एका विषयाचा प्रत्यय १९८८ मध्ये आला

## फाळणीची वाहणारी जखम

३८ व्या समातर रेषेवर जेथे उत्तर-दक्षिण कोरियाची फाळणी झाली ती जागा आर्वजून पाहायला आम्हाला नेण्यात आले 'पॅन मुन जॉम' हे गाव

छोट्या बगली किंवा बॅरक्स असलेली ही जागा आणि त्याच्यातील प्रत्यक्ष रेषेच्या दोनही बाजूला टेबल-खुर्च्या टाकून बैठकी घेण्यात आल्या त्याच्यापासून थोड्याच अतरावर लष्करी शिपायाचा कडा पहारा आहे आम्ही उत्तर कोरियाच्या बाजूने पाहात असल्याने दुसऱ्या बाजूच्या इमारतीतून अमेरिकन प्रवासी हेच दृष्य पहात होते आमच्या बाजूच्या इमारतीत त्याचा इतिहास, फाळणीची कारणमीमासा, युद्धातील हानी, साऱ्याची रेखीव व व्यवस्थित माहिती लिहिली होती जनरल करिअप्पा याच्या नेतृत्वाखालील दलाने ही युद्धबदी प्रत्यक्षात आणली यासबधीचे वर्णन पान ४१- 'अभग कोरियाचे स्वप्न' या बहारदार प्रकरणात आले आहे या प्रकरणाचा शेवटदेखील 'एक दिवस असा येईल की रुळावरचे ताराचे कुपण उखडले जाईल सीन्यूजहून पुसानला शीळ वाजवीत निघालेली आगगाडी दिमाखाने उत्तर कोरियातून दक्षिणदिग्विजयासाठी निघेल' या वाक्याने झाला आहे

आमच्या बरोबरच्या प्राध्यापक दुभाषे याना या गोष्टी सागताना देशाच्या फाळणीचे दु:ख जाणवत होते युद्धाच्या तयारीत असलेल्या तरुण जवानानी कराटे किंवा तत्सम प्रकारच्या शारीरिक क्षमतेची प्रात्यक्षिके दाखविली आणि हा युद्धसज्जतेचा युद्ध प्रकार नुसता नाटकाचा भाग नव्हे तर वस्तुस्थिती असल्याचे निदर्शनास आणले ही सारी चित्रे माझ्या नजरेसमोरून हलत नाहीत

## मनोहारी वेडे

''झपाटलेली माणसे'' या प्रकरणात (पान ४८) प्रा गाडगीळ यानी त्याना उत्तर कोरियात भेटलेल्या सगळ्याच माणसाविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत आयुष्यात सतत काहीतरी गाणे गाणारी ही माणसे आणि त्याना आनद देणारी स्वत:ला झपाटून घेण्याची ओढ या प्रातिनिधिक आणि पारदर्शी गुणाचा प्रत्यय मला देखील वारवार आला

## निरोप घेता

प्रत्यक्ष परतीच्या वाटेवर निघण्यापूर्वी पुन्हा काही भाषण, भोजन हे कार्यक्रम झाले पधरा-वीस दिवसात आम्ही कुठले, कोण, पण या सर्व माणसानी एवढे भावनाविवश होऊन आमचा निरोप घेतला की, सगळ्याचे डोळे पाणावले ''व्हेदर वुइ पार्ट टू मीट ऑर मीट टू पार्ट'' असे मी म्हटल्यावर भाषातर करणाऱ्या 'किम'ला देखील क्षणभर बोलता येईना ''वियोगार्थ मिलन होते, नेम हा जगाचा'' हे माहीत असले तरी उत्तर कोरियाच्या दौऱ्याच्या प्रसगात इतका दर्दभरा प्रसग येईल असे मला वाटले नव्हते

## ज्यूच्ये तत्त्वज्ञान १९९३

'ज्यूच्ये' तत्त्वज्ञानाचा अधिष्ठाता किम इल सुग म्हणजे 'ग्रेट लिडर' यानी एप्रिल १९९३ मध्ये त्याच्या ऐंशीव्या वाढदिवशी पत्रकाराना दिलेल्या मुलाखतीत काही सूचक वाक्ये किवा सदेश दिले आहेत त्यात कम्युनिस्ट तत्त्वज्ञानात आवश्यक होणारे बदल, रशियाच्या पाडावानतर अमेरिकेला मिळालेला वरचष्मा याबद्दल महत्त्वाची विधाने कली आहेत त्याच्या मते, अमेरिकेच्या हातात आलेल्या सत्तेमुळे अमेरिकनानी जगभर एकतत्री सत्ता गाजवायचा प्रयत्न केला तर तो खात्रीने फसेल शाततेसाठी याच सपत्तीचा विनियोग करता आला तर सगळ्यानाच तो फलदायी ठरेल रचनात्मक कार्य व त्याची चेतनाशक्ती ही केवळ जनतेचीच आहे मानवाच्या भवितव्याला तो स्वत च जबाबदार आहे हे 'ज्यूच्ये' तत्त्वज्ञानात पहिल्यापासून वारवार सागितले आहे

## शब्दवेडा आपला देश

भारतासाठी मला वाटते, या दोन्ही तत्त्वज्ञानाच्या मर्यादा आपल्याला मानाव्या लागतील रुपया परिवर्तनीय करायचा, जगातल्या बाजारपेठेत उतरायचे ह्या गोंडस नावाखाली सामाजिक परिवर्तनाला शाब्दिक वेष्टन देण्याचा हा फार फाटका तुटका प्रयत्न आहे श्रम, काही मूलभूत ध्येये आणि नैतिक आदर्शवाद याना सोडून विकासाचा मार्ग चोखाळता येणार नाही हा मार्ग कष्टप्रद आहे आणि केवळ विक्रीसाठी तो सुखवस्तू करता येणार नाही

**डॉ. मनोहर आपटे**

पुणे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| १ | कोरियाच्या वाटेवर | १७ |
| २ | रशियाचे हृदय | २३ |
| ३. | मॉस्को ते प्यनग | ३० |
| ४ | ग्रेट लीडर | ३७ |
| ५. | राजवाडा आणि दीपगृह | ४३ |
| ६ | किमयाघर आणि प्रकाशाची झाडे | ५० |
| ७ | अभग कोरियाचे स्वप्न | ५७ |
| ८ | मनोरा आणि ज्योत | ६४ |
| ९. | झपाटलेली माणसे | ७० |
| १० | किमचा कोरिया तेव्हा आणि आता | ७९ |
| | परिशिष्ट कोरियाचे नेते | |

# कोरियाच्या वाटेवर

को रियाचे दर्शन होण्याअगोदरच आमची कोरियन लोकांशी भेट झाली त्यात पहिल्यांदा भेटला तो म्हणजे कोरियन दूतावासातला सेकंड किंवा थर्ड सेक्रेटरी त्याचे नाव ली यॉंग पिन हा गृहस्थ देखणा, तरुण आणि चटपटीत होता विशेष म्हणजे त्याला इंग्रजी येत होते फार उत्तम नव्हे, पण जुजबी संभाषण करण्याइतपत नक्कीच त्यामानाने आणखी एक सेक्रेटरी त्याच्याबरोबर होता, त्याला इंग्रजी बिलकूल येत नव्हते त्यामुळे त्याच्या बरोबर संभाषण म्हणजे त्याच्याशी हस्तांदोलन करणे एवढ्यापुरतेच ते तो आवर्जून करीत असे

तर हा ली आम्हाला उतरवून घेण्यासाठी कोरियन दूतावासापासून सुमारे ४० किलोमीटर्स दूर असलेल्या 'मस्क्वा' विमानतळावर आला होता (मॉस्को असा उच्चार आपण करतो, पण मॉस्कोचा रशियन उच्चार 'मस्क्वा') ली आम्हाला भेटण्यासाठी आला होता यातली अपूर्वाई अशी की मध्यरात्रीच्या सुमाराला तो आला होता काही तरी सबब काढून त्याला उशिराही येता आले असते, पण तो अगदी वेळेवर आल्यामुळे आमची संभाव्य गैरसोय टळली दोन

आलिशान मार्सिडीज बेन्झ आम्हाला नेण्यासाठी आल्या होत्या आणि त्या चालवीत होते हे दोघे सेक्रेटरीज आमच्या अवजड बॅग्ज भराभरा उचलून गाडीत टाकायला या दोघानी बिलकूल सकोच केला नाही कोरियन दूतावासाची आठ मजली उच इमारत विमानतळाच्या अगदी विरुद्ध टोकाला आहे तिथल्या सातव्या मजल्यावर आम्ही आमच्या अवजारासह येऊन धडकलो मोठ्या प्रवासाचा शीण आणि अर्धवट झोप यात आम्ही असल्यामुळे आमचे सरकारी पाहुण्याच्या थाटात स्वागत झाले हे आमच्या लक्षातही आले नाही मस्क्वा अजून हळूहळू झोपी जात होते पाऊस पडला की काय असे ओल्या झालेल्या रस्त्यावरून वाटत होते. पण मग लक्षात आले की रस्ते धुतले जात आहेत सकाळची कामे मध्यरात्रीच सुरू झाली होती

ली च्या शेजारी पेंगत बसलो असताना मी एकदम दचकलो मी काही मुबईहून निघून दिल्लीला आलो नव्हतो मॉस्कोला आलो होतो साम्यवादाच्या बालेकिल्ल्यात अनेक मोठमोठी नावे दृष्टीसमोर उलगडू लागली मार्क्स, एजल्स, लेनिन, स्टालिन, ट्रॉटस्की, क्रुश्चॉव, गोर्बाचेव्ह आणखी किती तरी. पण लेखक म्हणून मला जास्त जवळचे - म्हणजे टॉलस्टॉय, दोस्तोव्हस्की, चेकॉव्ह, सोल्झेनित्सिन, बोरिस पास्तरनाक आणखीही अनेक या सगळ्याच्या भूमीत मी येऊन पोहोचलो होतो लेनिन ! चेकॉव्ह ! दोस्तोव्हस्की ! एकदम उठून उभे राहावेसे वाटले एवढ्या मोठ्या माणसाच्या देशात मी येतो आणि खुशाल बसून राहतो म्हणजे काय ? पण मी गाडीतच असा उठून उभा राहिलो असतो तर बिचारा ली गडबडून गेला असता सगळ्याच्या नजरा चुकवून हा कोणी इडियन दहशतवादी इथे टपकला की काय, या विचाराने तो चकित झाला असता म्हणून मी स्वस्थ बसून राहिलो माझ्या आवडत्या साहित्यिक मडळींना मनातल्या मनात सलाम केला यापैकी कोणाचे जन्मस्थान स्मारक या भेटीत आपल्याला पाहता येईल काय ?

मॉस्कोच्या विमानतळावरील कस्टम तपासणीची आम्हाला उगाचच धास्ती वाटत होती पासपोर्टस्, व्हिसा वगैरे सगळे व्यवस्थित होते पण काय सागावे ? माझ्या हातबॅगेत डॉक्टर शिधानी दिलेल्या होमिओपॅथिक औषधाच्या पुड्या होत्या पाढरी पूड असलेल्या छोट्या-छोट्या पुड्या ! 'काय राव, अगदी उघडउघड कसला माल चालवला आहे ?' त्या तरुण अधिकाऱ्याने नजरेनेच मला विचारले

'नाही, नाही ही साधी होमिओपॅथिक औषध आहेत ' मी सागितले मी

इग्रजीत सागितल्यामुळे साहजिकच त्याला काही कळले नाही 'होमिओपॅथिक' एवढा शब्द कदाचित त्याला कळलाही असेल माझ्या उत्तराचा त्याच्यावर काही अनुकूल परिणाम होतो आहे की नाही हे अजमावण्यासाठी मी त्याच्याकडे परत पाहिले, पण त्या पुड्या त्याने तशाच ठेवून दिल्या होत्या आता माझ्या जवळचे पुस्तक चाळायला त्याने सुरवात केली होती त्यामुळे मी जास्तच दचकलो. पुस्तकाचे नाव होते 'आय ओ रशिया ट्वेल्व हड्रेड डॉलर्स !' लेखक सुप्रसिद्ध लोकप्रिय अमेरिकन विनोदी नट बॉब होप (I owe Russia 1200 dollars -Bob Hope) बॉब होपच्या रशिया भेटीचे खुमासदार वर्णन या पुस्तकात आहे रशियन लोकाना खूप चिमटे काढणारे आणि विनोदी आहे उदाहरणार्थ बॉब म्हणतो, 'आमची रशिया भेट यशस्वी झाली आम्ही सुखरूप परत आलो' )

पुस्तकाच्या वेष्टनावरच हे वाक्य मिष्किल बॉबने लिहिले आहे पण याचा किंवा इतर कशाचाही चागला परिणाम त्या कस्टम अधिकाऱ्यावर झालेला दिसला नाही निदान त्याच्या चेहऱ्यावर तर नाहीच साहेब उलट अधिकाधिक गभीर दिसू लागला वेष्टनावर एका रशियन रक्षकाचे चित्र आहे आणि त्याच्या मागून लपतछपत बॉब होप येत आहे असे त्यात दिसते मला वाटले, हे एका अमेरिकन माणसाने लिहिलेले पुस्तक, त्यात रशियाचा उल्लेख, शिवाय रशियन रक्षकाचे चित्र ! त्या अधिकाऱ्याच्या गभीर चेहऱ्याकडे पाहून मी थोडासा गडबडलोच म्हटल, हा इसम आता माझ पुस्तक जप्त करणार शिवाय बॉबने रशियाला द्यायचे १२०० डॉलर्स त्याने माझ्याकडूनच वसूल करायचे ठरविले तर !

'ह्यूमरस बुक' 'बॉब होप ह्यूमरिस्ट' असे काहीतरी पुटपुटत मी पुस्तक घेण्यासाठी हात पुढे केला आणि सुदैवाने काही न करता त्या बेट्याने पुस्तक परत केले एखादी तरी स्मितरेषा ! निदान ते चित्र पाहून तरी ? पण ही स्वारी ढिम्म

मग माझी मोठी बॅग त्याने नीट पाहिलीच नाही सौ मेहताची मोत्याची माळ मात्र त्याने अत्यत सशयाने न्याहाळली साध्या मोत्याचा सर होता तो पण त्या अधिकाऱ्याला काय वाटले असेल कुणास ठाऊक ? आपल्या भारतीय सस्थानिकाविषयी त्याने काहीबाही ऐकलेही असेल आणि त्याला वाटले असेल की नक्कीच बाई कोणीतरी कोट्यधीश असणार आणि लाखो रुपयाचा हा मोत्याचा कठा घेऊन तो सहजासहजी मॉस्कोत घेऊन जायचा हिचा डाव दिसतो पण मग त्याची एकदाची कशीतरी खात्री पटली आणि तात्पुरती तरी आमची सुटका झाली

व्हिसा आणि पासपोर्टस् तपासून घेतानाही आमची तशीच तारांबळ उडाली पासपोर्टच्या फोटोत मी सफारी कोट घातला होता आणि आपला एक पुराणा खलनायक शहानवाझ याच्यासारखा मी त्यात दिसत होतो. तपासणीच्या वेळी जोधपुरी कोट मी घातला होता त्यामुळे असेल, पण तो तपासणी अधिकारी एकदा माझ्याकडे, एकदा पासपोर्टकडे आणि एकदा आपल्या शेजारच्या अधिकाऱ्याकडे पाहत राहिला असे त्याने बऱ्याच वेळा केले. माझा चेहरा इतका पाहण्यासारखा असेल असे मला पूर्वी कधीही वाटले नव्हते माझ्या कोटातील फरकामुळे याच्या मनात काही संशय उभा राहिला आणि परत-परत पाहिल्यामुळे तो बळावत गेला तर काय ? तशी जवळजवळ माझी खात्री झाल्यावर मात्र माझा चेहेरा पाहण्यासारखा झाला नसेल पण फोटो काढण्यासारखा तरी झाला असलाच पाहिजे

अखेर त्या तरुण साहेबाने माझा पासपोर्ट आणि व्हिसा परत दिला त्या वेळी मात्र त्याच्या चेहऱ्यावर चक्क हसू फुटल्यासारखे वाटत होते मीसुद्धा तसेच हसायचा प्रयत्न केला माझ्या Thank you चा अर्थ कदाचित त्याला कळलाही असेल पण मनातल्या मनात मात्र मी म्हणालो, 'बच्चजी, तू इतक्या संशयाने माझ्याकडे पाहता पाहता शेवटी मी सुटलोच की नाही ? तुला काय माहीत की हॅंडग्रेनेडससारखे दिसणारे दोन डझन लाडू मी या मोठ्या बॅगेत घेऊन चाललो आहे !'

पण या कस्टमच्या तपासणीबद्दल केवळ रशियन लोकाना नावे ठेवण्यात अर्थ नाही गुन्हा शाबित होईपर्यंत प्रत्येकाला गुन्हेगार समजून चालावे असा सगळ्याच कस्टमवाल्याचा सर्वसाधारण खाक्या असावा त्याशिवाय प्रत्येक उतारूचा जास्तीत जास्त वेळ घेऊन विमानप्रवासाने वाचलेल्या त्याच्या वेळाबद्दल त्याचा वचपा काढणे व त्या वेळाची भरपाई करणे हे आपले कर्तव्य आहे असेसुद्धा हे कस्टमवाले लोक समजत असावेत.

कस्टमच्या सापळ्यातून आम्हाला या प्रवासात एकदर चारवेळा ये- जा करायची होती या आठ प्रसगापैकी केवळ दुसऱ्या प्रसगातून आम्ही बाहेर पडलो होतो मुबई ते मॉस्को हा दहा तासाचा दीर्घ हवाई प्रवास आणि त्यानतरची ही वेळकाढू तपासणी आमचे चेहरे इतके पडलेले होते, की कस्टम अधिकारीच काय आम्हीसुद्धा आम्हाला ओळखू शकलो नसतो उतारूला प्रवासामधे थोडाफार आनद झालाच असेल तर तो पूर्णपणे शोषून घेण्याची जबाबदारी या अधिकाऱ्यावर सोपविलेली असावी

कोरियन दूतावासात आमची व्यवस्था उत्तम होती खोलीत भिंतीपासून भिंतीपर्यंत गालीचे होतेच पण बाहेरच्या जागी कॉरिडॉर्समध्ये, मोकळ्या जागी सगळीकडेच तसेच गालिचे होते मोकळ्या जागा होत्या तिथे चकचकित पॉलिश केलेल्या लाकडी जमिनी (Wooden flooring) होत्या प्रत्येक खोलीत फ्रिज, रंगीत टी व्ही , सोफासेट इ सर्व सज्ज व्यवस्था होती गरम पाणी, टब बाथ हे सर्व होतेच.

न्याहारी आणि दोन्ही जेवणाची व्यवस्थाही चागली होती पचाईत एवढीच की न्याहारी सकाळी ७ वाजता सध्याकाळी जेवणही लवकर, दुपारचे उशिरा आम्हाला आमच्या नेहमीच्या सवयीत बदल करावे लागले सगळेच पदार्थ आम्हाला आवडतील असे नव्हे पण बऱ्यापैकी भागवता येतील असे नक्कीच मला काळजी वाटू लागली ती एवढीच की ही कोरियन मडळी जेव्हा पुण्याला येतील तेव्हा आम्ही त्याची काय व्यवस्था करणार आणि कशी ? प्रत्यक्ष कोरियापासून शेकडो मैल दूर असलेल्या मॉस्को शहरात त्यानी आमची इतकी छान व्यवस्था केली होती कोरियात, तिथल्या राजधानीत ही व्यवस्था आणखीनच चागली असणार आदरातिथ्यात आपण कधीच प्रसिद्ध नव्हतो विशेषत परकीय पाहुणे आले म्हणजे पचाईतच

आमच्या सातव्या मजल्याच्या दुसऱ्या टोकाला स्वैपाकघर व जेवणघर ही दोन्ही होती पाक या नावाचा कोरियन गृहस्थ तेथील प्रमुख पाक आणि त्याची बायको ही दोघे मिळून आमचा भोजन प्रबध पाहत स्वैपाकाचे सगळे काम पाक करीत असे आणि त्याची बायको ही मदतनिसाचे पाक आमच्या लक्षात राहिला तो त्याच्या चालण्याच्या शैलीमुळे 'गुड अर्थ' हा सिनेमा आठवतो का ? त्यातल्या वाग लुगसारखा हा उडतउडत पुढे झुकत चालत असे आणि त्याची चाल वेगाची असल्यामुळे त्याच्या बायकोला त्याच्यामागून जवळजवळ पळावे लागायचे. पण हा पाक स्वभावाने बरा वाटला म्हणजे आमच्या अडचणी, गरजा त्यातल्या त्यात समजून घेणारा त्यामानाने सौ पाक ही बाई विक्षिप्तच वाटली तिच्या कपाळावर नेहेमी आठ्याच असायच्या तिने आमच्यासमोर आदळआपट केली नाही हे आमचे नशीबच पण भाषेच्या अडचणीमुळे आमचे या दोघाना आणि या दोघाचे आम्हाला काहीही कळत नसे या कडू चेहऱ्याच्या सौ पाकला कोण हसवू शकेल याबद्दल आम्हा पाचजणात पैज लागली होती पैज आम्ही सगळेच हरलो हे सागायला नकोच

गेल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी उठून आम्ही कोरियन दूतावासाच्या

आसपास फेरफटका मारला मॉस्को शहरात ऐंशी लाख लोक राहतात हे मला आसपासच्या रहदारीवरून तरी पटले नाही वाहने म्हणजे डोक्यावरची वीज घेऊन वेगाने चालणाऱ्या ट्रॉली बसेस किंवा ट्रॅम्स, टॅक्सीज आणि मुख्य म्हणजे भुयारी आगगाड्या - मेट्रो 'मॉस्कोतल्या मेट्रोला भेट दिल्याशिवाय राहू नका,' असे आम्हाला बजावण्यात आलेले होते तेव्हा मेट्रोच्या गाडीतून प्रवास अपरिहार्य होता

पुण्याहून मॉस्को आणि तेथून उत्तर कोरिया हा खरे म्हणजे वाईवरून कोल्हापूर असा द्राविडी प्राणायाम आहे पण आम्ही येथून प्रथम मॉस्कोला जायचे आणि तेथून प्यन्यग, कोरिया येथे जायचे असे आमच्या यजमानाचे निमत्रण होते कोरियाच्या समाजशास्त्र सघटनेचे हे निमंत्रण मॉस्कोहून कोरियाला जाणारी आठवड्यातून दोनच उड्डाणे असल्यामुळे मॉस्कोत राहायला आम्हाला वेळ मिळाला कोरियाच्या वाटेवर आम्हाला मॉस्कोत थाबता येईल हे आम्हाला सर्वांनाच मोठे आकर्षण होते आमच्या डॉ बाचलानी बरीच धडपड करून मॉस्कोत राहण्याचा परवानाही मिळविला होता त्यामुळे मॉस्कोमध्ये राहून रशियाचे हृदय शोधता येईल का हे आम्हाला पाहायचे होते !

* * *

# रशियाचे हृदय

मॉ स्कोची भेट हे आम्हा सर्वांनाच एक स्वप्न होते रशिया म्हणजे अगदी सोवळा साम्यवादी देश भाडवलशाहीवाले देश आणि रशिया याच्यामध्ये एक पोलादी पडदा (Iron Curtain) आहे आमच्यासारख्या सामान्याना रशियात प्रवेश मिळणे केवळ अशक्य आहे कम्युनिस्ट पक्षाचे कार्डधारी जे कोणी असतील त्यानाच फक्त या कम्युनिस्टाच्या गुहेत प्रवेश असतो. इ इ आम्ही खूप ऐकून होतो

अर्थात रशिया किंवा कम्युनिझम या गोष्टी आम्हाला अपरिचित नव्हत्या वयाच्या सतरा-अठराव्या वर्षी मी मार्क्स वाचलेला होता मार्क्सचे अर्थशास्त्र खूप भोसके पडल्यासारखे असेल, पण त्याचे तत्त्वज्ञान ही एक असामान्य गोष्ट होती त्याच्या पकडीत सापडले की तुमची तडफड झाल्याशिवाय त्यातून सुटका नसे तुम्हाला ते पटो अगर न पटो, मार्क्स हा मोठा समाजशास्त्रज्ञही होता आमच्या समाजशास्त्रतज्ज्ञ डॉ सौ गाडगीळ यानी आम्हाला त्याबद्दल ऐकवलेही होते आम्ही सर्वांनीच मार्क्सच्या अभ्यासात घालवलेली वर्षे काही फुकटची नव्हती

तेव्हा आम्ही स्टॅन्ले गार्डनरच्या पेरि मॅसन कथा वाचू शकलो असतो. ॲगाथा ख्रिस्तीची सगत करू शकलो असतो, पण डॉ. बाचल किंवा डॉ सौ होनप यानी ते केलेले नव्हते मार्क्सचे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र याचा मनोभावे अभ्यास आम्ही केला होता मार्क्सच्या भूमिकेतील चुका दाखवून त्या सिद्ध करण्याइतके औद्धत्यही आमच्यात होते

पण एवढे होते तरी मार्क्सचे तत्त्वज्ञान ज्यानी प्रत्यक्षात अमलात आणले होते तिथे पाऊल टाकायची आमची इच्छा असूनही, आम्ही तिथे जायला परवानगी मिळवू शकू की नाही याबद्दल आमच्या मनात धास्ती होती पण अहो आश्चर्यम आम्ही रशियात पोहोचलो साक्षात् मॉस्कोमध्ये अवतरलो आणि तेसुद्धा उगाच कोणी प्रवासी कपनीतर्फे गेलेले हौशी प्रवासी म्हणून नव्हे तर साम्यवादी कोरियन यजमानाचे रशियातील सरकारी पाहुणे म्हणून आमच्या कुडल्यातले ग्रह सदा एकमेकावर रुसलेले एकमेकाकडे पाठ फिरवून बसलेले, पण त्या वेळी त्याची अशी काही गट्टी जमली की विचारू नका आम्ही अलगदपणे या पोलादी पडद्याच्या मागे जाऊन पोचलो मॉस्को विमानतळावरच्या त्या कोवळ्या तरुण अधिकाऱ्याना काय माहीत आम्ही कोण होतो ते ? आमच्यापैकी बहुतेक त्याच्या बारशाला जेवलेले असणार अगदीच कोळून नसेलही, पण आम्ही कम्युनिझम प्यालेलो होतो मग काय आम्हाला त्याच्या बालेकिल्ल्यात प्रवेश मिळणार नव्हता ?

नाही, पण तो आम्हाला मिळाला कसलीही कुरबुर, कुरकुर न करता इथे येऊन आम्ही सागितल्यावर कोणाकोणाला आश्चर्य वाटले, कोणाकोणाला खरेही वाटले नाही पण विश्वास ठेवा अगर ठेवू नका, आम्ही नेहेमी केवळ स्वप्नभूमीतली वाटणारी वास्तू-क्रेमलिन- तिथे मॉस्कोतील मुक्कामात जवळजवळ दररोज जात होतो क्रेमलिन आम्ही नुसता बाहेरून नाही पाहिला चक्क त्याच्या तटबदीतून आम्ही राजरोसपणे आत गेलो तिथे भटकलो तिथली अनेक स्मृतिस्थळे पाहिली, न्याहाळली मॉस्कोच्या सुप्रसिद्ध लाल चौकात आम्ही आरामात हिंडलो- फोटो काढले थड पेये घेतली खरेदीसुद्धा केली क्रेमलिनच्या लाल चौकासमोर हॉटेल रशिया नावाचे भव्य हॉटेल आहे खास परकीय पाहुण्याच्या स्वागतासाठी हे राखून ठेवण्यात आलेले आहे तिथला पाहुणचारसुद्धा घेतला

काही लोकाना शहरे पाहण्याची आवड असते ते प्रवासी कपनीत सामील होतात मग त्याची धावाधाव सुरू होते एक शहर पाहून न होते तोच दुसरे शहर पाहायला निघतात साहजिकच खूप दमायला होते हुश्श् ! म्हणून

पळभर विश्राती होते, होत नाही. धावतधावत लगबगीने ते तिसरे शहर 'पाहायला' जातात आणि आरामात प्रवास करून शीण घालवायला गेलेली ही मडळी ठिकठिकाणी खरेदी करून आणलेल्या सामानाच्या पडशा घरात आणून टाकल्यावर थकव्याने आजारी पडतात अशा प्रवासातून मला तरी आनद मिळत नाही. ही माणसे पाहतात खूप, पण त्याना दिसते मात्र फार थोडे ही धावाधाव तर मला अगदी नापसत आहे शिवाय शहरे पाहण्यापेक्षा तिथली माणसे पाहणे यात मला खरा दिलासा वाटतो

साम्यवादी देशातल्या माणसाबद्दल आम्ही काहीबाही ऐकले होते, वाचलेही होते ही माणसे सदैव त्याच्याकडे वटारून पाहणाऱ्या एका तिसऱ्या डोळ्याच्या धाकात वावरत असतात त्यामुळे त्याच्यातले स्वतत्र व्यक्तिमत्त्व नाहीसे होऊन एक प्रकारचा यात्रिकपणा त्यात येतो, त्याना आचाराचे स्वातत्र्य नसतेच, विचाराचे नसतेच नसते थोडक्यात म्हणजे या माणसामधले 'माणूसपण' शोषून घेतल्याप्रमाणे नाहीसे झालेले असते. इ इ किंवा ही साम्यवादी देशातली माणसे माणसेच नसतात, रोबोसारखी चेतनाहीन यत्रे असतात

आम्हाला आलेला अनुभव मात्र अगदी वेगळा होता अर्थातच आम्ही काही सगळ्या रशियात मुलुखगिरी केली नाही, किंवा दारोदार हिंडून आकडेवारी गोळा केली नाही किंवा मॉस्को शहराबाहेरही कुठे गेलो नाही रशियन भाषेत सभाषण करता न येणे हीसुद्धा आमच्या मार्गातली एक अडचण होतीच, पण अडचण म्हणजे अगदीच 'स्त्री ही पुरुषाच्या मार्गातली धोंड आहे' (असे म्हणतात) त्याप्रमाणे धोंड नव्हे एक तर रशियन भाषेचा डिप्लोमा घेतलेल्या डॉ. सौ गाडगीळ आमच्याबरोबर होत्या त्यामुळे त्याना स्वतःला वाटत नसेल इतका विश्वास आम्हालाच त्याच्याबद्दल वाटू लागला शिवाय शब्दाच्या भाषेपलिकडची अशी एक नि:शब्द भाषाही असते आणि ही भाषा एकमेकाची भाषा न समजणाऱ्या माणसात सवाद साधून जाते. मॉस्कोला पोहोचल्याच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही क्रेमलिनच्या दिशेने जाणाऱ्या एका ट्रॉलीत चढलो आपल्याला क्रेमलिनला जायचे आहे एवढेच आम्हाला माहीत होते आणि आपापसात आम्ही तसे बोलत होतो आमच्या शेजारीच उभ्या असलेल्या एका रशियन सद्गृहस्थाने आम्हाला काय पाहिजे ते ओळखले नकाशा वगैरे काढून देण्याच्या भानगडीत तो पडला नाही तिसऱ्या किंवा चौथ्या स्टॉपवर तो आमच्या बरोबर उतरला. आम्हाला घेऊन मेट्रोच्या स्टेशनमध्ये शिरला आमच्याकडून तिकिटे काढून घेतली आणि आम्हाला घेऊन तो गाडीतून निघाला क्रेमलिनचा स्टॉप तिथून बराच दूर

होता, पण तो जवळजवळ तिथपर्यंत आमच्याबरोबर आला आदल्या स्टेशनवर आमचा निरोप घेऊन उतरला पण त्याअगोदर त्याने एका पोलिसाला आमची [illegible] आणि त्या पोलिसानेही आम्हाला व्यवस्थित ताब्यात घेऊन पुढच्या स्टेशनवर उतरून गर्दीच्या आणि प्लॅटफॉर्मच्या चक्रव्यूहातून बाहेर काढून क्रेमलिनसमोर आणून उभे केले

सौ मेहताच्या ओळखीच्या मार्गारिटा बाईंनी तर स्वतःच तिकिटे काढून आम्हाला पुष्किन म्युझियम दाखविले तिथे आमच्याबरोबर न कटाळता पायपीट केली क्रेमलिनसमोरच्या हॉटेल रशियातही त्या आम्हाला घेऊन गेल्या पण त्या बाईंना निदान हिंदी भाषा समजत होती मात्र याच म्युझियममध्ये आम्हाला घेऊन जाणाऱ्या टॅक्सीवाल्याला रशियनशिवाय काहीच समजत नव्हते तरीही मॉस्कोत टॅक्सी सहजासहजी मिळत नाही आम्ही पाचजण आहोत आणि त्यात पाऊस पडतो आहे या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन टॅक्सीत नियमाप्रमाणे चारच उतारूना घेता येते हे माहीत असूनही त्या बेट्याने प्रसग लक्षात घेऊन खुशाल आम्हाला सर्वांना आत सामावून घेतले खुणेने एकाला जरा दबून बसायला सागितले आणि टॅक्सी हाणली आपल्याकडच्या एखाद्या टॅक्सीवाल्याप्रमाणे त्याने फक्त डोळे मिचकावले नाहीत आणि 'चला, बसून घ्या, नतर काय द्यायच ते [illegible]

हॉटेल रशियामध्ये लरीसा नावाची एक लावण्यवती वेट्रेस आम्हाला भेटली तिला अर्थातच आमची कुठलीही भाषा येत नव्हती, पण आमच्याबरोबरच्या तीनही स्त्रियानी एका नजरेत तिला सागून टाकले, 'खरोखरीच सुदर आहेस हो' तू बायो अग, पुरुषाना तू घायाळ करून टाकत असशील तर त्यात आश्चर्य नाही आम्हा बायकांच्यावरसुद्धा मोहिनी घातलीस की ग तू !' ती सुदरी लरीसाही चागली रशियनमध्ये लाजली आणि नजरेन म्हणाली, 'कसच, कसच '

अशी ही सगळी शब्दापलिकडची भाषा आणि त्या भाषेतून समजणार माणसामाणसातल सारखेपण

त्या दिवशी आम्ही सकाळी मॉस्को विद्यापीठाच्या दिशेने फेरफटका करायला निघालो होतो तेव्हा असच डॉ सौ गाडगीळाना कोणाला तरी ओळखीच्या मुलीला फोन करायचा होता पण तो आम्हाला कोणालाच करणे जमेना तेव्हा बाबागाडीतून आपल्या छोट्याला घेऊन जाणारी एक बाई थाबली

आणि बाबागाडीसकट बाळाला आमच्या ताब्यात देऊन स्वत च्या सुटी नाणी वापरून तिने फोन जोडून दिला आणि ते करण्यात आपला भरपूर वेळ घालविला डॉ बाचलानीही आपल्या स्केचबुकात बाबागाडीतल्या त्या बाळाचे आणि त्याच्या आईचे चित्र झराझरा रेखाटून टाकले ते सुदर चित्र पाहिल्यावर नजरेनेच त्या बाईसाहेब आम्हाला म्हणाल्या, 'कित्ती गोड आहे की नाही माझा छबड्या ! बरय सुटते आता. माझी खवीस सासू डोक्यात राख घालून बसेल ना मला आणखी उशीर झाला तर '

म्हणजे काय, की माणसे म्हटली, की ती इथूनतिथून सगळीकडे सारखीच मग ती कम्युनिस्ट देशातली असोत, नसोत

पुष्किन म्युझियम हे एक सुदर पण अफाट म्युझियम आहे. त्याच्या दर्शनाचा परिणामही आपल्यावर इतर सुदर आणि अफाट म्युझियम्स पाहायला आपण जातो तेव्हा होतो तसाच होतो म्हणजे शतकाशतकातल्या थोर कलाकृतींचे दर्शन आपल्याला होऊन आपले डोळे सुखावतात, दृष्टी तृप्त होते पण तितकाच महत्त्वाचा परिणाम म्हणजे पाय विलक्षण दुखू लागतात कुठेतरी टेकणे यासारखे सुख नसेल असे वाटू लागते आणि मऊ खुर्चीवर बसणे म्हणजे तर स्वर्गसुखच पण त्या दिवशी माझ्या दुखणाऱ्या पायाच्या आरडाओरड्याकडे मी दुर्लक्ष केले म्हणून तर मला व्हॅन गो, गोगँ, रेनवाँ अशा थोर चित्रकाराची अस्सल तैलचित्रे पाहायला मिळाली कल्पना करा, रशियात आणि तेसुद्धा खुद्द मॉस्को शहरात व्हॅन गो आणि गोगँ मी तरी कधी ऐकले नव्हते

या पुष्किन म्युझियमचे मला जाणवलेले वैशिष्ट्य असे, की तिथे निरनिराळ्या प्रकारच्या आणि आकाराच्या कलात्मक अशा खुर्च्या जागोजाग माडून ठेवलेल्या आहेत या म्युझियमच्या प्रमुखाला कलावताची दृष्टी असणारच पण म्युझियम नीट पाहण्यासाठी माणसाच्या डोळ्याप्रमाणे त्याचे पायही शेवटपर्यंत शाबूत असावे लागतात हे चागलेच जाणवले असले पाहिजे

मॉस्को शहर हे जगातल्या कोणत्याही मोठ्या शहरासारखेच आहे टोलेजग इमारती, प्रशस्त रस्ते, वेगाने जाणाऱ्या टॅक्सीज, ट्रॉलीज, बसेस, स्वत च्या उद्योगात मग्न असलेले भराभरा चालणारे पादचारी हे सगळे तिथे आहेच शहराच्या सौंदर्यात भर टाकणारी मॉस्को नदीही या शहरातून वाहते इतराना या जलसौंदर्याकडे लक्ष द्यायलाही वेळ नसेल, पण आमच्यासारख्या रिकामटेकड्या प्रवाशाना मात्र ते अनुभवता आले

पण या जगप्रसिद्ध शहरातले खरे आकर्षण म्हणजे क्रेमलिन मॉस्कोचे किंवा रशियाचे हृदय समजला जाणारा क्रेमलिन राजवाडा. जगाच्या राजकारणाचे धडधडणारे ठोके तिथे ऐकू येतात

'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या आपल्या प्रवासवर्णनात आमचे गुरुवर्य प्रा अनत काणेकर यानी क्रेमलिनचा भक्तिभावाने उल्लेख केला होता क्रेमलिन ही साम्यवादाची काशी किंवा मक्का त्या नावाभोवती आमच्या मनात एक तेजोवलय गरगरत होते ही इतिहासप्रसिद्ध वास्तू जेव्हा मी पाहिली तेव्हा मी आनदित झालो पण काय असेल ते असो, स्तिमित झालो नाही उलट थोडासा निराश झालो एका बाजूला किल्ल्याच्या तटासारख्या भव्य भिती दिसत होत्या हे खरे, त्यात क्रेमलिनचे क्रेमलिनपण होते, पण दुसऱ्या बाजूला भडक रगात रगविलेल्या चर्चेसचे घुमट दिसत होते हे खूपच विसगत वाटले क्रेमलिनसमोरचा लाल चौक विस्ताराने लहानच आहे एक मेच्या कामगार दिनाची रगारगानी फुललेली, भव्य दिमाखदार मिरवणूक आम्ही पाहिली तेव्हा मात्र क्रेमलिनची भव्यता काहीशी जाणवली तटाला लगोलगच असलेल्या लेनिन मझोलियम आणि लेनिन म्युझियमची पुराणी इमारत यानी या एकदर चित्राचा तोल साभाळायचा प्रयत्न केला आहे मार्क्स, एजल्स, लेनिन या तिघाच्या अवाढव्य चित्रकृती क्रेमलिनसमोरच्या इमारतीवर आहेत आणि क्रेमलिनच्याही पलीकडे दिसणाऱ्या क्षितिजाकडे त्याच्या नजरा लागलेल्या आहेत

भारतीय दूतावासातल्या अधिकारी श्रीमती वीणा सिक्री या फर्गसनच्या विद्यार्थिनी माझ्या वर्गातही त्या होत्या असे त्यानी सागितले त्या अर्थी ते खरे असले पाहिजे त्यानी आमची विचारपूस करून आम्हाला ताज्या लिबाच्या फोडी टाकलेला चवदार गरम चहा दिला हे खरे, पण कामगार दिनाच्या समारभासाठी त्याना विचारले तेव्हा त्या म्हणाल्या, 'अहो, आम्ही या दूतावासातच इतके अधिकारी लोक आहोत त्यातल्यासुद्धा फार तर दोघा-तिघानाच जाता येणार आहे त्यापेक्षा तुम्ही ही मिरवणूक टीव्हीवरच का पाहात नाही ?' स्वत सिक्रीबाईनीच आम्हाला दवकविल्यामुळे शेवटी ती प्रचड मिरवणूक आम्ही टीव्हीवरच पाहिली अगदी अथपासून इतिपर्यंत लेनिन मझोलियमच्या वरच्या गॅलरीत अध्यक्ष ग्रोमिको, सेक्रेटरी गोर्बाचेव्ह आपल्या सर्व मत्रिपरिवारासह उभे होते चागले तास-दीड तास सहज वारवार 'हुर्रा हुर्रा ' अशी गगनभेदी घोषणा ऐकू येत होत्या. जर्द ताबड्या सुदर फुलाचे गुच्छ मिरवीत शेकडो, हजारो लोक चालले होते त्यात लहान मुले होती, तरुण-तरुणी होत्या, म्हातारी कोतारी माणसे होती

काही लहानगी वडिलाच्या चालीबरोबर जाता यावे म्हणून धावत होती एकाने तर आपल्या छोट्याला चक्क खांद्यावर बसवून चालविले होते आणि तो छोटा मुलगासुद्धा हवेत हात उडवीत ओरडत होता, 'हुर्रा हुर्रा .'

आम्हीही सगळे त्या कामगार क्रांतीच्या जयघोषात सामील झालो जणू काही रशियाच्या हृदयातली ती धडधड आम्हालाही जाणवली होती

* * *

# मॉस्को ते प्यंन्यंग

मॉस्कोमध्ये आम्ही पाचसहा दिवस होतो तरी मॉस्कोचे दर्शन तसे पाहिले तर चुटपुटतेच झाले खरे म्हणजे आम्हाला एखाद दुसऱ्या रशियन कुटुबाला त्याच्या घरी जाऊन भेटायचे होते माणसे बाहेरच्या जगात वावरताना नेहमीच औपचारिकतेचे, शिष्टाचाराचे बुरखे घालून वावरतात घरी मात्र त्याची वेगळी व्यक्तिमत्त्वे थोडीफार का होईना, पण बारकाईने पाहणाऱ्याला दिसू शकतात राहणीची पद्धत, राहणीतील फरक नजरेस येतात एखादे पेट्रॉव्हकाका बोलायला अघळपघळ असतील, तर काकू तुटक बोलणाऱ्या, सशयी स्वभावाच्या असू शकतील प्राध्यापक नोतोविच हे चागले प्राध्यापक म्हणून नावाजलेले असतील, पण त्याच्या खोलीत पुस्तकाचा अस्ताव्यस्त पसारा असेल. उलट नोतोविचबाई मात्र नेटनेटकी, टापटिपीची आवड असणारी बाई असेल शिवाय ही सगळीच माणसे राजकीय विषयावर बोलायचे सपूर्ण टाळतील, की अधूनमधून बोलतीलही, ते ऐकायला मिळेल हे सगळेच लोक निधर्मी असतील, की काही धार्मिक प्रवृत्तीचे असतील, याना मित्रपरिवार असतील काय, त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी काय असतील, सिनेमा, नाटक, करमणूक याची कितपत

आवड किंवा शक्यता ?   अशा अनेक गोष्टींबद्दल आमच्या मनात कुतूहल होते, पण ते शमविणे काही शेवटपर्यंत जमले नाही

रशियन कुटुंबे राहोतच. आपले अनिल हवालदार 'सोव्हिएत देश' मध्ये काम करतात किंवा नरेंद्र सिनकर मॉस्को रेडिओत आहेत या दोघाचाही पत्ता लागला नाही 'रामायण' आणि 'मनाचे श्लोक' याची रशियन भाषेत भाषातरे झालेली आहेत असे कळले मला या प्रती मिळवायच्या होत्या या मनाच्या श्लोकाच्या रशियन भाषातरावरून एक वात्रट विचार मनात येऊन गेला. क्रेमलिनच्या पहारेकऱ्याची नजर चुकवून जर आपल्याला आत प्रवेश मिळाला तर गोर्बाचेव्ह साहेबाच्या ऑफिसच्या खिडकीबाहेर उभे राहून 'मना सज्जना ' सारखा श्लोक खणखणीत आवाजात म्हणून दाखवावा काय परिणाम होईल ? म्हणजे या खड्या समर्थवाणीचा प्रथम गोर्बाचेव्हसाहेबावर - आणि नतर साहेबाच्या वाणीचा माझ्यावर !

सौ मेहताच्या ओळखीचे श्री आणि सौ साव्हनी हे आम्हाला मॉस्कोत भेटले हे गृहस्थ गेली जवळजवळ पधरा-वीस वर्षे मॉस्कोत मुक्काम करून आहेत आणि ते रशियन ग्रंथाचे गुजरातीत भाषातर करण्याचे काम करतात इतकी वर्षे ते तिथे राहात असूनही त्याची स्वत:ची गाडी नाही ते अनेक मैल दूर बसमधून आम्हाला भेटण्यासाठीच मुद्दाम आले होते आम्ही त्याना कुतूहलाने विचारले, 'तुमच्याजवळ स्वत:ची गाडी नाही हे कसे काय ?' 'असायला पाहिजे' ते म्हणाले, 'पण मध्यम उत्पन्नाच्या माणसाला गाडी परवडत नाही. फार थोड्या लोकाच्या इथे खासगी गाड्या आहेत त्या मानाने बसचा प्रवास फारच कमी खर्चाचा असतो ' मूबईलाच काय, पुण्यालासुद्धा मोटारींचा जो सकाळ दिसतो त्या मानाने मॉस्कोसारख्या शहरात खूपच कमी मोटारी दिसतात याचे कारण आम्हाला असे कळले

मॉस्कोमध्ये कुणालाही फोन करणे ही गोष्ट कर्मकठीण सलग नावाची आणि टेलिफोन नबर्सची अशी डिरेक्टरीच कुठे दिसली नाही वीणा सिक्रीसारखी अधिकारी बाईसुद्धा मॉस्को विद्यापीठाच्या आमच्या भेटीसाठी परवाना मिळवू शकली नाही म्हणून मग आम्ही तिथे बाहेरूनच फेरफटका केला जुन्या नामवत प्राध्यापक-शास्त्रज्ञाचे ब्राँझचे पुतळे तिथे जागोजाग आहेत विद्यापीठात सहज प्रवेश न मिळाल्यामुळे आम्ही काहीसे त्रासलो होतो कोणी तरी म्हणाले, 'हे पुतळे इथे कशाला उभे केले असतील ?'

‘या प्रोफेसरानी वर्गात मुलाना फार पिळल्यामुळे त्याच्या विद्यार्थ्यांनी या प्रोफेसर मडळींचे पुतळे बनवून त्याना कायम वर्गाबाहेर बसविण्याची शिक्षा केली असली पाहिजे ’ हे उत्तर आम्हा पाचजणाबाहेर कोणाला ऐकू जाणार नाही एवढी खबरदारी मात्र मी घेतली, या मोठमोठ्या प्राध्यापकाचे सोडा म्हणा पण रशियन विद्यापीठातही काही ‘पीळ’दार प्राध्यापक असणारच आणि रशियन पोरेही त्याना सतावून सोडीत असणारच

हाटल राशयामध्ये अचानकपणे आम्हाला चेर्नोबिल प्रकरणाची माहिती कळली म्हणजे आम्ही या होटेलमध्ये चहा कुठे मिळेल का म्हणून शोधात होतो जणू काही एवढ्या मोठ्या होटेलात कमीत कमी बड्या खान्याची ऑर्डर देणे आवश्यक असावे साधा चहा कसला पिता ? शेवटी बऱ्याच चकरा मारल्यावर एका कोपऱ्यात चहाची व्यवस्था आढळली तोसुद्धा ‘अन्नपूर्णा स्पेशल म्हणजे चहा स्वत च काउटरवरून आधी पैसे देऊन आपल्या टेबलाशी घेऊन यायचा तर असा मिनतवारीने मिळविलेला चहा घेत असतानाच आम्हाला ते ब्रिटिश दापत्य भेटले त्यानी आम्हाला एक छोटे बातमीपत्र दाखवले त्यात कीव्हला झालेल्या स्फोटाची व तिथले वातावरण दूषित झाल्याची बातमी होती मैलोमैल दूर या दूषित द्रव्याचा ससर्ग होणार होता शिवाय ब्रिटिश पतप्रधानानी खास विमान पाठवून म्हणे तिथल्या स्वकीयाना हलविण्याची तयारी दाखविली होती हे ब्रिटिश दापत्य कीव्हहून आलेले होते आणि स्वदेशाच्या मार्गावर होते एकदरीत खप [illegible]

पण प्रकरण कितीही गभीर असले तरी मॉस्कोमध्ये आम्हाला त्याचे कसलेच पडसाद ऐकू आले नाहीत लोक काय काय बोलत होते हे अर्थातच आम्हाला कळणे शक्य नव्हते, पण घबराटीचे कसलेच चिन्ह आम्हाला त्याच्या चेहऱ्यावर आढळले नाही एका जपानी वाटणाऱ्या तरुणाने आम्हाला यासबधी काहीतरी विचारायचा किंवा सागण्याचा प्रयत्न केला, पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही आमच्यापैकी कोणी तरी या गभीर परिस्थितीत आपले कसे होणार अशी चिता व्यक्त केली ‘अहो, उगाच काळजी [illegible] राहतात. त्याच व्हायच तेच आपलही होईल . आपण जरा रशियन चहा आणि केक्स याचा समाचार घेऊ या म्हणजे आपल्याला बर वाटेल ’

आणि मे दिनाचा शैलीदार कार्यक्रम यानतर साजरा झाला अगदी भव्य प्रमाणात त्या वेळीही चेर्नोबिलच्या स्फोटाचा मागमूससुद्धा आम्हाला कुठे

जाणवला नाही

त्याच रात्रीच्या विमानाने आम्हाला कोरियाला जायला निघायचे होते 'कोरिअन एअरलाईन्स' ही कोरिया सरकारची आणि 'एअरोफ्लोट' ही रशियन कोरिअन विमान आधी निघणार असल्यामुळे आम्ही त्यातूनच जायचे ठरविले होते

आम्हाला जायचे होते ते उत्तर कोरियात उत्तर कोरिया हा साम्यवादी देश आहे, तर दक्षिण कोरियावर अमेरिकन लोकाचा वरचष्मा आहे दक्षिण कोरियाविषयी, त्यामानाने आम्ही बरेच वाचलेले हाते विशेषत आता तिथे व्हावयाच्या ऑलिंपिक्सच्या सदर्भात, दक्षिण कोरियाची राजधानी सेऊल सेऊलविषयी तर वारवार वर्तमानपत्रात येत होते, परतु उत्तर कोरियाची आम्हाला फारच थोडी माहिती होती

म्हणून तर आम्हाला या उत्तर कोरियाविषयी कमालीचे कुतूहल होते ज्यूचे (Juche) विद्यापीठाचे कुलगुरू डॉ किम डुक सू यानी स्वत मला आपल्या देशाला भेट द्यायचे आमत्रण दिले होते 'आमचा देश लहान आहे, पण तुम्ही येऊन तर पाहा तुम्हाला योग्य वाटतील अशा सहकाऱ्याना घेऊन या आम्हा सर्वाना, मला फार आनद होईल ' ते म्हणाले होते माझ्या सहकाऱ्यामधेही उत्तर कोरियाविषयी माझ्याइतकेच -कदाचित ते तरुण असल्यामुळे माझ्यापेक्षाही जास्त -कुतूहल होते आणि म्हणून तर थोडी पदरमोड करूनही आम्ही कोरियाची भेट निश्चित केली होती

आणि आम्हा सर्वाच्या वतीने मला सागायला आनद होतो, की आमची बिलकुल निराशा झाली नाही डॉ किमनी मला लिहिले होते, की कोरिया तुम्हाला समजण्यासाठी निदान दोन आठवडे तुम्ही इथे राहिले पाहिजे आम्ही जवळजवळ तीन आठवडे राहिलो या दिवसात ज्याला 'सम्यक् दर्शन' म्हणतात इतके कोरियाचे दर्शन आम्हाला झाले नसेलही, पण आम्हा पाचही जणाच्या वतीने मला सागावेसे वाटते, की साम्यवादी उत्तर कोरिया आम्हाला खूपच समजला दोन कोटींच्या जवळपास म्हणजे केवळ एक कोटी ऐंशी लाख लोकाच्या या चिमुकल्या देशाने किम इल सुग या त्याच्या थोर नेत्याच्या मार्गदर्शनाखाली जी असामान्य, कोणालाही स्तिमित करून टाकणारी प्रगती करून दाखविली आहे, तिचे दर्शन आम्हाला झाले प्रथम जपानी आणि नतर अमेरिकन लोकाच्यामुळे या देशाची फाळणी झाली पिवळ्या जपान्यानी ती प्रथम केली आणि गोऱ्या अमेरिकनानी

तिच्यावर शिक्कामोर्तब केले फाळणी वज्रलेप झाल्यासारखी वाटावी असे रूप तिला अमेरिकन लोकानी दिले

आम्ही ज्या ज्या उत्तर कोरियन माणसाशी या विषयावर बोलली त्या त्या प्रत्येकाच्या मनीची आस हीच होती की परकीयाच्या कारवायामुळे दुभगलेला हा देश एक झाला पाहिजे

आमच्याबरोबर चर्चा करण्यासाठी प्रोफेसर ल्हे नावाच्या एका प्राध्यापक महाशयाची नेमणूक केलेली होती त्या चर्चातून काय किंवा हान या आमच्या दभाषाशी मी ज्या ज्या [illegible] कोरियन असोसिएशन ऑफ सोशल सायटिस्टस् या आमच्या निमत्रक सस्थेच्या मो मोठ्या पदाधिकाऱ्याशी आम्ही बोलली, त्या बोलण्यातून काय, एकच गोष्ट आमच्या लक्षात विशेषत्वाने आली ती ही, की परकीयाच्या कारवायामुळे हा देश दुभगलेला आहे आणि काय वाटेल ती किंमत देऊन तो एकत्र जोडला गेलाच पाहिजे

अखेर काहीशा मर्यादित दिवसाच्या मुक्कामात का होईना, आम्ही सामान्य - असामान्य कोरियन माणसाच्या धमनीवर बोट ठेवू शकलो आणि प्रत्येकाची धडधडणारी धमनी आम्हाला हेच ओरडून सागत होती, 'आम्ही सारे एकच आहोत आमची विभागणी कृत्रिम आहे आम्हाला परत एक व्हायच आहे '

पण हे एका अर्थाने आमच्या कोरियन भेटीचे भरतवाक्य झाले कोरिया आणि कोरियन माणसे ही काही आम्हाला एक दिवसात समजली नाहीत आमच्यातला सवाद एका दिवसात जुळला नाही आणि आम्हाला जो काही कोरिया समजला तो साहजिकच कोरियन माणसे आम्हाला जी समजली त्यातूनच.

अगदी सुरुवातीपासूनच सुरुवात करायची तर प्यन्यगच्या विमानतळापासून करायला हवी

मॉस्को ते प्यन्यग हा सुमारे दहा तासाचा प्रवास करून आम्ही प्यन्यगला उतरत होतो धड विश्राती नाही, धड झोप नाही, मनपसत चहा नाही, यामुळे खूप शिणायला झाले होते आपल्याला आपले परकीय मित्र प्रथमच भेटणार आहेत यासाठी तरी आम्ही नीटनेटके दिसलो पाहिजे, याची जाणीव फक्त आमच्यावरोबरच्या तिघा स्त्रियाना असेल

विमानतळावर आमच्या स्वागताची जय्यत तयारी होती आम्हाला

विमानकपनीच्या बसमध्ये पाहताच तीनचार तरुण पुढे आले आमचे सामानही त्यानी आम्हाला उचलू दिले नाही भराभर सामान बाहेर आणण्यात आले आम्ही खाली उतरलो डॉ किम आपल्या परिवारासह उपस्थित होते आनदाने त्यानी आमचे स्वागत केले आमची काही गैरसोय वगैरे झाली नाही ना असे विचारून आम्हाला लाजविले आम्हाला एकत्र करून आमची छायाचित्रे घेण्यात आली एका सुदर छोट्याशा कोरियन मुलीने मला एक गेदेदार फुलाचा गुच्छ दिला आमची राहण्याची काय व्यवस्था केली आहे हे मला डॉ किमने सागितले

आणि कस्टमचे दिव्य आम्हाला तिथे करावेच लागले नाही मुबईहून पुण्याला आल्यावर (विशेषत तिकीट जवळ असताना) आपण जितके सहज स्टेशनच्या बाहेर पडू शकतो तितक्या सहज आम्ही बाहेर पडलो ही मेहेरबानी आम्ही सरकारी पाहुणे असल्यामुळे झाली असेल काय, असा सशयही मला येऊन गेला

असोसिएशन ऑफ सोशल सायटिस्ट्स् या सस्थेच्या भव्य आणि सुसज्ज वसतिगृहात आमची राहण्याची व्यवस्था केली होती आमच्या दिमतीला मर्सिडीज किंवा तितकेच मोठे नाव असलेली निस्सान, अशा वातानुकूलित सुदर गाड्या होत्या

वसतिगृह प्यन्यग शहरापासून चाळीस किलोमीटर्स सहज दूर असेल आमचा दुभाषा हान याने मला सागितले या भागाचे नाव चुनसॉग

पोटातले पाणी न हालविता या गाड्यानी आम्हाला आरामात वसतिगृहावर आणून सोडले तिथेही आमच्या स्वागताला वसतिगृहातले अधिकारी होतेच या सुदर वसतिगृहाच्या चवथ्या मजल्यावरच्या खोल्यातून आमची व्यवस्था केली होती प्रत्येकाची स्वतत्र व्यवस्था तीसुद्धा एकेका खोलीत नव्हे, तर एक शय्यागृहाची खोली, एक बाहेरची बसायची किंवा अभ्यासाची खोली आणि पलिकडे त्याच आकाराचे प्रशस्त न्हाणीघर त्यात बेताच्या आकाराचे टब, थड किंवा गरम पाण्याचा शॉवर आणि इतर सर्व व्यवस्था

ऊनोक्ती (Understatement) करण्याच्या बाबतीत आमचे कोरियन मित्र चिनी लोकाच्यासारखेच शोभतात 'आमच्या वसतिगृहातली व्यवस्था फार चागली आहे अस नाही, पण तुम्ही ती गोड मानून घ्याल अस मी समजतो,' डॉ किम या वसतिगृहाबद्दल बोलताना मला म्हणाले होते

किम याचे हे शब्द आठवत असतानाच मी माझ्या निवासस्थानी येऊन

पोचलो होतो अगदी सहज माझे लक्ष खिडकीतून बाहेर गेले आणि चकित होऊन मी जागच्या जागी उभाच राहिलो. कोरियन निसर्गाचे सुदर रूप मी पाहत होतो. उच उच हिरवेगार वृक्ष, हिरवळीने आच्छादलेली जमीन, दूर क्षितिजाला टेकलेले निळे डोंगर, मधूनच जाणारे आगगाडीचे रूळ, काही अतरावर स्वच्छ सूर्यप्रकाशात चमकणारी एक-दोन छोटी घरे, बाकदार वळण घेऊन वसतिगृहाकडे येणारा रस्ता, दूरच्या शेतात दिसणारी एखादी पाणथळ जागा आणि मुख्य म्हणजे नीरव शातता.

कोरियातला देखणा वसतऋतू सागत होता, 'डॉ. किम म्हणाले असतील, की इथली व्यवस्था फार चागली नाही किंवा आणखी काहीही पण आपल्या सुदर रूपाची मोहिनी इथला निसर्ग तुम्हाला घालणार नाही अस मी म्हटल होत का तुम्हाला ?''

* * *

# 'ग्रेट लीडर'

आमचे कोरियन मित्र डॉ किम डुक सू आणि त्याचे सहकारी डॉ किम ग्वाँग बिन हे जेव्हा पुण्याला मला भेटायला आले होते, तेव्हा त्यानी उत्तर कोरियाची माहिती देणारी काही पुस्तके आम्हाला दिली होती आम्ही सर्वांनीच ती उत्साहाने वाचली हे खरे पण याच्या आधीपासूनच आम्ही कोरियाचे नेते जनरल किम इल सुग याच्याविषयी ऐकले होते आणि थोडेफार वाचलेही होते देशापेक्षाही त्याच्या नेत्याची माहिती परकीयाना असावी यावरून त्या नेत्याची थोरवी काही प्रमाणात तरी सिद्ध होते

अर्थात आपल्या देशापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे समजणारे किंवा भासविणारे नेते काही थोडे नसतील, पण किम इल सुग याच्या बाबतीत मात्र आपल्यालाही तसे वाटते जपानी साम्राज्यशहापासून आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा निश्चय करून वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी त्यानी आपल्या आई-वडिलाचे घर सोडले तेव्हापासून त्यानी या स्वातंत्र्यसग्रामासाठी आपले सर्वस्व वेचले जपान्याप्रमाणेच अमेरिकन साम्राज्यशहानाही यशस्वीपणे तोंड

दिले एवढेच नव्हे, तर स्वातत्र्यप्राप्तीनतरही स्वदेशाचा प्रत्येक बाबतीत विकास साधून स्वातत्र्याचा पाया भक्कम केला

आम्ही थोडे बारकाईने पाहिले तेव्हा आम्हाला असे दिसले, की सगळेच कोरियन स्त्री-पुरुष, तरुण मुले आणि मुली अध्यक्ष किम इल सुग याची मोठी प्रतिमा मोठ्या अभिमानाने आपल्या छातीवर मिरवीत असतात अध्यक्ष महाराजाचा उल्लेख न चुकता 'ग्रेट लीडर' असा केला जातो एकदा उल्लेख झाला तर ग्रेट लीडर म्हणावे हे ठीक आहे, पण जितक्या वेळा म्हणून त्याचा उल्लेख होई तितक्या वेळा ग्रेट लीडर म्हटले जाईच गमतीने मी आमचा दुभाषा मित्र हान याला म्हणालो, 'मला तर अस वाटायला लागलय की 'ग्रेट लीडर' हा त्याच्या नावाचाच एक भाग आहे की काय ।' हान बिलकूल न बिचकता म्हणाला, 'ग्रेट लीडर कॉम्रेड किम इल सुग याच्याविषयी आमच्या सर्वांच्याच मनात किती नितात आदर आहे हेच यावरून सिद्ध होत ' मग मात्र मला वाटल, की किम इल सुग यानी आपल्या असामान्य देशप्रेमाने आणि कर्तृत्वाने खरोखरच गाधीजींप्रमाणे आपल्या देशवासीयाच्या हृदयात अढळ स्थान मिळवले आहे आणि त्याचेच बाह्य दृष्य प्रतीक म्हणून हे लोक त्याची प्रतिमा आपल्या छातीवर मिरवीत असतात

अध्यक्ष किम इल सुग याचे व्यक्तिमत्त्व अष्टपैल आहे ते यशस्वी सेनानी आहेत तसेच ते उत्कृष्ट राजकारणपटू आहेत ज्यूच्ये हे तत्त्वज्ञान त्याच्याच नावावर प्रसिद्ध आहे या तत्त्वज्ञानावरच आपण राष्ट्राची बाधणी केली असे ते सागतात म्हणजे ते तत्त्वज्ञही आहेत त्याच्या अर्थशास्त्रीय विचाराची काही पुस्तके मी वाचली त्यात अर्थशास्त्रातल्या काही तात्त्विक प्रश्नाचाही विचार त्यानी केला आहे यावरून ते तोलामोलाचे अर्थशास्त्रज्ञ आहेत असेही म्हणायला हरकत नाही सहकाराचे तत्त्वज्ञान त्यानी नुसतेच प्रतिपादिले नाही तर प्रत्यक्षात आणले, म्हणून कृतिशील सहकारतज्ज्ञ किंवा वाटल्यास सहकारमहर्षी असेही त्याना आपण म्हणू शकू तत्त्ववेत्ता मार्क्स आणि कृतिवीर लेनिन या दोघाचा सयोग अध्यक्ष किम इल सुग याच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आहे शेती उद्योग, बाधकाम या प्रत्येक [illegible] जातीने लक्ष घालून जे मार्गदर्शन त्यानी केले, जे प्रोत्साहन दिले त्यावरच या तिन्ही क्षेत्रातले दृष्टी दिपविणारे यश उभे आहे

मॉजुदे येथे १९१२ मध्ये किम उल सुग याचा जन्म झाला वयाच्या तेराव्या वर्षी चीनमध्ये गेल्यावर किम या कोवळ्या तरुणाने कोरियन क्रातीची सूत्रे हलवायला सुरुवात केली प्रत्यक्ष कोरियामधल्या शाळेत त्याना जे शिक्षण

मिळाले त्यावर ते खुष नव्हते कोरियात त्या वेळी एक राष्ट्रीय पक्ष होता आणि एक मार्क्सवादी पक्ष होता पण खरे म्हणजे मार्क्सवादी असा एक पक्ष नव्हता अनेक होते आणि ते सगळे आम्हीच खरे मार्क्सवादी हे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात म्हणजे भाडणात गुतलेले होते या कोणाच्याच नादाला लागण्यात अर्थ नव्हता म्हणूनच चीनमध्ये जाऊन १९२६ च्या जूनमध्ये तेथील हासाँग युसुक या विद्यालयात त्यानी प्रवेश केला पण तिथल्या दोन वर्षाच्या शिक्षणक्रमातही त्याना विशेष दम वाटला नाही त्यामुळे तर ते खूपच वैतागले क्राती शिकविणाऱ्या शाळेतच त्याचे खरे शिक्षण व्हायचे असावे म्हणून मग त्यानी १९२६ मध्ये 'डाऊन विथ इपीरिॲलिझम् (DIV) ही क्रातिकारक तरुणाची सघटना स्थापन केली कोरियामधील पहिलीच खरीखुरी साम्यवादी सघटना ती हीच जपानी साम्राज्यशहाचे कोरियातून उच्चाटन करणे आणि देशाला स्वातत्र्य मिळवून देणे या सघटनेचे लगेचचे उद्दिष्ट होते कोरियामध्ये सोशॅलिझम आणि कम्युनिझमची प्रतिष्ठापना करणे आणि सर्व जगातल्या साम्राज्यवादाला मूठमाती देऊन तेथे साम्यवादाची मुहूर्तमेढ रोवणे हे तिचे दीर्घकालीन उद्दिष्ट होते कोणत्याही सघटनेची उद्दिष्टे असली तरी ही उद्दिष्टे थोरच आहेत, पण १४ वर्षाच्या तरुण सस्थापकाच्या सघटनेची उद्दिष्टे म्हणून तर ती त्या सस्थापकालाही ऐतिहासिक थोरवी देऊन जातात

सर्वसामान्य माणसाचे देशाच्या भवितव्यात काय स्थान आहे याची जाणीव किम इल सुग याना आधीपासूनच झालेली होती जनशक्तीसारखी दुसरी शक्ती नाही हे त्याना समजलेले होते दोन पक्षामध्ये चाललेल्या झगड्यामुळे त्याची ही जाणीव अधिक तीव्र झाली या पक्षनेत्यामधला महत्त्वाचा दोष म्हणजे त्याचा जनतेशी काही सपर्क नव्हता दुसरा म्हणजे सत्ता सपादन करण्यासाठी परकीय सत्तेला शरण जायलाही त्यानी कमी केले नसते म्हणून आपापसात झगडणाऱ्या मार्क्सवाद्यावरचा किम याचा विश्वासही उडाला आणि त्यानी आपले स्वत चे ज्यूचे तत्त्वज्ञान शोधून काढले रशियन साम्यवादी वापरत असलेल्या हातोडा -कोयत्याच्या चिन्हात त्यानी एक भर टाकली, ती म्हणजे लेखणीची हातोडा, कोयता आणि लेखणी या लेखणीच्या रूपाने किमनी बुद्धिजीवी लोकानाही आपल्या कक्षेत घेतले Intellectual Workers लेखणीचे हत्यार वापरणारे 'कामगार' अशीच जरी त्याची सभावना केली असली तरी आपल्या साम्यवादाला बुद्धिजीवी लोकाचे वावडे नाही, ते आपल्याला जरूर हवे आहेत हे किमनी येथे सिद्ध केले लोकाच्या निरनिराळ्या प्रश्नाना त्यानी जाहीर उत्तरे दिली आहेत अशा प्रश्नोत्तराचे एक पुस्तकही मी वाचले त्यात अर्थशास्त्रातल्या काही गहन

प्रश्नावरची चर्चाही मला आढळली ज्या प्रसिद्ध ज्यूचे मनोऱ्याबद्दल मी आधी लिहिले त्या उत्तुग मनोऱ्यासमोर ब्रॉंझचे जे तीन पुतळे आहेत त्यात एक कामगाराचा आहे, एक शेतकऱ्याचा आहे आणि तिसरा जरी मागे उभा असला तरी त्याच्या एका हातात लेखणी हे शस्त्र आहे आणि दुसऱ्या हातात पुस्तक हे अस्त्र आहे

ज्यूच्ये तत्त्वज्ञान हे अखिल उत्तर कोरियात गाजत असलेले तत्त्वज्ञान म्हणजे आहे तरी काय ? आमचे स्नेही डॉ किम इुक सू हे तर ज्यूच्ये विद्यापीठाचे कुलगुरूच, पण हे सोपे तत्त्वज्ञान समजून घ्यायला आम्हाला या कुलगुरूना भेटावे लागले नाही ते विशद करणारे पुस्तक स्वत किम जॉंग इल या सध्या पक्षनेता असलेल्या म्हणजेच किम इल सुग याच्या चिरंजीवानी लिहिलेले आहे

स्वत किम इल सुग यानी थोडक्या शब्दात आपल्या ज्यूचे तत्त्वज्ञानाचे सार सागितले आहे ते म्हणतात, ‘ क्राती आणि रचनात्मक कार्य याचे स्वामित्व सर्वसामान्य लोकाकडेच जाते तसेच क्राती आणि रचनात्मक कार्याची चेतनाशक्ती हीसुद्धा जनतेचीच आहे ’ याशिवाय त्यानी असेही म्हटले आहे की ‘माणसाच्या भवितव्याला तो स्वत‘च जबाबदार आहे एवढेच नव्हे तर, आपले भवितव्य घडविणे हेही त्याच्याच हातात आहे ’

अध्यक्ष किम यानी हे तत्त्वज्ञान राजकारण, शेती, उद्योग या क्षेत्रासह सगळीकडे कसे खुलते हे सविस्तर विशद करून सागितले आहे माझ्या दृष्टीने त्याचे खरे महत्त्व हे आहे, की या तत्त्वज्ञानाचा प्रसार करून त्यानी सामान्य माणसाची अस्मिता जागृत केली आणि सामान्य माणसे एकदिलाने एकत्र आली तर ती असामान्य कर्तृत्व करून दाखवू शकतात हे दाखवून दिले

जपानी आणि अमेरिकन साम्राज्यशहाशी केलेल्या स्वातत्र्यसग्रामात जनरल किम याच्या ज्यूचे तत्त्वज्ञानाने कोरियन जनतेत चेतना आणली आणि उत्तर कोरियापुरते मर्यादित असले तरी स्वतत्र्य मिळविले, पण त्याखेरीज या सोप्या आणि सरळ तत्त्वज्ञानाने आणखीही खूप साधले ‘या सग्रामात बेचिराख झालेल्या माझ्या देशाला परत पायावर उभे करणे ही आमच्या पुढची सर्वात बिकट कामगिरी होती’ असे किम यानी स्वत‘च म्हटले आहे नाहीतरी स्वातत्र्य टिकविणे आणि सपन्न करणे ही स्वातत्र्य मिळविण्यापेक्षाही अवघड कामगिरी आहे हे आपणाला माहीत आहेच पण किम यानी आपले तत्त्वज्ञान प्रत्यक्षात

आचरल्यामुळे या बाबतीतही त्यानी अजोड यश मिळविले.

त्यानी आपली पहिली पचवार्षिक योजना पूर्ण करताना उद्दिष्टापेक्षाही जास्त उत्पादन करून नवे उच्चाक निर्माण केले चॉलिमा हा पुराणकथेतील एक अश्व तो पख लावून वायुगतीने दौडत असे अशी ही कथा हाच आदर्श त्यानी कँगसॉन पोलाद कारखान्यातल्या कामगारापुढे ठेवला आणि चॉलीमा ज्योत पेटविली शेतकरी लोकापुढे त्यानी नुसती सहकाराची महती गायली नाही, तर चॉंगसान-री या ठिकाणी ते तत्त्व स्वत. अमलात आणून किती अमाप यश मिळवू शकते हे दाखवून दिले चॉंगसान-री या ठिकाणीही आम्ही सगळेच मुद्दाम गेलो होतो आणि छोट्या शेतकरी कुटुबप्रमुखाशी आणि कुटुबियाशी बोलताना सहकाराचे हे अनोखे रोप त्याच्या 'ग्रेट लीडरने' कसे रुजविले आणि वाढविले हे आम्हाला मागितले.

'माणूस हा स्वयपूर्ण आहे आणि आपल्या भवितव्याचा शिल्पकार आहे' हे तत्त्वज्ञान सर्व महान तत्त्वज्ञानाप्रमाणे मुळात सोपे आहे, पण ही सुप्त अस्मिता जागृत करण्यासाठी त्याला शिक्षणाची गरज आहे, हे ओळखून अध्यक्ष किम यानी शिक्षणाचा प्रसार एखाद्या युद्धप्रयत्नासारखा झपाट्याने केला कोरियात सर्वच शिक्षण विनाशुल्क आहे पण शिशुशालापासून विद्यापीठापर्यंत किम यानी जातीने लक्ष घातले त्याच्याच नावाने प्रसिद्ध असलेले किम इल सुग विद्यापीठ आम्ही पाहिले शिशुशालाही पाहिल्या. क्रेशही पाहिले विद्यापीठातील ग्रथालये समृद्ध आहेतच पण The Grand People's Study House सारखे सर्वांसाठी बाधलेले ग्रथालय कोणाही विद्यार्थ्याची दृष्टी दिपवून टाकील इतके प्रचड आहे किम इल सुग याच्याच प्रेरणेने हे ग्रथालय उभारले गेले या दहा मजली इमारतीत सध्या दीड कोटी ग्रथ असून ३ कोटी ग्रथ साठविण्याची त्याची क्षमता आहे अमेरिकन विद्यापीठातल्या ग्रथालयाप्रमाणे येथेही मागितलेले कोणतेही पुस्तक ताबडतोब तुमच्या समोर आणून ठेवले जाते पण या ग्रथालयात कोणत्याही प्रकारची फी किंवा शुल्क द्यावे लागत नाही एका वेळी बारा हजार विद्यार्थी किंवा अभ्यासक तिथे बसू शकतात मला आपले वाटले होते, की विद्या सपादन करणे म्हणजे लोखडाच्या चण्याशी मुकाबला कोणी फारसे या पवित्र स्थानाच्या वाटेलाही जात नसतील पण आम्ही प्रत्यक्ष पाहिले तेव्हा आमची एक प्रकारची निराशा झाली आणि त्यामुळे खूप बरे वाटले ! शेकडो विद्यार्थी आणि इतर अभ्यासक जागोजाग बसलेले होते आणि येणाऱ्या लोकाची रीघही थाबलेली नव्हती

किम इल सुग आपल्या सबध देशाची सर्व बाजूनी उची वाढविण्याच्या पराकाष्ठेच्या प्रयत्नात आहेत एका दृष्टीने त्याचे सुदैव असे, की उत्तर कोरियाची लोकसख्याच २ कोटींच्या आसपास आहे त्यामुळे जनतेच्या शिक्षणाप्रमाणेच आरोग्याकडेही त्याना लक्ष देता आले असेल. पण त्याचा प्रयत्न मात्र तसा निश्चित आहे कोरियन वैद्यक धरून अत्याधुनिक वैद्यकीय शस्त्राअस्त्रानी परिपूर्ण असलेले हॉस्पिटलही आम्ही बारकाईने हिंडून पाहिले तेथील सर्व सेवा विनामूल्य होती

स्वजनाच्या सास्कृतिक विकासाकडे सुद्धा त्यानी जातीने लक्ष पुरविले आहे 'पीपल्स पॅलेस ऑफ कल्चर' हे त्याचेच एक प्रतीक याशिवाय अभिनय, नाट्य, चित्रपट या क्षेत्राना त्याचे उत्तेजन आहेच एक सुदर सर्कससुद्धा आम्ही पाहिली त्यातल्या काही खेळासाठी कोरियन कलावताना आतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिली पारितोषिके मिळाली आहेत

किम याच्या मार्गदर्शनाखाली नव्या आणि जुन्या शिल्पकलेचे सुदर मिश्रण अशी अनेक देखणी बाधकामे उभी राहिली आहेत प्यन्यगची जगप्रसिद्ध व्हावी अशी मेट्रो काय किंवा तिथलीच 'आइस रिक' काय, त्याच्याच उत्साहामुळे तयार झाली

अध्यक्ष किम इल सुग याची कर्तृत्वगाथा इतक्या लहानशा अवधीत सागणे अशक्य आहे ते काम विस्तारपूर्वक एखादे शिवशाहीरच करू शकतील.

किम हे अध्यक्षाच्या कुटुबाचे नाव आहे आणि इल सुग हे जनतेने त्याना बहाल केलेले दोन शब्द आहेत इल सुग या शब्दाचा अर्थ प्रभात-तारा (Morning Star) असा होतो, पण असा जरी या शब्दाचा अर्थ असला तरी किम इल सुग याचा सूर्य मात्र मध्यान्हीच्या तेजाने अजूनही कोरियाच्या आकाशात तळपतो आहे

* * *

# राजवाडा आणि दीपगृह

सा म्यवादी देशात काय राजवाडा असतो ? आणि असला तरी तिथे राजपुत्र, राजकन्या असतात ? साम्यवादी देशात कुठला राजवाडा आणि कसले राजपुत्र आणि राजकन्या ? पण आम्ही चक्क पाहिले आहे तेसुद्धा कोरियासारख्या साम्यवादी देशात एक टोलेजग राजवाडा आणि त्यात अति आनदाने वेगळे राजऐश्वर्य उपभोगणारे राजपुत्र आणि राजकन्या एकदोन नव्हे, अनेक, असख्य राजपुत्र आणि राजकन्या

खरे पाहिले तर हा एक राजवाडा नाही दोन आहेत एक पाच मजली आणि दुसरा तेरा मजली जनतेचे भव्य अभ्यासगृह (Grand People's Study House) आणि कोरियन क्रातीचे स्मारकगृह (Korean Revolution Museum) या दोन इमारतीच्या मध्यावर हा मुलाचा राजवाडा उभा आहे एक लक्ष दहा हजार स्क्वेअर मीटर्स जागेवर तो बाधलेला असून त्याच्या पन्नास हजार स्क्वेअर मीटर्स एवढ्या जागेत ५०० प्रशस्त दालने आहेत

'द प्यन्यग स्टूडटस् अँड चिल्ड्रन्स पॅलेस' (प्यन्यगचे विद्यार्थी आणि

बालके याचा राजवाडा) या लांबलचक नावाची ही भव्य इमारत १९६३ मध्ये बांधली या राजवाड्यात राजाराणी राहात नाहीत एवढेच काय ते त्यात उणे आहे मानले तर एरवी मुलांचा राजवाडा या नावाच्या प्रासादात जे काही आगळे आणि वेगळे असायला पाहिजे ते सगळे इथे आहे

प्यन्यंगमधील शाळकरी मुलांसाठी हा राजवाडा आहे. त्यांच्या शाळा सुटल्या, की ती इथे येऊन थडकतात शाळेत नेमलेल्या अभ्यासाखेरीज इतर अनेक विषयाचा अभ्यास करण्याची इथे सोय आहे राजवाड्याच्या २०० महालातून मुले स्वतंत्रपणे किंवा गटागटाने अभ्यास करतात त्यात खगोलशास्त्र, भूस्तरशास्त्र, खनिजशास्त्र, वास्तवशास्त्र, वैद्यक, साहित्य आणि इतर सामाजिक व निसर्गशास्त्राचे विषय समाविष्ट आहेत शिवाय नृत्य, संगीत, चित्रकला, शिल्प, कशिदा इ अनेक कलाचे शिक्षणही येथे मिळते विविध शास्त्रे आणि कला याखेरीज सर्व प्रकारचे खेळ, मुष्टियुद्ध, टेबल- टेनिस, बास्केट बॉल इ. इ यांचेही प्रात्यक्षिकासह शिक्षण दिले जाते या इतर विद्या, कला, खेळ याच्यासाठी उरलेले ३०० महाल राखून ठेवलेले आहेत.

प्रत्येक विषयातले तज्ज्ञ मार्गदर्शनासाठी राजवाड्यात नेमलेलेच आहेत आणि दररोज दहा हजारापेक्षा अधिक विद्यार्थी या संधीचा फायदा घेत असतात

११०० प्रेक्षक बसू शकतील असे भव्य प्रेक्षागृह या राजवाड्यात आहे आतल्या बाजूला बांधलेले स्टेडियमही (Indoor Stadium) येथे आहे आणि ५०० प्रेक्षक तिथे बसू शकतात राजवाड्यात एक ग्रंथालयही आहे आणि त्यात हजारो ग्रंथ अभ्यासासाठी, संदर्भासाठी उपलब्ध आहेत

इथले शिक्षण हे मुलामुलींना गटागटातून मिळते त्याचप्रमाणे सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेता आल्यामुळे तेही शिक्षण त्याना मिळतेच सर्वसामान्य विषय आणि विशेष विषय यातच मुलामुलींचे गटवार शिक्षण होते विशेष विषयाच्या शिक्षणासाठी दाखल झालेले विद्यार्थी एक वर्षभर तिथे येत असतात तर विषयाचे सामान्य ज्ञान मिळविण्यासाठी आलेल्याना तीन महिन्याचा अभ्यासक्रम असतो, वाङ्मयाचे वाचन केल्यानंतर ही मुले एकत्र येऊन चर्चा करतात शास्त्रीय विषयावरही विचार-विनिमय होतो संगीताच्या मैफली होतात आणि मुले अनेक प्रकारच्या खेळात रंगून जातात सांस्कृतिक आणि खेळाचे कार्यक्रम ही मुले बाहेरही मोठ्या प्रमाणावर करतात

राष्ट्राची उभारणी, बांधणी करण्याच्या कामात ही मुले तरबेज व्हावीत,

ती ज्ञानी, गुणी आणि आरोग्यसपन्न व्हावीत आणि राजवाड्यातील सर्व सुविधा या कामी उपयोगात याव्यात याकडे कोरियन कामगार पक्षाचे (Workers' Party of Korea) बारकाईने लक्ष असते

राजवाड्याच्या बाहेरच एक चौथऱ्यावर जनरल किम-इल-सुग याचा पुतळा उभा आहे. आपल्याबरोबर हाताशी धरून दोन मुलाना घेऊन ते पुढे चालले आहेत आणि पुतळ्यातला एक मुलगा किम-इल-सुग याच्याकडे वळून कुतूहलाने पाहात आहे

पाहतापाहता आम्ही या अजब राजवाड्यात हरवून गेलो त्यातले आम्हाला काय आवडले आणि कोणते कशापेक्षा जास्त चागले होते हे सागणे कठीण आहे असा म्हणून विषय नव्हता, ज्याचे शिक्षण तिथे देण्यात येत नव्हते लहान लहान मुले कॉम्प्युटरशी खटपट करताना दिसत होती, कोणी इलेक्ट्रॉनिक उपकरणाशी झटापट करीत होती. कोणी प्रचड दुर्बिणीतून अवकाश न्याहाळीत होती कोणी चित्रकलेत, कशिदाकामात रगून गेली होती आमचे डॉ बाचल हे चित्रकला विशारद आहेत. त्यानी या किशोराची काढलेली चित्रे, अक्षरे पाहून मान डोलविली मुलींच्या कशिदा-कामाने स्त्रियाना आकर्षित केले सतत सरावामुळे जिम्नॅस्टिक्समध्ये मुलानी जे कौशल्य मिळविले होते तेही वाखाणण्यासारखे होते एका चिमुरड्या मुलाने हवेत दुहेरी कोलाटी उडी घेऊन आम्हाला स्तिमित करून टाकले. चुकले तर दुरुस्त करायला, उत्तेजन द्यायला त्याचा शिक्षक तिथे उभा होताच

समूह कार्यक्रमात ही मुले किती तयार आहेत ते आम्ही नतर प्रेक्षागृहात पाहिले एखाद्या परीकथेतल्या दृश्यासारखा देखणा पडदा वर गेला आणि कार्यक्रम सुरू झाला Bumper Crop visits our village 'आमच्या गावात भरघोस पीक येते' हे नृत्यनाट्य पाहिले आणि तसेच Children of Konguryo कॉगुर्योची मुल हेसुद्धा ऑर्केस्ट्रा हा प्रकार मला समजत नाही, पण सगळे त्यावर खूष होते असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ छा हे जातीने आम्हाला हा कार्यक्रम दाखविण्यासाठी उपस्थित होते 'हे समूह कार्यक्रम ही मुले याच तयारीने बाहेरच्या प्रेक्षागृहातही करतात आणि व्यावसायिकाप्रमाणे पैसे मिळवितात स्पर्धेतही टिकून त्यानी पुढे यावे आणि स्वावलबी व्हावे अशी आमची उमेद असते' डॉ छा यानी आम्हाला सागितले

आम्ही तिथून बाहेर पडलो तेव्हा वाद्य सगीताचे मधुर स्वर वातावरणात

रेंगाळत होते येताना आम्हाला मुलाच्या राजवाड्याची माहिती देणाऱ्या सुदर रगीत पुस्तिका देण्यात आल्या होत्या त्यातली एक कविता होती

*आकाश निळे आहे आणि आम्ही आनदात आहोत*
*वाद्याचा आवाज सगळीकडे दूरवर पोचतो आहे*
*आमची जन्मभूमी किती सुदर आहे*
*आशा आणि सगती यानी काठोकाठ भरलेली ही आमची जन्मभूमी*

या कवितेचे नाव होते **'आम्ही साऱ्या जगात सुखी आहोत'** - आणि त्यानी साऱ्या जगात सुखी का नसावे ?

या राजवाड्यातून एका हाकेच्या अतरावर असलेल्या जनतेच्या अभ्यासगृहाचा (Grand People s Study House) उल्लेख अध्यक्ष किम-इल-सुग याच्याविषयी लिहिताना मी केला होता या दोन सस्था उभ्या करण्यात अध्यक्षाचा एक स्पष्ट उद्देश होता प्रत्येक कोरियन नागरिकाचे व्यक्तिमत्त्व सर्व बाजूनी फुलले पाहिजे, प्रत्येक कोरियन स्वावलबी, स्वयपूर्ण झाला पाहिजे हा तो उद्देश खेळ, आरोग्य, सामान्यज्ञान, आधुनिक शास्त्रीय ज्ञान, सर्व प्रकारच्या कला, सगीत, नाट्य, वाड्मय याच्या विकासासाठी एके ठिकाणी सर्व सुविधा तर उच्च ज्ञान, विद्या सपादन करण्याची परिपूर्ण सधी सर्व प्रकारच्या आधुनिक तत्रासह, उपकरणासह दुसऱ्या ठिकाणी पाश्चात्य देशातल्या प्रगत शास्त्राचा अभ्यास करण्यात नेहमी येणारी अडचण म्हणजे भाषेची पण ही अडचण जनता अभ्यासगृहात सहज दूर करण्यात आली आहे भाषातज्ज्ञाच्या मदतीने तुम्हाला हवे असेल ते ज्ञान कोरियन भाषेत अगदी तुमच्या कानात सागण्यात येते मोठाल्या सभागृहातून आम्ही पाहिले तेव्हा तिथे महत्त्वाच्या विषयावर जिज्ञासूकरिता तज्ज्ञाकडून जाहीर भाषणाची व्यवस्था केलेली होती

आपल्या राष्ट्राध्यक्षाचे नाव प्रेमाने देऊन सुरू झलेले 'किम-इल-सुग विश्वविद्यालय' (Kim Il Sung University) हे तर एक प्रचड ज्ञानपीठ आहे 'आमच्या या विद्यापीठाचे ठळक वैशिष्ट्य हे, की हे जनतेचे विद्यापीठ आहे स्वत चा विकास करून घेण्यासाठी आमची मुले येथे पूर्णपणे विनाशुल्क शिकू शकतात आमच्या देशाची राष्ट्रीय सस्कृती विकसित व्हावी, सबध जगाला तिने आपला प्रकाश द्यावा आणि आमची पितृभूमी बलशाली करावी असा विद्यापीठाचा उद्देश आहे भाडवलशाही देशातल्या विद्यापीठातून श्रीमत मुलामुलीच्या अभ्यासाची सोय असते आणि हे लोक गरीब जनतेची पिळवणूक

करीत असतात याउलट आमच्या विद्यापीठात श्रमिकाच्या, कामगाराच्या मुलामुलींना महत्त्वाचे स्थान आहे जनतेच्या सेवेसाठी विविध क्षेत्रात उपयोगी पडणारे, राष्ट्राच्या उभारणीसाठी आवश्यक असलेले असे तरुण कार्यक्षम नागरिक येथे तयार होतात ' या शब्दात स्वत किम यानी या विद्यापीठाचे वैशिष्ट्य सागितले आहे

किम-इल-सुग विद्यापीठास मोठा इतिहास आहे प्यन्यग येथील मोरन या ऐतिहासिक टेकडीच्या पायथ्याशी हे विद्यापीठ १ ऑक्टोबर १९४६ ला स्थापन झाले. आदल्याच वर्षी किम याच्या नेतृत्वाखाली जपानी साम्राज्यशहाचे जोखड झुगारून देण्यात कोरियाने यश मिळविले होते लगेचच अशा प्रकारे उच्च विद्येची मुहूर्तमेढ रोवली जावी ही लक्षणीय घटना होती. क्राती महत्त्वाची असतेच पण क्रातीनतर मिळालेले स्वातत्र्य टिकविणे, मजबूत करणे, विकासाला सामोरे जाणे यासाठी उच्च ज्ञान, प्रगत विद्या याना शरण जाण्याशिवाय अन्य मार्ग नाही हे किमनी ओळखले बिकट आर्थिक परिस्थितीतही त्यानी शिक्षणाला अग्रक्रम दिला

१९४६ मध्ये स्थापन झालेल्या या विद्याकेंद्राचा किम याच्या जाणत्या नेतृत्वाखाली झपाट्याने विकास करण्यात आला शिक्षणक्षेत्रातल्या कोणाही माणसाला स्तिमित करून टाकील अशी ही कामगिरी आहे

खरे म्हणजे आमच्या कार्यक्रमात किम-इल-सुग विद्यापीठाची भेट ठरलेली नव्हती पण आम्ही सर्वांनी आग्रहच धरला शेवटी या विद्यापीठाला आम्ही एक धावती भेट दिली

किम-इल-सुग विद्यापीठात १४ विद्याशाखा, ८० पेक्षा अधिक अध्यासन, ५०० पेक्षा अधिक प्रयोगशाळा, ८ सशोधन सस्था आणि ५० हून जास्त सशोधन-दालने आहेत मध्यभागी विद्यापीठाची पुराणी पण भव्य इमारत आणि दोन्ही बाजूला दोन उत्तुग इमारती त्यातली सामाजिक शास्त्राच्या अभ्यासासाठी बाधलेली २२ मजली इमारत पाहून आम्हा समाजशास्त्रज्ञाची तब्येत विशेष खूष झाली हे सागायला नकोच मला भेटण्यासाठी अर्थशास्त्र विषयाचे प्रमुख व एक प्राध्यापक आले होते त्याच्याकडून पुरेशी माहिती मला मिळविता आली नाही हे खरे पण केवळ अर्थशास्त्रावर दोन लाखापेक्षा अधिक ग्रथसपत्ती त्यानी जमविली आहे असे मला त्यानी सागितले या पुस्तकाची कोरियन भाषेत भाषातरे करण्याची क्षमता असलेले तज्ज्ञही तिथे आहेत हे महत्त्वाचे वाटले

६०० वर्गातून १२,००० पेक्षा अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी येथे अभ्यास करतात विद्यार्थी सख्येच्या जवळजवळ एक तृतीयाश म्हणजे ३५०० च्या आसपास वेगवेगळ्या पातळ्यावरचे प्राध्यापक येथे नेमलेले आहेत. हे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण (Teacher-Student Ratio) पाहून कोणताही शिक्षणतज्ज्ञ समाधानाने मान डोलवील

अभियात्रिकीचे वेगळे महत्त्व लक्षात घेऊन किम चीक पॉलिटेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली त्याचप्रमाणे इथे शेतकी विद्यापीठ आणि वैद्यक विद्यापीठ याचीही स्वतत्र उभारणी केलेली आहे एक नॅचरल म्युझियम आहे, एक प्रकाशन-गृह आहे, एक छापखाना आहे, प्रात्यक्षिकासाठी व प्रशिक्षणासाठी यत्रशाळा आहे, एक रासायनिक पायलट प्लँट आहे, वनस्पतींचे उद्यान (Botanical Garden) आहे, जीवशास्त्रासाठी प्राण्याची उपज करण्यासाठी प्राणी- उद्याने आहेत विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी भव्य वसतिगृहे आहेत, भोजन-गृहे आहेत, स्वास्थ्य-केंद्रे (Welfare Centres) आहेत आणि हॉस्पिटलही आहे

सर्व आधुनिक शास्त्रे, विद्या, कला याच्या सर्वांगीण विकासासाठी १७० महाविद्यालये योजनापूर्वक सबध देशामध्ये विखुरलेली आहेत. त्यामुळे त्याच्या आसपासच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना अशा विद्याकेंद्राचा विशेष उपयोग करून घेता येतो

उत्तर कोरियात ज्या विषयासाठी स्वतत्र विद्यापीठ किंवा महाविद्यालय नाही असा विषय नाही बाधकाम आणि बाधकामाची साधने, रेलगाड्या, छोटे उद्योग, व्यापारविषयक अभ्यास याची महाविद्यालये, किम ह्याग जिक विद्यापीठासारखी शिक्षक-शिक्षण विद्यापीठे, चित्रपट, सगीत, नृत्य, फाईन आर्टस, छपाई, शारीरिक शिक्षण, विदेशी विद्या, आतरराष्ट्रीय राजकारण शिकविणारी विद्यालये किंवा विद्यापीठे याची गर्दी प्यन्यमध्ये आढळते नोकरी किंवा काम करून शिकणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी याच्या शिक्षणाची तसेच शासकीय नोकर व अधिकारी, कामगार याच्या प्रशिक्षण-शिक्षणाची व्यवस्थाही या शिक्षण-योजनेत आहे सैनिक शिक्षणाची विद्यालये अर्थातच आहेत 'युनिव्हर्सिटी ऑफ नॅशनल इकॉनमी' किंवा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे शिक्षण देणारे एक स्वतत्र विद्यापीठ आहे आर्थिक व्यवस्थापनाचे शास्त्र येथे शिकविले जाते चित्रपटगृह, परकीय भाषा-शिक्षण केंद्र, किम-इल-सुग यानी सुरू केलेली तेइयन पद्धत किंवा चाँग री पद्धत याचा अभ्यासक्रम इत्यादी सव सुविधानी हे अर्थव्यवस्था शिक्षण केंद्र

सज्ज आहे

अखिल कोरियन जनतेचा सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकास करून तिला स्वतंत्र, आत्मनिर्भर करणे हे किम याच्या ज्यूचे तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आहे लहानासाठी उभारलेले आधुनिक राजवाडे आणि मोठ्यासाठी उभारलेली आधुनिक विज्ञानाच्या प्रकाशाने झगमगणारी दीपगृहे याच ध्येयाकडे कोरियन जनतेला नेत आहेत

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मु-प्रपत्र
क्र. ७५८
२८४२२७
संदर्भ शाखा

# किमयाघर आणि प्रकाशाची झाडे

यॉं न्यगच्या मेट्रोला म्हणजे भुयारी आगगाडीच्या स्थानकाला मी मयसभा असे म्हटले होते आपल्या रेल्वे स्टेशनावर ज्या ज्या गोष्टी आपल्या नजरेला खुपतात त्यातली एकही आम्हाला या अद्भुत ठिकाणी आढळली नाही इथेही तसेच असणार असे म्हणून तुम्ही जर केळ्याच्या साली, भेळीचे कागद, तुबळ गर्दी, माणसाची खेचाखेच, धक्काबुक्की, इतस्तत पसरलेले, बसलेले प्रवासी अशा गोष्टींची अपेक्षा करीत असाल तर तुमची निराशाच होईल यातले काही आम्हाला आढळले नाही म्हणून विचारावेसे वाटल, 'निदान इथल्या गाड्या तरी वेळेवर येत नाहीत ना हो ?' तेवढेच एक साम्य आढळले असते तर बरे वाटले असते मनाला, पण तेही नव्हते त्यामुळे तर आमची चागली निराशा झाली

पण या मेट्रोचे जे रूप आम्ही पाहिले त्यामुळे इतर गोष्टींचा विचारही मनात ठरायला फारसा अवधी नव्हता आम्ही ज्या एस्कलेटरवरून खाली स्थानकावर उतरलो होतो तोसुद्धा किती वेगळा होता पायऱ्याच्या दोन्ही बाजूला

ज्या काचाच्या छोट्या लाबलचक भिती होत्या त्यातून फिकट निळा प्रकाश झिरपत होता अणि आपण ॲलिस जात असेल अशा निळ्या बोगद्यातून खोल पाताळात उतरत आहोत असे वाटत होते पण खरे म्हणजे आम्ही नुसते उतरत नव्हतो तरगत तरगत उतरत होतो

फलाटाकडे लक्ष गेले तेव्हा आमच्या लक्षात आले की ते सगळे चकचकीत ग्रॅनाइटचे आहेत बाजूला असलेले प्रशस्त जिने ग्रॅनाइटचे तरी होते, नाही तर सगमरवरी होते आणि वर आढ्याला सुदर, नाजूक पण प्रचड झुबरे होती आणि ती प्रकाशाने न्हाऊन निघाली होती त्यातून ओसडून प्रकाश खाली उतरून फलाटावर पसरला होता आणि झुबरे तीसुद्धा लहान नव्हेत आणि उगाच औषधापुरतीच नव्हेत तर झुबराची रागच्या राग- स्टेशनच्या छतालासुद्धा सुदर नक्षीकाम केलेले होते फलाटापलीकडचे बदिस्त आवार खूपच प्रशस्त आणि त्यातही थोरल्या वटवृक्षाच्या बुध्यासारखे गोलाकार किंवा हाच आकार कटाळवाणा होऊ नये म्हणून षट्कोनी किंवा अष्टकोनी स्तभ याच्या आधारावर विसावलेले पूर्ण ग्रॅनाइटमध्ये घडविलेले प्रत्येक स्तभावर प्रकाशाचे छोटे छोटे झुबराचेसुद्धा प्रकार आणि सगळी काचेची नाहीत तर काही आधुनिकसुद्धा स्टीलच्या फळाचे घोस त्यातूनही ठिबकणारा प्रकाश स्तभाना जोडणाऱ्या देखण्या बाकदार कमानी

या किमयाघरातली आणखी एक नवलाई म्हणजे स्थानकाच्या लाबलचक भितीवर रेखाटलेली दृश्ये एका निसर्गचित्रात दोन्ही बाजूला सुरूच्या वृक्षाच्या रागा आणि हिरवळ घेऊन मधून सथपणे वाहात जाणारी तायडॉग किंवा तुम्हाला आवडेल त्या नावाची नदी किंवा दुसऱ्या भित्तिचित्रात तुम्ही पोतॉग नदीच्या काठावर उभे आहात आणि पलीकडील उच उच इमारतींची राग प्यन्यगच्या आकाशाच्या सीमा आखताना दिसते अनेक चित्रमालिकातून आपल्याला कोरियन स्वातत्र्ययुद्धाची दृश्ये दिसतात आणि आपल्या सहजच लक्षात येते, की सेनादलाला बरोबर घेऊन आपल्याला सामोरा येणारा तरुण, देखणा सेनानी म्हणजे अर्थातच जनरल किम इल सुग - ग्रेट लीडर ब्रॉझ रिलीव्हो, मोझेइक अशा शैलीत रेखाटलेल्या या चित्रमालिका आपण एखाद्या रेल्वे स्थानकावर उभे आहोत याची जाणीव नाहीशी करतात आणि ते बरोबरच असते कारण आपण प्रचड गर्दीच्या ताणामुळे उसविणाऱ्या, माणसाच्या धक्काबुक्कीमुळे जीव कासावीस करून टाकणाऱ्या रेल्वे-स्टेशनात उभे नाहीच मुळी उलट प्यन्यगच्या मेट्रोमधल्या किमयाघरात बिनधास्त शाततेत उभे आहोत आणि समोरच्या चित्रमालिका

कुतूहलाने न्याहाळतो आहोत

पुण्याला गेल्यावर प्रा. चाद याना सागितले पाहिजे 'तुम्ही मॉस्कोच्या भुयारी गाड्या आणि तिथली स्थानके याचे कौतुक केलेत ते बरोबर होते ती भव्य आहेत. स्वच्छ आहेत अनेक आहेत, पण प्यन्यगची मात्र त्याना फारच भारी आहेत ती सुदरही आहेत प्रत्यक्ष पाहा आणि बोला '

प्यन्यगच्या फेरफटक्यात आम्ही आणखीही अजब ठिकाणे पाहिली 'चँगवॉग हेल्थ कॉम्प्लेक्स' (चँगवाँग आरोग्य केद्र) हे त्यातले आणखी एक अत्याधुनिक सामग्रीने काठोकाठ भरलेले हे प्रचड आरोग्यकेंद्र आहे. याच्या आकाराची कल्पना यावी म्हणूनच सागतो, की याचा विस्तार ३८,००० चौरस मीटर आहे आणि येथील केवळ स्नानगृहात दर दिवशी दहा हजार लोकाची सचैल स्नानाची सोय आहे.

कावळ्याची अघोळ करायची असेल तर या स्नानगृहात जाण्यात मतलब नाही स्वतत्र वैयक्तिक स्नान-गृहात अघोळ करायची असेल तर थोडे अधिक मूल्य द्यावे लागते इतकेच म्हणून थोडेसे पैसे आणि पुरेसा किंबा असेल तितका वेळ घेऊन तिथे जायला पाहिजे. प्रो ल्हे हे आमचे प्राध्यापक या केंद्रावर इतके खूष आहेत, की शक्य तेव्हा आठवड्यातून एकदा, नाही तर दहा दिवसानी एकदा नक्कीच वेळात वेळ काढून ते इथे येतात सॉवूना बाथला बाष्प-स्नान म्हटले तर काही बिघडत नाही हे खरे पण सॉवूनाच्या स्वरातच एक न्यारी गमत वाटली तिथल्या कोरियन सेवकाने त्याच्याच भाषेत अनेक सूचना केल्या त्यातले काहीही समजणे मला शक्य नव्हते पण सगळे समजले असल्यासारखी मान हलवीत मी माझ्या बदिस्त खोलीत गेलो आतील तपमान १२० सेंटिग्रेड होते वेळ मोजण्यासाठी वाळूचे माप समोर ठेवले होते पण त्यातली वाळू वरून खालच्या मापात पडतच नव्हती असे वाटत राहिले १२० चा परिणाम ! क्षणार्धात घामाने निथळायला लागल्यावर माझ्या लक्षात आले, 'अगदी तशीच वेळ आली तरी हरकत नाही प्रथमोपचाराची व्यवस्था बाहेर जय्यत तयार आहे ' अशी सूचना मी इग्रजीत वाचलेलीच होती

सार्वजनिक स्नानगृहात पाणी आणि जलद नादलहरीच्या साहाय्याने मसाज करायची व्यवस्था होती गरम वाफ आणि थड पाण्याच्या स्नानाची शॉवर्सची आणि विश्रातीची सोय होती या स्नानापूर्वी शेजारच्या प्रशस्त खोलीत निरनिराळ्या उपकरणाच्या साहाय्याने व्यायाम करायचा. पाण्यात जी उपकरणे

बसविलेली असतात ती स्नानगृहाच्या भिंतीपासून निघणाऱ्या सुपरसॉनिक लाटांनी थरथरतात. त्यांचा आणि तळापासून येणारे बुडबुडे यांचा शरीराच्या मर्दनासाठी उपयोग होतो ताणलेले, शिणलेले स्नायू सैल पडतात .. आणि एकदरीत छान वाटते पुढच्या रविवारी परत येथे येऊन हा सुखदायक अनुभव घेईपर्यंत जगण्यास काही हरकत नाही, असे या सचैल स्नानानतर वाटत असले पाहिजे मला शाळेत वाचलेल्या छोट्या कवितेची आठवण झाली आणि तिच्याप्रमाणेच वाटले. 'देव आपल्या ठिकाणी स्वर्गात आहे आणि जगाचे एकदर ठीक चालले आहे !'

या आरोग्यधामात ऑलिंपिक आकाराचा देखणा पोहण्याचा तलावही आहे पाण्याचे तपमान वर्षभर नियत्रित ठेवले असते त्यामुळे त्याचा कधीही उपयोग करता येतो जलतरण-स्पर्धा पाहण्यासाठी २००० प्रेक्षकाची आरामशीर व्यवस्थाही येथे केली आहे स्त्रियासाठी फेस- मसाज आणि केसाची प्रसाधना याची व्यवस्था आहे पुरुषाना तिकडे फिरायला मज्जाव होता आणि पुरुषी मुखमर्दनाची (Face Massage) सोय नसली तरी मला या सगळ्या केद्राचे कौतुक वाटले ते अशाकरता, की सामान्यातील सामान्य स्त्री-पुरुषानासुद्धा तेथील सेवा परवडण्यासारख्या होत्या नीचभ्रू स्त्रियानी आपल्या भुवया उच आणि बाकदार करून घेऊ नयेत किंवा एखाद्या साध्या कामगाराने सॉवूनामध्ये गरम वाफेच्या शालीत सर्वांग शेकून घेण्याची चैन करू नये असे थोडेच आहे !

कोरियन क्राती ही तशी काही फार जुनी नाही अवघी तीस वर्षाची आहे तसच तिचा इतिहास फार दीर्घकालीन आहे, असेही नाही खरे पाहिले तर हा इतिहास जनरल किम इल सुग याच्यापासूनच सुरू होतो, पण या क्रातीची आणि स्वातत्र्याची इतकी म्हणून स्मारके आम्ही पाहिली, की या लोकाना स्मारकाचा इतका सोस कसा याचे नवल वाटले पण हा कदाचित अध्यक्षाच्या योजनेचा भाग असावा स्वातत्र्ययुद्धाची महती नव्या पिढीच्या मनावर ठसविल्याशिवाय ज्यूचे तत्त्वाप्रमाणे नवा कोरियन तरुण घडविता येणार नाही, असा विचार यामागे असला पाहिजे आणि ही स्मारके पाहण्यासाठी कोरियन मुलामुलींची, तरुणतरुणींची जी गर्दी आम्ही ठिकठिकाणी पाहिली त्यावरून अध्यक्ष किम आपल्या उद्दिष्टात यशस्वी झाले असले पाहिजेत आजच्या पिढीतल्या युवक-युवती या ज्यूचे मत्राने भारल्यासारखे वाटतात आणि शेती, उद्योग, रचना, बाधकाम या क्षेत्रात नवेनवे उच्चाक निर्माण करताना दिसतात

यातलेच आम्ही पाहिलेले एक भव्य स्मारक म्हणजे 'कोरियन

रेव्होल्यूशन म्युझियम'- कोरियन क्रांतीचे स्मारक. ५४,००० स्क्वेअर मीटर्स जागेत आणि ९० विस्तीर्ण दालनातून हे प्रदर्शन मांडलेले आहे बारीक बारीक तपशीलासह, नेमक्या, वेचक वस्तू, चित्रे यांचे साहाय्य इथे घेतलेले आढळले. भव्य आणि सुबक, प्रचंड आणि रेखीव ही तर कुठल्याही कोरियन प्रदर्शनाची वैशिष्ट्ये असतातच. आणि ती इथेही होती

हे सर्व लक्ष्यवेध करणारे होते पण जपानी गनिमाच्या विरुद्ध लढलेल्या क्रांति-युद्धातील रोमहर्षक प्रसंग दाखविणारी चक्राकार चित्रमालिका (Circurama) मंत्रमुग्ध करून टाकणारी होती ऐतिहासिक पोचॉन्बो लढाईचे दृश्य आम्ही पाहिले पुढच्या अमेरिकन गनिमाशी घडलेल्या 'उंची १२११ (Height 1211)' या धुमश्चक्रीत या गनिमांना जबरदस्त तडाखा बसला ही दुसरी चक्राकार चित्रमालिका हलणारी, त्रिमिती दर्शविणारी चित्रे आणि त्याच चित्राचा खाली राहिलेला स्थिर भाग ही इतकी बेमालूमपणे साधून घेतली होती की, त्या दर्शनाने डोळे चक्रावून गेले ही कला असो, कुसर असो, आम्हा सगळ्यानाच तिने थक्क करून सोडले अशाच 'लिबरेशन वॉर म्युझियम' इथे पाहिलेला पॅनोरमाही अविस्मरणीय होता तायजॉनच्या मुक्तीची लढाई त्या दृश्यामध्ये चित्रित केली होती चॉन-सुगच्या ऐतिहासिक स्मारकात जनरल किम यांच्या क्रांति-जीवनातील दिनक्रमाचे दर्शन हुबेहूब मानवी दिसणाऱ्या पुतळ्यांच्या सहाय्याने दाखविले आहे स्वातंत्र्ययुद्धाची सूत्रे ज्या ठिकाणाहून जनरल किम यांनी १९५१ सालापासून हलविली तेथील सर्व जीवनाचे हे प्रत्यक्ष दर्शन कमालीचे स्फूर्तिदायक वाटले

पण या स्मारकातून पाहिलेल्या या प्रसंगदृश्यांचे जिवंत दर्शन केवळ शब्दांच्या साहाय्याने सांगणारच कसे ? तिथल्या चित्रांचे एक प्रदर्शनच मांडले तर कदाचित त्यांचे सौंदर्य अधिक जाणवेल

'क्रेश' या संस्थेला आपल्याकडे पाळणाघर असे बहुधा म्हणत असावेत पण पाळणाघर या शब्दावरून क्रेश म्हणजे काय हे मात्र समजत नाही रशियातल्या 'क्रेश' बद्दल मी वाचले होते, पण कोरियात आम्ही क्रेश प्रत्यक्ष हिंडून पाहिले खरे म्हणजे क्रेशला शिशुगृह असे म्हणायला हवे कारण ही छोटी मुले आपल्या आई-वडिलांपासून वेगळी इथे येऊन राहतात

रविवारी त्यांना त्यांच्या आया घरी स्वतःजवळ राहायला घेऊन जातात, पण उरलेला आठवडाभर ही मुले क्रेशमध्येच राहतात

इतर ठिकाणी आम्हाला जसे तिथले प्रमुख स्वागतासाठी भेटायला येत त्याप्रमाणे या क्रेशच्या बाहेरच एक हसतमुख बाई आम्हाला भेटली कोरियन सपातात पाय सरकवून आणि अगाभोवती स्वच्छ पाढरे गाउन्स घालून आम्ही सगळ्या क्रेशची पदयात्रा केली

लहान लहान वयाची पाचशे सहज असतील अशी ती मुले नाचत, गात आणि मुख्यत खेळत होती, काही अभ्यासही करीत होती त्याचे कपडे इतक्या प्रकारचे आणि इतक्या सुदर सुदर रगाचे होते की, दृष्टी अगदी सुखावून गेली नकट्या नाकाची, थोड्याशा बारीक डोळ्याची पण रगाने अतिशय गोरी. काही तर अगदी पिठासारखी नाक आणि डोळ्याचे रगीत ठिपके असलेल्या सुदर छोट्या बाहुल्यासारखी एखाद दुसरा गोधळलेला, हरवलेला वाटणारा चेहरा सोडला तर सगळीच बेटी आनदात होती ज्याना थोडेफार समजायला लागले होते ती मुले तर आमचे स्वागतही करीत होती निरनिराळ्या प्रकारच्या लहान मोठ्या खेळण्याची तर तिथे अक्षरश चगळच होती का असणार नाही ? ग्रेट लीडर आजोबा (किम इल सुग) आणि डिअर लीडर काका (किम जाँग इल) या दोघानी खूपच म्हणजे शेकडो निरनिराळ्या प्रकारची खेळणी मुळी त्याना भेट म्हणूनच पाठविली होती फुलराणीसारखी एक आगगाडीही त्यात होतीच आणखी कितीतरी प्रकार होते या क्रेशला स्वत अध्यक्ष किमनी त्याच्या सुरवातीपासून भेटी दिल्या होत्या आणि त्याच्या विकासासाठी वैयक्तिक मार्गदर्शन केले होते असे हेडबाईनी आम्हाला मोठ्या अभिमानाने सागितले

दिवसाचे चोवीस तास ही मुले तिथे राहणार म्हणजे अथपासून इतिपर्यत त्याची काळजी तिथे घेतली जात होती त्याच्या जेवण खोल्यासुद्धा आम्ही पाहिल्या छोट्या वाद्यावर त्यानी छेडलेले सगीताचे सूर ऐकले त्यानी काढलेली सुदर रगीत चित्रे पाहिली नतर त्याची शय्यागृहेही पाहिली जेवणाची छोटी टेबले, खुर्च्या, छोटेखानी बिछाने हे सगळ पाहून फार पूर्वी वाचलेली पण कायम लक्षात राहिलेली तीन अस्वलाची गोष्ट आठवली आणि मुख्य म्हणजे त्यातले गोडस दिसणारे बाळ अस्वल तर आठवलेच

'या इथल्या मुलाच छान आहे पण इतर सगळीकडे जी छोटी आहेत त्याच काय ?' असा प्रश्न माझ्या मनात आला आमच्याकडे ६०,००० च्या आसपास असे क्रेश आहेत आणि त्यातून शहरातल्याच काय, खेड्यापाड्यातल्या मुलाचही सगोपन आणि शिक्षण आम्ही करतो खर्च शासन करते ' बाईनी सागितल

सुदर झुपकेदार झुबरे अर्थातच या क्रेशच्या इमारतीतही होती कवी नसल्यामुळे परीकथा हा माझा प्रात नाही पण क्रेशमधल्या त्या झुबराकडे पाहून

मात्र मला वाटले, रात्री या झुबराना प्रकाशाची झाडे बनविणारे त्यातले लोलक सकाळी मात्र सुंदर लहान मुले होऊन या क्रेशमधे उतरतात आणि आपल्या किलबिलाटाने तिथला परिसर गजबजून टाकतात - परीकथेत काय अशक्य आहे ?

* * *

# अभंग कोरियाचे स्वप्न

आमच्या कोरियन मित्राशी बोलताना अनेकदा दुभंग झालेल्या कोरियाचा उल्लेख होत असे या विषयावर बोलताना बहुतेकजण बहुतेकवेळा भावनाप्रधान होत यात काही विशेष आश्चर्य नव्हते पण मला आश्चर्य वाटले ते याचे, की परकी सत्तानी विभागलेला आपला देश एक होणार आहे, दुभगलेला कोरिया परत अभग होऊन जगातले एक सामर्थ्यशाली राष्ट्र होणार आहे, याबद्दल कोणाच्याही मनात फारशी शका दिसली नाही अध्यक्ष किम इल सुग याना एकतेचे जे स्वप्न साकार करायचे आहे, ते सर्व देशबाधवाना बरोबर घेऊन करायचे असल्यामुळे सगळ्याच्या मनात एकतेची ईर्षा, तळमळ सदैव जागृत असणे फार महत्त्वाचे आहे

आमचा दुभाषी मित्र हान याच्याशी बोलताना तर या एकतेचा प्रश्न वारवार डोके वर काढीत असे मग एकदा त्याने सागितले, की आपण सगळे प्रत्यक्षच 'डिमार्केशन लाइन' (फाळणीची रेषा) पाहायला जाणार आहोत हीच रेषा तेव्हा ३८ वी समातर रेषा (38 th Parallel) म्हणून प्रसिद्धी पावली होती

३८ व्या अक्षांशावर पूर्व- पश्चिम जाणाऱ्या या रेषेने कोरियाचे दोन तुकडे करण्यात आले

'साम्राज्यवादी अमेरिकन लोकानी आमची फाळणी केली चान दु हान हा दक्षिण कोरियाचा प्रमुख या साम्राज्यशहाच्या हातातले बाहुले (Puppet) आहे' असे मला सगळेच लोक सारखे सागत होते. आमच्या हान या दुभाषाला तर चान दु हानची भलतीच ॲलर्जी होती थोडी चौकशी केल्यावर माझ्या लक्षात आले, की दक्षिण कोरियाचा अध्यक्ष चान दु हान आणि आमचा हान याचे नाव एकच आहे म्हणजे आमच्या हानचे नावही चान दु हान हेच आहे पण बेट्याने त्यात शब्दाची उलटापालट करून ते हान चान दो असे करून घेतले आहे हानने जेव्हा ही चलाखी कबूल केली तेव्हा मी म्हणालो, 'बेटा, काहीही हरकत नाही त्या अमेरिकन बाहुल्याचे आणि तुझे नाव एकच असणे मलाही आवडले नसते. पण माझी एक शका मात्र आहे '

'काय बुवा ?'' मी त्याला कसा पकडणार असे याची हानला बिलकुल शका आली नव्हती

—'खर सागायच तर शका नाही खात्रीच आहे म्हणेनास तुम्ही म्हणता त्याप्रमाणे अमेरिकन लोकानी कोरियाची विभागणी केली हे खरे असेल, पण इतिहास अस सागतो, की जपानी लोकानी तुमच्या देशाचे तुकडे अगोदरच केलेले होते खर की नाही ?' मी म्हणालो.

आणि ते खरच होत पण तस असल तरी जपान्यापेक्षा कोरियन लोकांना अमेरिकन साम्राज्यशहाचा राग जास्त दिसतो जपानी हे काही झाल तरी आशियाई लोक आहेत, तर अमेरिकन हे परके, उपटसुभ आहेत हे याचे एक कारण असावे दुसरे आणि महत्त्वाचे कारण हे की जपान्यानी केलेल्या विभाजनावर अमेरिकनानी शिक्कामोर्तब केले आणि उत्तर-दक्षिणेमधली दरी वाढविण्याचा उद्योग हे अमेरिकन मनसोक्त करीत आहेत

[illegible] दर्शन आम्ही पॅनमुजॉमला गेलो तेव्हा झाले

रात्रीच्या गाडीने प्यन्यगहून निघून तायसॉगला पोचलो तिथून तायसॉगला पोचायला पाच एक तास सहज लागले असतील प्रत्यक्ष गाडीतली व्यवस्था उत्तम होती, परतु गाडीची चाल मात्र अगदी सथ होती.

कैसाँग हे उत्तर कोरियाच्या दक्षिण सीमेवरील गाव आहे तिथल्या एका

हॉटेलमध्ये उतरण्याची आमची व्यवस्था करण्यात आली होती ती नेहमीप्रमाणे उत्तम होती सर्व हॉटेल्स सरकारी मालकीची असूनही व्यवस्था इतकी चोख कशी याचे आम्ही खूप कौतुक करीत होतो तेवढ्यात हानच्या बोलण्यावरून लक्षात आले, की गाडीने येताना दाखविलेल्या सथपणा आता सपला असून नेहमीच्या वेगाने पुढील हालचाली करावयाच्या आहेत

न्याहारी आटपून आम्ही आपापल्या वाहनापाशी येऊन सज्ज झालो 'आपण पॅनमुजॉमला निघालो आहोत ' हानने सागितले. पॅनमुजॉम हे नाव ऐकले आणि डोक्यात एक घटा वाजू लागली १९५२ साली माझी पहिली कथा सुप्रसिद्ध 'सत्यकथा' मासिकात प्रकाशित झाली होती 'कालचक्र' या नावाची कालचक्र स्वत च्या गतीने चाललेले असते आणि काही घटना कटाळवाणेपणाने आपल्या रेंगाळतच राहात असतात, कोडग्यासारख्या परत परत येत राहतात असा या कथेचा सूर होता आणि त्यात एकदा सुरवातीला आणि एकदा शेवटी असे वाक्य येऊन गेले होते. 'पॅनमुजॉमला तहाची बोलणी चालूच होती

आज जवळजवळ ३४ वर्षांनी ध्यानीमनी नसताना त्याच पॅनमुजॉमला जायला आम्ही निघालो होतो

कैसाँग हे एक छोटेसेच गाव आहे हा हा म्हणता आमच्या गाड्या गावाबाहेर पडल्या चौदा-पधरा मैल मागे पडले आम्ही पॅनमुजॉमला येऊन पोहोचलो होतो

१९५० ते १९५३ पर्यत उत्तर कोरियाचे सेनानी आणि शरणागत अमेरिकन सेनाधिकारी याच्यात ही बोलणी चालली होती ती मध्येच सोडून देण्याची नाटके अमेरिकन अधिकाऱ्यानी अनेकदा केलेली होती, पण शेवटी एकदाची ही बोलणी सपली आणि समातर रेषा ३८ पलीकडे अमेरिकन सैन्याचा पाठिंबा असलेला दक्षिण कोरिया आणि अलिकडे जनरल किम इल सुग याचा उत्तर कोरिया, या व इतर अटींसह तहनामा झाला कागदावर का होईना, युद्ध थाबले अध्यक्ष किम इल सुग याना आपल्या उद्ध्वस्त देशाची पुनर्रचना करायला उसत मिळाली

पॅनमुजॉमला एका तगड्या जवान अधिकाऱ्याने आमचे जोरदार स्वागत केले हे नेहमीपेक्षा जास्त जोरदार होते कारण आपल्या पोलादी पजात त्याने माझा हात इतक्या प्रेमाने धरला, की नतर बराच वेळ तो हुळहुळत राहिला मग आमच्या बरोबर हिंडून त्याने तहनामा झाला ती जागा दाखविली, आसपासच्या

फलकावर लावलेली कोरिया-अमेरिका रणसग्रामातील अनेक चित्रे दाखविली अमेरिकेच्या पराभूत हॅरिसन याने जुलै १९५३ मध्ये शातताकरारावर सह्या करताना जी टेबल-खुर्ची वापरली होती. ती तिथे अद्याप जपून ठेवलेली आढळली तहनाम्याची बोलणी झाली ती जागा म्हणजे एक लाबलचक प्रशस्त पण साधे दालन आहे अमेरिकन साम्राज्यशहाना जेरीला आणून शातता करार करणे भाग पाडले याचा कोरियन लोकाना मोठाच अभिमान आहे 'जनरल हॅरिसनने गुडघ्यावर बसून आम्हाला शरणागती दिली' असे ते म्हणतात पॅन्मुजॉमच्या त्या लष्करी अमलदाराने आम्हाला सद्‌गदित होऊन निरोप दिला पण या वेळी मात्र त्याच्याशी हस्तादोलन करण्याचे धाडस माझ्याच्याने झाले नाही !

इथून अर्थातच ३८ वी समातर-रेषा आणखी अर्ध्या तासाचा पल्ला तो सपल्यावर दोन-तीन वळणे घेऊन आमच्या गाड्या खिडीप्रमाणे दिसणाऱ्या एका चिचोळ्या प्रवेशद्वारापाशी उभ्या राहिल्या. या केवळ चढाच्याच नव्हे तर काही वेळा सरळ उभ्या राहणाऱ्या रस्त्यावरून चालताना आमच्यापैकी बहुतेकाची दमछाक झाली मग ती चढण सपली आणि आम्ही एका ऑब्झर्व्हेशन पॉइटपाशी येऊन पोचलो

तिथे लाब पल्ल्याच्या अनेक दुर्बिणी स्टॅन्डस्‌वर लावून ठेवलेल्या होत्या, आणि एक वरिष्ठ लष्करी अधिकारी आम्हाला म्हणत होता,

'या दुर्बिणीतून पाहा म्हणजे तुम्हाला स्पष्ट दिसेल केवढी लाबलचक आणि प्रचड भित या अमेरिकन लोकानी बाधली आहे आणि दुर्बिण जरा इकडेतिकडे हलविल्यावर आमचे लक्ष त्या जीवघेण्या भिंतीवर स्थिर झाले सबध देशाला छेदणारी अशी लाबलचक शेकडो किलोमीटर्स पसरलेली जाडजूड आणि उच भित 'नको नको, नाही नाही' असे आक्रदत वाटेत आलेल्या नद्या, नाले, लहानमोठे डोगरे, दऱ्या याना न जुमानता कोरियन हृदयावर आपल्या कॉंक्रीटच्या टाचा रोवत बेगुमानपणे पसरत गेलेली ही भित कोरियन राष्ट्र दुभगून टाकणारी ही भित म्हणून हिला जीवघेणी भित असे म्हटले आणि नुसती भितच नव्हे, तर तिच्यात दूरवरची टेहळणी करण्यासाठी, दूरच्या पल्ल्यावर गोळीबार करण्यासाठी बसविलेली ठाणीही आहेत

दोन्ही बाजूनी सारख्या कुरबुरी चालू असतात, आरोपाआरोपी होत असते पण प्रकरण हातघाईवर येणार असे वाटले की तहनाम्याच्या अटीप्रमाणे 'बोलणी' सुरू करण्यात येते ऑब्झर्व्हेशन पॉइटवरून निघून आम्ही खाली येऊन

धडकलो तेव्हाही अशीच काहीतरी गडबड उडाली असावी असे वाटले एका जीपच्या शेजारी तीनचार बडे लष्करी अमलदार एकमेकाशी काहीतरी कुजबुजत उभे होते मग एका पाठोपाठ अनेक गाड्या, मर्सिडीज आणि निस्सान मोटारी आल्या आणि अनेक अधिकारी त्यातून उतरले आणि आदबीने त्या आधी आलेल्या बड्या अमलदारापाशी जाऊन आदबीने उभे राहिले. एका कोपराने मला ढोसत हान म्हणाला, 'तो मेजर जनरल आहे बर का ? तो उच आहे तो नव्हे त्याच्या बाजूला उभा असलेला तो तिसरा अधिकारी काहीतरी विशेष झाल असल पाहिजे आज नाही तर खुद्द जनरलसाहेबाची स्वारी इकडे कशाला फिरकतेय ?'

पण या आधीच आम्ही '३८ वी समातर रेषा' (38th Parallel) पाहिली होती प्रत्यक्ष पाहिले तेव्हा असे दिसले की, फार तर गल्लीच्या किंवा छोट्या मार्गाच्या रुदीचा हा रस्ता आहे रस्त्याच्या एका बाजूला उत्तर कोरियाचे सैनिक रस्त्याच्या पलीकडे अमेरिकन सैनिक रस्त्याच्या दोन्ही बाजूला तीन तीन गार्ड रूम्स गस्त घातल्यासारखे हे सैनिक हिंडत होते काही हातात रायफली घेऊन 'स्टँड ॲट ईज्' स्थितीत उभे होते. काहींचे नुसते आत-बाहेर चालले होते

दोन्ही कोरियाच्या हद्दीत दोन मोठ्या इमारती आहेत उत्तरेकडच्या इमारतीत आम्ही शिरलो आणि वरच्या गॅलरीत जाऊन उभे राहिलो कोणीतरी आम्हाला एक दुर्बिणही आणून दिली आणि आम्ही समोरच्या इमारतीत गच्चीवर जमलेल्या घोळक्यावर पाहू लागलो

'तेही लेकाचे आपल्याकडे पाहताहेत आपण त्याच्याकडे पाहतो आहोत तसेच '

आणि मला कडवट हसू आले आमच्यापैकी प्रत्येकजण बेचैन

'काय भयकर विनोद आहे' मला वाटल हे अमेरिकन लोक कोणाचे कोण ? या परक्याच्या देशात असण्याचा त्याचा सबधच काय ? दक्षिण कोरियातल्या लोकाना हाताशी धरून त्यानी हा काय तमाशा चालविला आहे ?

- पण असले भावनाप्रधान प्रश्न विचारण्यात काही अर्थ नव्हता सर्व प्रश्नाचे उत्तर एकच होते अमेरिका ही जगातली एक महाबलाढ्य शक्ती आहे आणि एका खाद्यावर रशिया व दुसऱ्यावर चीनला घेऊन उभ्या राहिलेल्या कोरियाच्या अर्ध्या भागात ती पाय रोवून उभी आहे एखाद्या प्रचड नरभक्षक वाघाने पडल्यापडल्या त्याच्या आजुबाजूला बागडणाऱ्या आणि मधूनच गुरकावणाऱ्या सिहाच्या छाव्याचे सहनशील स्मिताने कौतुक करावे त्याप्रमाणे हे

होत असेल पण या महाबलाढ्य शक्तीला प्रश्न विचारणार तो कोण ?

तो विचारण्याच्या भानगडीत अध्यक्ष किम इल सुग पडलेलेच नाहीत कारण त्याना असल्या प्रश्नाचे उत्तर काय येईल हे माहीत आहे

किम इल सुग याची एक आकाक्षा आहे त्याचे एक स्वप्न आहे हे स्वप्न अखड, अभग कोरियाचे आहे

६ ऑगस्ट १९७१ च्या एका जाहीर भाषणात किम यानी तत्कालीन परिस्थितीचे विश्लेषण केले आणि दोन कोरियाच्या ऐक्यासाठी दोन्ही बाजूनी कशा प्रकारचा विचारविनिमय केला पाहिजे हे स्पष्ट केले. दक्षिण कोरियातल्या जनतेचा दबाव आणि उरलेल्या जगाचा आवाज यामुळे ऐक्याची मागणी प्रभावी झाली दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया याची बोलणी सुरू झाली

ऐक्याची तीन मूलभूत तत्त्वे किम यानी सागितली आहेत पहिले तत्व हे की, परकीय सत्तावर विसबून न राहता आणि त्याचा हस्तक्षेप होऊ न देता ऐक्य साधायचे दुसरे असे, की राष्ट्रीय ऐक्य साधायचे ते सपूर्ण शाततेच्या मार्गाने, कोणत्याही हिंसक शस्त्राचा वापर करून नव्हे तिसरे हे वैचारिक आदर्शासबधीचे आणि समाज-पद्धतींमधले मतभेद बाजूला ठेवून त्याच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय एकतेचा पुरस्कार करायचा

४ जुलै १९७२ रोजी या तत्त्वाच्या आधारे उत्तर-दक्षिण कोरियाचे एक सयुक्त पत्रकही प्रसिद्ध झाले त्यानतर वेळोवेळी किम यानी ऐक्याचे प्रयत्न केले दक्षिण कोरिया सरकारने सहकार्य न दिल्यामुळे ते विफल झाले साऱ्या जगाचे अनुकूल मत असूनही अमेरिकेने भारलेले नामधारी दक्षिण कोरियन शासन या प्रयत्नाना विरोधच करीत राहिले

दक्षिण कोरियातील तरुण आणि विद्यार्थी प्रस्थापित शासनाला विरोध करीत असल्याचे आपण वारवार वाचत असतो त्याच्या नेत्याला तुरुगात डाबून ठेवण्यात आले असून हे विद्यार्थी आणि तरुण एका पाठीमागून एक अशी जोरदार निदर्शने करीत आहेत उत्तर कोरियातली जनता आणि अध्यक्ष किम याच्याप्रमाणेच या तरुण रक्तालाही ऐक्याची तळमळ लागली आहे

'कोरियाला दुभगून टाकणाऱ्या काँक्रिटच्या भिती' या शीर्षकाच्या एका पुस्तिकेत मी वाचले

'सिन्यूजहून पुसानला जाण्यासाठी शीळ घालीत निघालेली इजिने

सैन्याने ओढलेल्या रेषेपाशी थाबली, कारण तिथेच आगगाडीचा पूल तुटलेला होता आणि रूळ उखडले गेलेले होते ..

मी चित्रात पाहिले तेव्हा मला दिसले की, गाडीचे रूळ अजूनही शाबूत आहेत. फक्त त्यावरून एक कुपण पोलादी रेषा उमटवीत गेले आहे रूळावर गवत माजले असून मध्येच एक झाड आगाऊपणे उगवले आहे पूल उखडला गेला असला तरी त्याला आधार देणारे आडवे स्तभ अजून शाबूत आहेत

मला वाटून गेले,' एक दिवस असा येईल की, जेव्हा हा पूल परत एकदा उभा राहील, त्यावर आगगाडीचे रूळ विसावतील, रूळावरचे ताराचे कुपण उखडले जाईल, नव्याने टाकलेले गाडीचे रूळ दुपारच्या उन्हात चमकू लागतील आणि सिन्यूजूहून पुसानला शीळ वाजवीत निघालेली आगगाडी दिमाखाने उत्तर कोरियातून दक्षिण दिग्विजयासाठी निघेल

* * *

# मनोरा आणि ज्योत

प्यों न्यग ही उत्तर कोरियाची राजधानी राजधानीपासून चाळीस किलोमीटर अतरावर आम्ही उतरलो होतो ते असोसिएशनचे हॉस्टेल पण हे एरवी मोठे वाटणारे अतर सहजासहजी तोडता येत असल्यामुळे प्यन्यग हे आम्हाला हाकेच्या अतरावर असल्यासारखे वाटत असे दररोज एकदा, तर कधी कधी दिवसातून दोन-दोन वेळा आम्ही प्यन्यमध्ये गेलो

उत्तर कोरियाचे दर्शन आम्हाला घडविण्याची तिथल्या अधिकाऱ्याची जी योजना होती ती कल्पकतेने आखण्यात आली होती ज्यूचे तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर त्छे याच्या बरोबरीची चर्चा आणि त्यानतर कोरियाच्या अतरगाचे प्रत्यक्ष दर्शन कोणाही परक्या देशातल्या पाहुण्याना त्याच्याशी बोलून जे समजेल त्यापेक्षा त्याना प्रत्यक्ष दाखवून खूपच अधिक समजते हे उघड आहे इथेही अशीच योजना होती.

प्यन्यगला आम्ही पोचलो त्याच्या दुसऱ्याच दिवशी सकाळपासून आमची भ्रमती सुरू झाली

कोरिया हा मुळातच एक छोटेखानी देश आहे त्याच्या उत्तरेला

असलेल्या रशिया आणि चीन या खडप्राय देशाच्या मानाने तर तो इटुकला देश आहे. आशिया खडाच्या पूर्वेला असलेल्या या देशाची लाबी फक्त ११२७ किलोमीटर्स आणि रुदी अवघी ६४५ किलोमीटर्स आहे आणि त्यातसुद्धा देशाचा ८० टक्के भाग डोंगराळ प्रदेशाने व्यापलेला आहे रशिया आणि चीन या देशाना आपल्या शिरावर धारण करून कोरियाने आपले लहान लहान हातपाय पूर्व-पश्चिम आणि दक्षिण सागरात पसरले आहेत

मोठ्या पेटीतल्या पेटीतून एक पेटी, तिच्यातून तिसरी आणि शेवटी सगळ्यात लहान पेटीतून जादूगार एक सुदरसे लहान फूल बाहेर काढतो त्याप्रमाणे प्यन्यग ही नगरी आहे या सुदर शहराचे वर्णनच मुळी उद्यानात वसलेले नगर (City in a park) असे केलेले आहे आमचा बहुभाषी मित्र हान याने मला सागितले की विलो वृक्षाचे नगर असेही प्यन्यग शहराला एक नाव आहे जागोजाग इतकी हिरवळ, आणि लहान-मोठी, छोट्या-मोठ्या वृक्षानी फुललेली उद्याने या शहरात आहेत विलो, सुसम, गिंको ही झाडे आणि कोरियन लोकाच्या विशेष आवडीची मॅग्नोलियाची फुलझाडे सुसमचे झाड नामशेष झाले आहे ते केवळ खडकाळ भागातच उगवते, हा प्रवाद कोरियाचे अध्यक्ष किम इल सुग याना मानवला नाही त्यानी आपल्या बागेत या झाडाचे रोप जोपासले आणि देशभर त्याचा प्रसार केला

प्यन्यगचा 'शुद्ध' उच्चार त्याच्या इग्रजी अक्षराप्रमाणे - PYONGYANG - प्याँगयँग असा करायला पाहिजे, पण तो तसा केला तर एखादी छोटी घटा बडवावी तसे वाटते कोरियन लोक मात्र हा उच्चार प्यन्यग किंवा पिन्यङ् असा नाजूकपणे करतात त्यामुळे जलतरगाची मधुर किणकिण कानावर पडल्यासारखे वाटते

पण कोरियादर्शनाची सुरुवात आम्ही सुरवातीपासून केली म्हणजे प्रथम प्यन्यगला न जाता आम्ही माँजुदेला भेट दिली खरे तर माँजुदे हीच कोरियन लोकाची आध्यात्मिक राजधानी कारण आधुनिक कोरियाचे शिल्पकार किम इल सुग याचे हे जन्मस्थान आहे त्याच्या आधीच्या अनेक पिढ्या त्याचे कुटुबीय याच ठिकाणी राहात होते मँग्यॉग या उच टेकडीवर वसलेले हे चिमुकले गाव एखाद्या सुदर, रगीत चित्रासारखे दिसते मँग्यॉग याचा अर्थ सर्वसाक्षी इग्रजीत all-seeing या सर्वसाक्षी टेकडीनेच छोट्या किमने केलेले स्वातत्र्यप्राप्तीचे मनसुबे ऐकले तिथल्याच एका पाईन वृक्षावर चढून जवळच्या आकाशात विसावलेले इद्रधनुष्य पकडण्याचा किमने प्रयत्न केला असेल Rainbow catching

pine-tree अशा नावाचा तो वृक्ष अजूनही तिथे आहे शाळेत असताना किम जिथे अभ्यासाला बसे ती जागाही आम्ही पाहिली स्वातंत्र्यप्राप्तीची प्रतिज्ञा करून आणि ती पूर्ण झाल्यावरच मी येथे परत येईन असा निश्चय करून किमने वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी आपल्या आई-वडिलाचे घर सोडले आणि अमनोक नदी पार करून त्यानी चीनची वाट पकडली

किम इल सुग हे त्याच्या कुटुबातले पहिले क्रातिकारक नव्हेत क्रातिकारकाची परपरा त्याच्या आजोबापर्यंत सहज पोचते मॉंजुदेच्या प्रवेशद्वारातच सुनव्हा ही शाळा उभी आहे किम ह्यॉंग जिग हे किम इल सुग यांचे वडील त्यानी मुलाना आणि तरुणाना देशसेवेचे धडे या शाळेतच दिले, राष्ट्राध्यक्षाच्या या पुरातन घराच्या शेजारीच एक ॲस्पेन वृक्ष आहे हा वृक्ष किम ह्यॉंग जिक यानी आपल्या दोघा भावाच्या मदतीने लावला आणि जपानी साम्राज्यशहाना मायदेशातून हुसकावून लावून देश स्वतत्र करण्याचा कठोर निश्चय केला कोरियन राज्यक्रातीची अशी अनेक स्मृतिस्थळे या ऐतिहासिक भूमीच्या आसपास आहेत या क्रातीची स्मृती जागवीत आहेत

मॉंजुदेचे क्राति-प्रदर्शन मदिरही आम्ही पाहिले, देखणी प्रदर्शने माडण्याचे या कोरियन लोकाचे कौशल्य अजब आहे मॉजुदेमधली ही स्फूर्तिस्थाने पाहण्यासाठी आमच्यासारखे परकीय पाहुणे आले होते यात आश्चर्य नाही स्थानिक, लहान आणि मोठ्या वयाच्या कोरियन लोकाची गर्दीच गर्दी तिथे लोटली होती त्यात शाळकरी मुलेही खूप होती आणि ती आमच्याकडे पाहून नुसतेच हात उचावीत होती आमचे उत्साही सहप्रवासी डॉ बाचल 'अन्यङ् हसिनिका' या कोरियन अभिवादनपर शब्दानी त्याना चकित करून सोडत होते

अध्यक्ष कॉम्रेड किम इल सुग याचे पूर्वज राहात असलेले ते घर, अध्यक्षाचे जन्मस्थान असलेली खोली, त्या वेळची भाडी-कुडी आणि घरातली इतर अवजारे, इतर लहानसहान अनेक वस्तू तिथे विशेष आस्थेने जपून ठेवल्या आहेत स्वच्छता आणि टापटीप कमालीची आहे. थोरामोठ्याची काही जन्मस्थाने मी अशी पाहिली आहेत की त्या दर्शनाने मन सुन्न, विषण्ण होऊन गेले होते याउलट या ठिकाणी सगळ्या वातावरणातच प्रसन्नतेचा एक शिडकावा मारल्यासारखे वाटत होते मनाला इतके उल्हासित करून टाकणारे खास, वेगळे इथे काय असेल ?

इतकी गर्दी झाली असून गडबड, गोधळ याचा मागमूसही तिथे नव्हता एक प्रकारची निरामयता वातावरणात तरंगत होती मॉंजुदेच्या त्या प्रशात दर्शनाने

सगळेच भारावून गेल्यासारखे वाटत होते

मॉंजुदेहून परतताना छोट्यांच्या रजनासाठी उभारलेली नव्या नव्या खेळाची सुदर जत्रा पाहिली व्हिडिओवरचे खेळ त्यात होतेच पेशवे पार्कमधल्या फुलराणीसारखी लहान मुलानी बसायची अनेक डब्याची गाडीही त्यात होती फुलराणीपेक्षा वेगळी यासाठी, की ही गाडी आतल्या प्रवाशाना घेऊन एका प्रचड पण उभ्या वर्तुळाकारातून स्वत भोवती फिरत होती आमच्या पैकी काही जण मोठ्या माणसाची तात्पुरती लहान मुल झालो आणि या गाडी ् ् स्वत भोवती फिरलो मला अर्थातच अशी साहसे दुरूनच पाहायला आवडतात

आम्ही या जत्रेतून सुटलो ते विजयाच्या कमानीशी (Arch of triumph) येथे येऊन थाबलो ताजमहालाची भव्यता जशी त्याच्या अगदी समोर येऊन उभे राहिल्याशिवाय कळत नाही तसेच या विजय कमानीचेही आहे १९२५ ते १९४५ या वीस वर्षांच्या दीर्घ काळात जनरल किम इल सुग यानी जपानी साम्राज्यखोरीशी लढा दिला आणि जपान्यावर विजय मिळविला त्या विजयाचे हे देखणे स्मारक कोरियन लोकानी उभे केले आहे या स्मारकाची उची जनरल किम यानी सपादन केलेल्या उत्तुग विजयाला साजेशी म्हणजे दोनशे फूट सहज आहे किम याचे विजय-गीतही या स्मारकावर कोरलेले आहे.

आमच्या दररोज चालणाऱ्या ठिकठिकाणच्या भेटी व्यवस्थित आधीपासून आखलेल्या होत्या ज्या ज्या ठिकाणी आम्ही गेलो त्या त्या ठिकाणी तिथले प्रमुख अगदी प्रवेशद्वारापाशीच आमच्या स्वागतासाठी हजर असत आमच्या दुभाषाखेरीज त्या त्या ठिकाणचा दुभाषाही हजर असायचा दुभाषा असे म्हणण्यापेक्षा दुभाषिनी असे म्हणणे अधिक बरोबर होईल कारण बहुतेक ठिकाणी आमच्यापाशी इग्रजीतून सवाद साधणाऱ्या तरुण मुलीच होत्या

प्यन्यग शहरात विजयाची अनेक स्मारके आहेत एकदा मी एकटाच गाडीतून परत येत होतो, तेव्हाची आठवण आहे हातात असलेले पुस्तक वाचत असताना मधूनच माझे रस्त्याकडे लक्ष जाई आणि योगायोग म्हणा किंवा स्मारकाची रेलचेल म्हणा, दरवेळी मला एखादे स्मारक, एखादा विजय-स्तभ अशी कसली ना कसली तरी कोरियन विजयाची खूण दिसायचीच

जनरल किम याचा एकुलता एक मुलगा म्हणजे आता चाळिशीच्या आसपास असलेला किम जॉंग इल अध्यक्षाचा मुलगा म्हणून तो त्याचा राजकीय उत्तराधिकारी ठरलेला नाही त्याच्या पक्षानेच बहुमताने किम जॉंग इल याची

नेतेपदी निवड केली आहे

तर या धाकट्या किमचा उल्लेख करण्याचे कारण असे की प्यन्यग (आणि कदाचित इतर ठिकाणीही) शहरातली मोठी स्मारके आणि वास्तुशिल्पे त्याच्याच मार्गदर्शनाखाली सिद्ध झाली, असे आम्ही ठिकठिकाणी वाचले किंवा आम्हाला सागण्यात आले. आपल्या थोर आणि कर्तबगार पित्याबद्दल वाटणारी चिरजीवाची कृतज्ञता जशी यातून दिसते तशीच या क्रातीची, विजयाची माहिती जनमानसावर ठसविण्याची त्याची तळमळही व्यक्त होते

कोरियन क्रातीचे तत्त्वज्ञ किम इल सुग याच्या 'ज्यूच्ये' (Juche) तत्त्वज्ञानाचे स्मारक म्हणून ज्यूच्ये (Juche Tower) उभारणी किम जाँग इल यानी मोठ्या उत्साहाने केली

'ज्यूच्ये' या विषयाशी मुकाबला आपल्याला नतर करायचाच आहे पण मानव हा अखिल विश्वाचा केंद्रबिंदू आहे आणि तो स्वतःच स्वतःच्या भवितव्याचा शिल्पकार आहे अशा अर्थाचे हे तत्त्वज्ञान आहे किम इल सुग याच्या या तत्त्वज्ञानाने कोरियन विचारवत भारलेले आहेत आणि कोरियन जीवनातला तो एक परवलीचा शब्द आहे

तर या क्रातिकारक तत्त्वज्ञानाचे भव्य स्मारक म्हणजे ज्यूच्ये मनोरा स्मारकाची भव्यता, उची, आकार, सौंदर्य या बाबतीत कोरियन लोक कोणाला हार जातील, असे वाटत नाही

दूरवरून पाहिले तर पेटविलेल्या मेणबत्तीप्रमाणे दिसणारा हा मनोरा प्रत्यक्षात ५०० फूट उचीचा आहे पण त्याची उची तिथेच सपन नाही कारण सुमारे ६५ फूट उचीची ज्योत या गगनचुबी मनोऱ्यावर तेवते आहे या मनोऱ्यासमोर १०० फूट उचीचे एक सुदर शिल्प असून त्यात कोरियन कामगार, शेतकरी आणि बुद्धिजीवी कामगार (Working intellectual) अशा तिघाचे पुतळे आहेत पक्षाच्या निशाणाखाली हे तिघे आपल्या ज्यूचे ध्येयाच्या दिशेने कूच करीत आहेत या कोरियन त्रिमूर्तीच्या पुतळ्याचे वजन ३३ टन आहे

ज्यूच्ये मनोरा शुभ्र ग्रॅनाईटमध्ये बाधलेला आहे त्याच्या समोरच टेडॉंग नदीचे अथाग पाणी आहे आणि या सथ जलाशयाच्या आरशात हा मनोरा स्वतःचे प्रतिबिब न्याहाळतो आहे मनोऱ्याच्या उचीशी स्पर्धा करणारी दोन कारजी त्याच्यासमोर नाचत आहेत त्याची उची ५०० फुटापर्यंत जाते मनोऱ्याच्या माथ्यावर असलेली लाल ज्योत दिवसा तर धगधगत्यासारखी दिसतेच, रात्री

आपल्या दिमाखात पेटून उठते एखाद्या मोठ्या खोलीच्या आकाराच्या लिफ्टमधून आम्ही मनोऱ्याच्या टोकाला पोहोचलो आणि तेथून प्यन्यग शहराचे विहगम दृश्य पाहिले राष्ट्राध्यक्षाच्या ७० व्या वाढदिवसाला प्रजाजनानी त्याना दिलेली भेट म्हणजे हा ज्यूच्ये मनोरा विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण दीड लाख चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीवर उभारलेले हे स्मारक कोरियन लोकानी फक्त दोन वर्षांत उभे केले या लोकाच्या प्रचड बाधकामाचा धाप लावणारा वेग पाहून आम्ही सगळे चक्रावूनच गेलो 'ग्रँड पीपल्स स्टडी हाऊस' ही जनता अभ्यासगृहाची प्रचड इमारतसुद्धा अवघ्या २१ महिन्यात बाधली

मॉजुदे, जत्रा, विजयाची कमान, ज्यूच्ये मनोरा याच्याविषयी मी लिहिले, पण प्यन्यगमधल्या पहिल्या दिवसाची ही फक्त अर्धी हकीगत झाली.

यानतर घरी परतून हाशहुश करतो न करतो तोच परत बाहेर पडायची वेळ झाली या वेळी आम्हाला भुयारी आगगाडीचे स्टेशन पाहायला जायचे होते

स्टेशनच्या बाहेर येऊन तिथले चालक असलेले गृहस्थ उभे होते आपल्या स्टेशनवर पाहुण्याचे स्वागत करणारा आम्हाला भेटलेला हा पहिलाच स्टेशनमास्तर असावा त्याने आमचे नुसते शाब्दिक स्वागतच केले नाही तर हार्दिकसुद्धा केले आम्हाला आसनस्थ करून आम्हाला चहासुद्धा दिला.

मॉस्कोची मेट्रो किंवा भुयारी आगगाडी फार नावाजलेली आहे पण प्यन्यगची मॉस्कोपेक्षाही भारी आहे यात शका नाही एस्कलेटरच्या वरच्या पायरीवर आम्ही उभे राहिलो आणि काही सेकदात खाली येऊन पोहोचलो येताना आम्ही प्रकाशाने लहडलेली सुदर झुबरे पाहिली होती आता तर मी चकित होऊन जागच्या जागी उभाच राहिलो

मयसभा, मयसभा म्हणतात ती हीच काय ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# झपाटलेली माणसे

प्रथमदर्शनी प्रेमात पडणे हे धोक्याचे असते असे म्हणतात कदाचित असे असेल की एकदम अशा प्रेमात पडणाऱ्याची संख्या मोठी असली तर त्यातला धोका कमी होत असावा. आम्हा पाच भारतीयाच्या बाबतीत तसे झाले असणार आम्ही सगळेच या कोरियन लोकाच्या प्रथमदर्शनी प्रेमात पडलो

याला कारण काय असेल ? आम्ही सगळे आशियाई आहोत, कोणी परके नाही हे एक कारण असावे त्याच्यातील आतिथ्यशीलता हेही एक कारण असणार कोरियन भाषा आम्हाला समजत नाही, त्याना इग्रजी समजत नाही, तेव्हा भाषेची अडचण मोठीच भासणार असे आम्हाला वाटले होते पण तीसुद्धा आम्हाला फारशी जाणवली नाही आम्हाला मदत करणारे दोन दुभाषे होते हे खरेच, पण शब्दाचे माध्यम न लागणारी अशीही माणसाची एक भाषा असतेच तीही आमच्या कामी आली असती

मला आज असे वाटते, की आम्ही सगळेच या कोरियन दोस्तावर खूष झालो याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा कोणालाही मोहात पाडील असा मोठा

गुण आणि तो म्हणजे ही सगळी माणसे झपाटलेली आहेत साम्यवादी देशातल्या लोकाविषयी सर्वसामान्यपणे म्हटले जाते त्या अर्थाने मी म्हणत नाही रोबोसारखी, यत्रवत हालचाली करणारी, मानवी चेतना नसलेली अशा अर्थाने ही माणसे झपाटलेली नव्हती त्याचे मुखवटे एकसारखे, सारवलेले आणि गुळगुळीत नव्हते. साम्यवादी वेगळेपणा त्याच्यात होता, तरीही प्रत्येकाने आपले व्यक्तिमत्त्व स्वतत्रपणे जपलेले होते याखेरीज त्या जवळजवळ सर्वाच्यातच समान असलेले जे 'झपाटलेपण' होते. त्यामुळे आम्हाला त्याचे इतके आकर्षण वाटले असावे.

हान चुन दो हा आमचा दुभाषा किंवा दुभाषी आम्ही सगळेच त्याच्यावर खूष होतो हान चोवीस वर्षांचा आहे किम इल सुग विद्यापीठात तो पदव्युत्तर इग्रजीचा अभ्यास करतो तो आपल्या आईवडिलाजवळ राहतो वडील विद्यापीठात वास्तवशास्त्राचे प्राध्यापक आहेत त्याला दोन धाकटे भाऊ आहेत त्याची एक प्रेयसीही आहे पण बऱ्याच चौकशा आम्ही केल्या तरी या बेट्याने आम्हाला तिच्याबद्दल काहीही पत्ता लागू दिला नाही

हानची आणि माझी चागली दोस्ती जमली होती बहुधा तो माझ्याबरोबरच आमच्या गाडीत असे आणि आम्ही निरनिराळ्या अनेक विषयावर बोलत असू मुख्यत वाङ्मयाबद्दल पण इग्रजी चागले असून, परदेश-प्रवास थोडाबहुत झाला असून, आणि तिथे बढतीची चागली सधी असूनही हानला 'फॉरेन सर्व्हिस' मध्ये जायची इच्छा नाही

'अरे, तू कोरियाचा फर्स्ट सेक्रेटरी किंवा पुढेमागे राजदूत होऊन आमच्या भारतात आल्याशिवाय आपली भेट तरी होणार कशी ?' मी त्याला गमतीने म्हणालो

'Very truc - अगदी बरोबर आहे पण मला आपला वाङ्मयाचा , इग्रजी वाङ्मयाचा अभ्यास करायचा आहे. मी प्रोफेसर वगैरे होईन— तुम्ही मला शेक्सपिअरच्या सगळ्या नाटकाच एकत्रित पुस्तक पाठवणार आहात तेवढ मात्र विसरू नका !' त्याने मला प्रामाणिकपणे सागितले.

मला आयुष्यात यापुढे काय करायची इच्छा आहे याबद्दल तो मला एकदा विचारीत होता मी त्याला सागून टाकले तेव्हा तो एकदम म्हणून गेला, उत्तम आहेत तुमच्या कल्पना I will pray for you 'मी प्रार्थना करीन तुमच्याकरता.' या आधीच थोड्या वेळापूर्वी हान मला म्हणाला होता 'आपला देवावर वगैरे विश्वास नाही मी देव मानत नाही पण देवाने असायला माझी

हरकत नाही.'

'अरे, पण मग तू प्रार्थना करणार आहेस माझ्यासाठी, ती कोणाची ?' मी त्याला विचारले आणि तेव्हा मात्र तो सटपटला मी त्याला गमतीने म्हणालो,

'पहिल म्हणजे मला तुझे आभार मानले पाहिजेत कारण देवाने असायला तुझी काही हरकत नाही म्हणून नाहीतर भलतीच पचाईत व्हायची आमच्या देवाची पण हे तुझे आभार मी अर्थातच देवाच्या वतीने मानतो आहे. दुसर अस, की तू जर देवाला मानणार असलाच तर माझीही हरकत नाही आणि खर सागायच तर देव हा तुला वाटतो तितका वाईट असामी नव्हे '

आपण पकडले गेलो आहेत हे समजल्यावर हान हसायला लागला

आमची देखभाल करण्याचे काम या हानकडे सोपवलेले होते आणि त्यातच तो कायम गर्क असायचा आमचे वेळापत्रक ठरविणे आणि त्याप्रमाणे आम्ही सारखे गरगर फिरतो आहेत की नाही हे पाहणे, हे सगळे तो हसतमुखाने करीत असे वेळेच्या आधी हजर होऊन मला आठवण करणे, आमच्या अडचणींचे निवारण करणे यापासून ते आमचा व्हिसा, पासपोर्टस् साभाळणे, तिकिटे काढणे इ सगळे उद्योग तोच करत असे कित्येकदा त्याला आमच्याबरोबरच आमच्या होस्टेलवर राहावे लागत असे. आणि त्याची जागेसकट बरीच गैरसोय होती असेही माझ्या लक्षात आले पण आपल्यावर सोपवलेले काम चोखपणे पार पाडणे एवढेच त्याला जणू काही जमत आणि समजत होते कित्येकदा त्याला आमच्या सरबराईत असताना घरीही जाता येत नसे पण तो कधी कुरकुरताना आढळला नाही उलट आमच्याबरोबर निवातपणे वेळ घालविण्यासाठी उगाच रमी खेळण्यासाठी त्याला बोलावले तरी तो आनदाने यायचा

हानप्रमाणे आमचे गुरुजी प्रोफेसर ल्हे

आमच्या दररोज दोनअडीच तास, कित्येकदा चार-साडेचार तास चालणाऱ्या चर्चासत्राचे ते सूत्रधार होते कोरियन स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास, किम इल सुग याची कर्तृत्वशाली कारकीर्द, आत्मनिर्भर होण्याचा प्रत्येक कोरियन माणसाला सदेश देणारे ज्युचे तत्त्वज्ञान, कोरियाचे सामाजिक जीवन, सध्याचे राजकारण इ इ विषयाबद्दल प्रोफेसर ल्हे याना खूपच माहिती होती अर्थव्यवस्थेबद्दल काही सूक्ष्म स्वरूपाचे प्रश्न सोडले, तर इतर अर्थकारण, नियोजन, शेती, उद्योग याच्याबद्दलही खूपच माहिती होती आणि दुभाषाने आमचे प्रश्न

त्याना कोरियन भाषेत सागितले, की ते त्याची सविस्तर उत्तरे देत ठरलेल्या वेळेच्या आधीच सेमिनार-हॉलमध्ये ते येऊन स्थानापन्न झालेले असत ते आल्याचे कळताच आमचीच तारावळ होई आणि वही, पेन्सिली गडबडीने शोधत आम्ही कसेबसे तिथे जाऊन उपस्थित होत असू माझ्या अगदी शेजारच्या खोलीतच हा सेमिनार- हॉल होता, तर गुरुजींना कित्येकदा प्यन्यगमधून निघून तीसपस्तीस किलोमीटर्स तोडून तेथे उपस्थित व्हावे लागत असे मला उशिरा कळले, की हे सद्गृहस्थ आमच्याच होस्टेलमध्ये आमच्या पेक्षा खूपच कमी सोयींच्या खोलीत राहात होते जेवायलाही ते आमच्याबरोबर नसत

प्रोफेसर ल्हे हे आमचे सिद्धार्थ कॉलेजमधील प्रो रा भि जोशी याच्या सारखेच खूप दिसायला आहेत म्हणून आम्ही त्याचे नाव गमतीने रा भि जोशी ठेवले होते एकदा मी त्याना तसे सागूनही टाकले ते खूप हसले.

प्रोफेसरसाहेबाची मला नतर कळली ती माहिती अशी, की त्याच्या पत्नीवर नुकतीच एक शस्त्रक्रिया झाली होती आणि या बाई हॉस्पिटलमध्ये पडून होत्या पण त्यामुळे गुरुजींच्या कार्यक्रमात काहीही खड पडला नाही किंवा त्याना कधी उशीरही झाला नाही गाडीतून कुठेही बाहेर जाताना ते माझ्याशेजारीच बसलेले असत मी त्याना अनेक प्रश्न विचारून सतावून सोडीत असे त्याची व्यवस्थित उत्तरे ते देतच पण मलाही भारताविषयी अनेक प्रश्न विचारीत. चातुर्वर्ण्य, आपल्या विवाहाच्या पद्धती, हुडा पद्धती, जातिभेद या विषयी अनेक प्रश्न विचारून त्यानी मला विचारात पाडले होते

थोडक्यात काय, की आपले काम पाट्या टाकण्याचे आहे असे आमच्या कोरियन रा भि जोशाना कधीही वाटले नाही त्याच्या कपाळावर रागाची आठी उमटल्याचे कधी पाहिले नाही

प्रोफेसर ल्हेंना आम्ही एकदोनदा रमी खेळायला बोलावले होते तेव्हा ते आनदाने आमच्यात सामील झाले आणि आम्ही खाली गालिचावर बसलो होतो तिथे आमच्याप्रमाणेच माडी घालून बसले आणि रमीचे काहीही नियम माहीत नसतानासुद्धा मोठ्या आत्मविश्वासाने आमच्याबरोबर रमी खेळले हेल्थ सेंटरवर आम्ही गेलो होतो तेव्हा सॉव्हना बाथ घेण्यासाठी माझ्याबरोबर ते त्या विभागात मुद्दाम आले आणि नतर त्यानी माझी विचारपूससुद्धा केली तेव्हा त्याना बरे वाटले डॉ बाचलची तब्येत एकदा अचानकपणे बिघडली तेव्हा ते चागलेच काळजीत पडलेले मी पाहिले

हान आणि प्रोफेसर ल्ठे याच्या विषयी मी जरा विस्ताराने सागितले याचे कारण या दोघाशी आमचा सर्वात अधिक सपर्क आला, सर्वात जास्त परिचय झाला पण या दोघाखेरीजही ज्या ज्या लोकाचा आमचा जवळून, दुरून परिचय झाला त्याच्या विषयी मी असे म्हणू शकेन, की ते हाती असलेल्या कामात पूर्णपणे गढलेले असत काम मोठे की लहान हा त्यातला महत्त्वाचा प्रश्न नसे.

आपले लाल डोळे वटारीत कोणी 'बिग ब्रदर' आपल्याकडे पाहात आहे अशा धाकाने ही मंडळी वागताहेत असे आम्हाला कधीच वाटले नाही कारण त्याच्या वागण्यात एक प्रकारची आत्मीयता होती ही आत्मीयता कोणाच्याही धाकाने येणे अशक्य होय

आमच्या वसतिगहातल्या खोल्याची

तर आम्हाला सगळ्यानाच नमुनेदार वाटली कमीत कमी बोलून जास्तीत जास्त कामे करणारी काही माणसे असतात त्यातली ही बाई नबर एक आमची प्रत्येकाची राहण्याची व्यवस्था स्वतत्र होती हे मी सागितलेलेच आहे त्यामुळे आम्हा पाचजणाच्या दहा खोल्या आणि शिवाय पाच स्नानगृहे आम्ही बाहेर पडलो की या बाई या सर्व खोल्याचा ताबा घेत. एक महत्त्वाची गोष्ट जाता जाता सागितली पाहिजे की, आमच्या खोल्याना कधीही कुलूपे लावलेली नसत आता आम्ही ठेवून जात असलेल्या परदेशी चलनाची बातच सोडा आमचे पासपोर्ट, व्हिसासबधीचे कागद तिथेच खोलीत असत 'तिथे कुलूप वगैरेची काहीही गरज नाही' असे आम्हाला सागण्यात आलेले होते आणि आम्हीही खुशाल बिनधास्तपणे दारे नुसतीच ओढून घेऊन कित्येकदा दोन दोन दिवस बाहेर जात होतो तर आमच्या या वस्तूना कोणी हात लावण्याचा प्रश्नच नव्हता पण या बाई सर्वच खोल्या इतक्या नीटनेटक्या आणि स्वच्छ करून ठेवीत असत की विचारू नका - पलगावर अस्ताव्यस्त पडलेले पाघरूण नीट हॉटेलच्या बेडरूम्समध्ये असते तसे लावून ठेवण्यापासून ते सगळा केरकचरा व्हॅक्यूम क्लीनरने साफ करण्यापर्यंत सगळी कामे त्या बिनबोभाट करीत आदल्या दिवशी धुवायला नेलेल्या कपड्याच्या व्यवस्थित घड्या घालून पलगावर ठेवलेल्या असत एकदोनदा माझे काही कपडे धुवायला टाकायचे मी नेहमीच्या गबाळेपणाने विसरलो होतो या धन्य बाईने ते स्वत व्यवस्थित धुऊन आणि तिथेच वाळत घालून मला लाजविले माझ्या प्रवासी बॅगेचा पट्टा तुटलेला आहे हे लक्षात येताच तो चाळीस किलोमीटर्स दूर गावात पाठवून त्यानीच दुरुस्त करून आणला' आणि मी बावळटासारखा कोरियन भाषेतले आभाराचे शब्द शोधायला चाचपडू लागलो एकदा आघोळीला

जात असताना बाहेरच्या गालिचावर पडलेला कागदाचा कपटा ओलांडून नेहमीच्या बेदरकारपणे मी पुढे चाललो होतो. पण काय असेल, ते असो, माझे पाय मागे खेचले गेले आणि मुकाट्याने वाकून मी तो कपटा उचलला आणि केराच्या बादलीत टाकला, तेव्हाच मला एक प्रकारचे आत्मिक समाधान लाभले ! एकदा माझ्या मधल्या खोलीतला काचेच्या हंडीमधला बल्ब गेला होता तो दुरुस्त करीत असताना फुटला आणि त्याच्या काचा खाली पसरल्या होत्या वास्तविक ज्या इलेक्ट्रिशिअनने नवा बल्ब बसवून दिला त्यानेच सगळ्या लहान सहान काचा गोळा करून टाकून दिल्या होत्या पण या बाईंना बल्ब फुटला होता हे कळायचा अवकाश त्यांनी लगेच व्हॅक्यूम क्लीनर आणला आणि परत एकदा दोनदा गालिचावरून फिरवून तो साफ केला न जाणो, एखादा काचेचा तुकडा राहिलेला असला तर !

आता आमच्या करिता इतका जिवाचा आटापीटा करायचे या बाईंना काय कारण होते ? आम्हाला खूष करून त्या बाई काय मिळवीत होत्या ? मला वाटले 'निष्काम कर्म' म्हणजे दुसरे काय असते ? आणि नुसतेच निष्काम कर्म नव्हे, तर तेसुद्धा इतके सुदर

आमच्या जेवणघरात काम करणाऱ्या तरुण मुलीही अशाच सदैव स्वत च्या कामात लगबगीत असायच्या आमची न्याहारी, दुपारचे जेवण, रात्रीचे भोजन ही सगळी त्याच्याकडे सोपविलेली कामगिरी या सगळ्याच मुली चुणचुणीत आणि तत्पर होत्याच पण त्याच्या सगळ्याच्याच चेहऱ्यावर सदैव हास्य फुललेले असायचे आमच्या अनेक आवडी-निवडी शक्य तितक्या पुऱ्या करायच्या प्रयत्नात त्या असत काम करून शिकणाऱ्या या सगळ्या मुली होत्या कॉलेजात व्यापारशास्त्राचे धडे घ्यायचे आणि उरलेल्या वेळात इथे येऊन काम करायचे, असे त्या सगळ्याच करीत होत्या

ही सगळी आमच्या अगदी जवळच्या परिचयातली, नेहमीच्या सहवासातली माणसे झाली पण आम्ही जेव्हा बाहेर ठिकठिकाणी गेलो तेव्हाही आम्हाला याच एका भारलेल्या कोरियन वृत्तीचे दर्शन घडले. वयाच्या ७४ व्या वर्षीसुद्धा सदैव जनतेच्या सपर्कात राहणाऱ्या अध्यक्ष किम-ग्रेट लीडर - याचे सोडूनच द्या अगदी लहान लहान ठिकठिकाणी सर्वसामान्य माणसातूनही आम्ही तेच पाहिले मुलाच्या राजवाडा आम्ही पहिला तेव्हासुद्धा अभ्यास काय किंवा खेळ काय, नाट्याभिनय काय किंवा कलाकुसर काय, प्रत्येक बाबतीत या छोट्यामध्ये कमालीची एकाग्रता, एकतानता आढळली या मुलाच्यात हा सोन्यासारखा गुण

कुठून आला ?

साध्या शहरातल्या सर्वत्र दिसणाऱ्या स्वच्छतेचेच माझ्या मनात सारखे येत राही मोठमोठ्या इमारती, प्रदर्शने, स्मारके, ग्रथालये, हॉटेल्स या ठिकाणी सगळे सदैव घासूनपुसून ठेवल्यासारखे स्वच्छ होते यात फार तर आश्चर्य मानू नका पण मोठ्या रस्त्याचे सोडाच, आडवळणाच्या रस्त्यालासुद्धा इतकी कमालीची स्वच्छता आणि नेटकेपणा याचे आम्हाला दर्शन झाले, की कोणाच्याही भीतीने अगर धाकाने हे शक्य झाले असेल किंवा होईल हे पटण्यासारखे नव्हते राजरस्त्यावरून जाणारे व रस्ता स्वच्छ ठेवणारे प्रचड व्हॅक्यूम क्लीनर्स आम्ही पाहिले त्यामुळे रस्त्याच्या मुख्य भागाची काळजी घेतली जाई पण रस्त्याच्या दोन्ही कडाना छोटे छोटे व्हॅक्यूम क्लीनर्स वापरून सफाईचे काम केले जात होते पोलिसी किंवा सैनिकी सक्तीत जेव्हा अशी कामे होतात तेव्हा थोडी मोकळीक मिळताच, किवा पोलिसाचा डोळा चुकवून बेशिस्त वागण्याची साहजिकच प्रवृत्ती असते तसेही आम्हाला कुठे आढळले नाही

या सगळ्याच्या मुळाशी काय असेल ? ज्यूचे टॉवर, विजयाची कमान यासारखी प्रचड कामे या लोकानी वर्षा सव्वा वर्षात उभी केली याचे रहस्य काय असा प्रश्न मी एकदा प्रोफेसर ल्छेना विचारला होता 'याचे निदान एक महत्त्वाचे कारण म्हणजे आमच्या लोकानी त्याच्या सुट्याच्या दिवशी, रविवारी, किवा नेहमीची कामे झाल्यानतर या बाधकामाच्या ठिकाणी स्वेच्छेने येऊन विनावेतन लावलेला हातभार' प्रोफेसरानी सागितले

आणि याचा अनुभव मी स्वत घेतलेला आहे नव्याने सुरू झालेल्या एका म्युझियमचे बाधकाम चालू असताना आम्ही त्याच्या शेजारच्याच इमारतीत गेलो होतो, त्या वेळी पाहिले अनेक लहान मोठ्याची एक लाबच लाब राग उभी होती आणि त्याबद्दल मी विचारले तेव्हा मला सागण्यात आले, की आज सुटीच्या दिवशी हे सर्व लोक केवळ स्वेच्छेने या नव्या बाधकामात आपण काही करू शकू या अपेक्षेने येथे जमले आहेत स्वयस्फूर्तीने काम करायला ही शेकडो माणसे तिथे जमली होती मला पडलेला प्रश्न असा की या सगळ्याना कसे कोणत्या शक्तीने इथे आणले ? रविवारी सुटीच्या दिवशी चागले उद्यानात फिरायला जायचे, माशासाठी गळ टाकायचा, ट्रेकिंगला जायचे, जलविहार करायचा, पिकनिकला जायचे हे सगळे सोडून आपले हात आणि कापडे मातीत खराब करण्यासाठी ही मडळी इथे का आली ?

जपान आणि अमेरिका यासारख्या बलाढ्य शक्तींना चिमुकल्या

कोरियातील या चिमुकल्या कोरियन लोकानी कणखरपणे टक्कर दिली स्वातन्त्र्याप्राप्तीनतर औद्योगिक आणि शेतीच्या उत्पन्नात क्रातिकारक उच्चाक निर्माण केले, आपले स्वातन्त्र्य सुजल आणि सुफल केले, हे सगळे कशामुळे झाले ?

थोर देशभक्त आणि सेनानी किम याच्या खबीर, कुशल नेतृत्वामुळे ? की कष्टाने कमावलेले स्वातन्त्र्य कधीही हिरावून घेतले जाईल या भीतीमुळे ? की एकाग्रता, कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा हे गुण त्याच्या स्वभावात निसर्गतःच आहेत ? की नाराज निसर्गाबरोबर बचावासाठी लढता लढता त्याच्यात एक चिवटपणा बाणला ? की त्याच्या देशात सुदैवाने प्रचड आणि वेगाने वाढणाऱ्या लोकसख्येचे दडपण नाही म्हणून ? की कुणाच्या भीतीने, कुणाच्या दबावाखाली, बिग ब्रदरच्या धाकाखाली, किंवा प्रेमासाठी ही माणसे काम करीत असतील म्हणून ? की अशा रीतीने देशासाठी, देशबाधवासाठी झटत राहणे हा त्याचा राष्ट्रीय वृत्तीचा भागच आहे म्हणून हे सर्व होते ? की स्वतत्र कोरियात त्याना अन्न-वस्त्र-निवारा-आरोग्य-शिक्षण या सगळ्याची व्यवस्था झाली असल्यामुळे त्याच्यात एक कृतज्ञतेची भावना निर्माण झाली आहे म्हणून ?

कोणाच्या धाकाने किंवा दबावाखाली हे झालेले नाही, हे उघड होते पण मग या सगळ्या कारणातले कोणते एक प्रमुख कारण आहे की, ही सगळीच कारणे एकत्रित होऊन हा परिणाम झाला आहे ?

या प्रश्नाची उत्तरे शोधता शोधता आम्ही सगळे अस्वस्थ झालो आणि माझ्या सर्व सहकाऱ्याना आज बऱ्याच दिवसानतर एकत्र करून मी विचारले तरीही आम्हाला आमच्या मुख्य प्रश्नाचे नेमके उत्तर सापडलेले नाही

'मिलर ऑफ द डी' (Miller of the Dee) नावाची एक सुदर कविता आमच्या शाळेतल्या क्रमिक पुस्तकात होती कोरियन लोकाचा विचार करता करता ती मला एकदम आठवली आपले काम करीत असताना सदैव गाणे गुणगुणणारा हा 'डी' या गावचा चक्कीवाला म्हणत असतो

I envy nobody, no not I, and nobody envies me '

'मी कोणाचाही हेवा करीत नाही, आणि माझा हेवा तरी कोण करीत असेल ?'

एका वाक्यात वर्णन करायचे तर कोरियन लोक गातगात आनदाने

काम करतात आणि काम करताकरता आनदाने गातात. 'डी' गावाच्या चक्कीवाल्याप्रमाणे ।

आम्ही जेव्हा आमच्या कोरियन मित्राचा प्यन्यगच्या विमानतळावर निरोप घेतला तेव्हा आमचे अनेक मित्र तिथे जमले होते निरोप देतेवेळी ली या आमच्या दुभाषी मुलीच्या डोळ्यात पाणी जमले होते हानसारखा तरुणसुद्धा भावनाप्रधान झाला होता प्रोफेसर छे याच्यासारखे पोक्त गृहस्थ आपले हात हलवीतच राहिले त्या आधी होस्टेलवर आम्हाला निरोप देताना तिथले सगळेच्या सगळे लोक लायनीत उभे राहिले होते आणि त्याच्यापैकी प्रत्येकाने हस्तांदोलनपूर्वक आम्हाला निरोप दिला होता आदल्याच दिवशी आम्ही देऊ केलेली लहान सहान गिफ्टस् त्यानी इतक्या आनदाने, प्रेमाने आणि जणू काही आम्ही त्याना मोठे नजराणे देत आहोत अशा थाटात स्वीकारली होती की, ती गिफ्टस् आम्हालाच कोणीतरी देते आहे असे आम्हाला वाटायला लागले होते.

पण याच वेळी घडलेल्या एका प्रसगाने मी अगदी हलून गेलो होतो ज्याच्या निमत्रणामुळे आम्ही कोरियाच्या भेटीला गेलो होतो ते सज्जन गृहस्थ ज्यूचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ किम डुक सू हे जातीने आम्हाला निरोप देण्यासाठी विमानतळावर उपस्थित होते

त्याचा निरोप घेण्यासाठी जेव्हा मी त्याच्याजवळ गेलो तेव्हा ते मला अगदी उराउरी भेटले सद्‌गदित होत्साते ते मल। ्‌णाले,

I hope you are leaving your heart behind with me !"-

'आपले काहीतरी अमोल असे तू माझ्यासाठी ठेवून परत जातो आहेस ना ?'

मी सुद्धा तात्पुरता का होईना, स्वतःला हरवून बसलो.

'Of course yes At least a major part of my heart अर्थातच ठेवून जातो आहे निदान माझ्याजवळचा अमोल ठेव्याचा मोठा भाग ' मी त्याना अगदी सहज म्हणून गेलो

- या हृद्य प्रसगामुळेच मला कधी कधी वाटते की आपल्याला प्रिय असणाऱ्या व्यक्तींबद्दल, ध्येयाबद्दल या कोरियन मित्राना वाटणारी निस्सीम आत्मीयता हेच अखेरीस त्याच्या देदीप्यमान यशाचे रहस्य असेल काय ?

* * *

# किमचा कोरिया : तेव्हा आणि आता

- किम म्हणजे अर्थातच किम इल सुंग

- किम म्हणजेच डी पी.आर.के म्हणजे डेमोक्रॅटिक पीपल्स रिपब्लिक ऑफ कोरिया

- म्हणजेच साम्यवादी उत्तर कोरिया.

- किम इल सुंग आणि उत्तर कोरिया हे एक समीकरण आहे किम म्हणजे उत्तर कोरिया. उत्तर कोरिया म्हणजे किम

- किमला 'द ग्रेट लीडर' असे म्हणतात

- १९८६ साली मी माझ्या काही सहकाऱ्याबरोबर किमच्या उत्तर कोरियात गेलो तेव्हा तो त्याचा 'थोर नेता' होताच आजही आहे

- पण आज परिस्थिती मात्र खूप बदलली आहे कोरियातली नव्हे साम्यवादी परिस्थितीत क्रांतिकारक बदल झाले आहेत साम्यवादी रशियातल्या साम्यवादाला सुरुंग लागून त्याच्या ठिकऱ्या उडाल्या आता जुन्या सोव्हिएट

रशियात छोटी-मोठी विभक्त राज्ये निर्माण झाली आहेत

जुना रशिया म्हणजे साम्यवादी देशाचा दादा आता मुळात त्याचाच प्रभाव सपला असल्यामुळे पूर्व युरोपातील साम्यवादी राष्ट्रांची प्रभावळही अस्तगत झाली आहे राहता राहिले चीन, क्यूबा आणि डी पी.आर.के किंवा उत्तर कोरिया त्यातील चीनमध्ये आधी चोरपावलानी नतर उघडउघड खुली बाजारव्यवस्था येत आहे लाल चीनची लाली उडत आहे साम्यवादाने आपले सगळे प्रश्न सुटतील याबद्दल बहुतेक साम्यवादी देशातील नेत्याचा भ्रमनिरास झाला आहे

- पण साम्यवादाची धुगधुगी अजूनही शिल्लक आहे

ती क्यूबामध्ये आहे, आणि ती उत्तर कोरियामध्ये आहे फिडेल कॅस्ट्रो हा क्यूबाचा सर्वसत्ताधीश आहे आणि किम इल सुगने उत्तर कोरियावर अधिसत्ता गाजविली आहे

पण हे दोन देश अगदी लहान देश आहेत आणि कधीना कधी, आज नाही उद्या जगातल्या मोठ्या साम्यवादी देशातला साम्यवाद उखडला गेला याचे परिणाम या छोट्या साम्यवादी देशावर झाल्याखेरीज राहणार नाहीत

आणि उत्तर कोरिया किवा ग्रेट लीडर किम याच्या कोरियावर तर हे परिणाम नक्कीच होणार त्यातून तो सुटू शकणार नाही

याची दोन कारणे आहेत

पहिले म्हणजे आधुनिक जग हे लहान लहान होत आहे आणि ते तसे वेगाने होत आहे विज्ञानाची आणि तत्रज्ञानाची स्तिमित करणारी प्रगतीच अशी आहे, की या देशाचे परस्परावलबित्व कोणालाच विसरता किंवा नजरेआड करता येणार नाही

पण कोरियाच्या बाबतीत आणखी एक कारण आहे आणि मला वाटते, की ते अधिकच महत्त्वाचे आहे ते असे, की उत्तर कोरिया हा मूळ कोरिया या देशाचा भाग आहे मागील युद्धाच्या वेळी कोरियाचे दोन तुकडे झाले 38th Parallel नावाची एक काल्पनिक रेषा या देशाच्या मध्यभागी आखली गेली या रेषेच्या उत्तरेला राहिला तो साम्यवादी उत्तर कोरिया आणि रेषेच्या दक्षिणेला राहिला तो अमेरिकेच्या आधिपत्याखाली नतर दडपणाखाली राहिलेला दक्षिण कोरिया

## अभंग कोरियाचे स्वप्न

'अभग कोरियाचे स्वप्न' या शीर्षकाचा जो लेख या पुस्तकात मी घेतला आहे तो काहीशा 'भावनावेगात लिहिल्यासारखा वाटेल निदान आताच्या परिस्थितीत तो मला तसा वाटतो

म्हणजे उत्तर आणि दक्षिण हे दोन भाग पूर्वी एकाच देशाचे दोन भाग होते आणि ते कोणा बाह्य शक्तीने वेगवेगळे केले, पण त्याचा आत्मा एकच आहे त्याची अस्मिता एकच आहे त्या अर्थी ते एकत्र यायलाच पाहिजेत त्याची पूर्वीची एकात्मता त्याना पुन्हा प्राप्त झाली पाहिजे, असे कोणाला विशेषत दोन्ही बाजूच्या कोरियन नागरिकाना वाटले तर त्यात चूक काहीच नाही (अजूनही काही भाबड्या लोकाना असे वाटते की भारत, पाकिस्तान आणि बागला देश हे परत एकत्र झाले पाहिजेत )

पण केवळ भावनिक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहता येणार नाही उत्तर कोरियातील राज्यकर्त्यांना तर या दोन कोरियाच्या एकत्रीकरणाचा ध्यास लागला आहे दक्षिण कोरियातही वारवार या एकत्रीकरणासाठी लहानमोठ्या चळवळी होत असतात

दुभगलेले देश एकत्र येऊ शकतात का, शकतील का यासाठी प्रत्यक्ष प्रयोग करणे ही कधीच शक्य होणारी गोष्ट नव्हे परतु कोरियाच्या दोन छकलाना एकत्र आणण्याचा प्रयत्न करताना, किंवा तसा विचार करताना सुदैवाने आपल्यासमोर अशाच एका प्रयोगाचे उदाहरण आहे

ते म्हणजे पूर्व आणि पश्चिम जर्मनी या दोन देशाचे एकत्रीकरण पूर्व जर्मनीत साम्यवादी सत्ता होती, तर पश्चिम जर्मनीत भाडवली लोकशाहीची सत्ता होती या दोन तुकड्याना अलग ठेवणारी कुप्रसिद्ध बर्लिनची भित (Berlin Wall) ही कधीतरी भुईसपाट होईल आणि दोन्ही जर्मनी एकत्र येतील असे स्वप्न काही जर्मन लोक पाहात होते (जसे आज कोरियातले काही पाहात आहेत )

अखेरीस ही बर्लिन - भित भुईसपाट झालीच पण दुभगलेली जर्मन हृदये एकत्र झाली का ? प्रत्यक्षात आला तो अनुभव वेगळा होता

पश्चिम जर्मनीतली आर्थिक परिस्थिती पूर्व जर्मनीपेक्षा खूपच चागली, तेथील जीवनमान खूपच वरच्या स्तरावरचे त्या मानाने पूर्व जर्मनीतील आर्थिक परिस्थिती बिकट, तिथे महागाई अधिक, बेकारी अधिक, जीवनासाठी ओढगस्त

अधिक या दोन अवस्थातील लोक एकत्र आल्यामुळे सघर्ष, चढाओढ इ घटना साहजिकच होत्या आणि तशा त्या झाल्या नाणेपद्धती कोणती असावी यावरसुद्धा खूप तटे-बखेडे झाले.

अखेर साम्यवादाचा प्रवक्ता कार्ल मार्क्स म्हणाला तेच खरे होते काय ? आर्थिक परिस्थिती, उत्पादन साधने आणि उत्पन्न याचे वाटप, त्यातील विषमता हेच सगळ्या विग्रहाचे कारण आहे असे मार्क्सने सागितले त्याचेच प्रात्यक्षिक येथे घडत होते आणि घडत आहे

उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया याना एकत्र यायचे असेल तर जर्मनीच्या एकीकरणाच्या वेळी काय झाले व आता काय होत आहे याचा विचार त्याना करावा लागेल 'साम्राज्यशहा' अमेरिकनानी कोरियाचे तुकडे केले हे खरेही असेल, पण सध्या ते तुकडे झालेले आहेत आणि आपापल्या मार्गाने ते पुढे चालले आहेत

या दोन्ही विभागाची विचारसरणी वेगळी आहे दक्षिण कोरिया हे केवळ आशियातलेच नव्हे, तर सबध जगातलेच एक अतिशय प्रगत राष्ट्र समजले जाते. त्याचा निर्यात व्यापार खूप मोठा आहे, त्यानी वैज्ञानिक प्रगती मोठ्या प्रमाणावर साधली असून तेथील लोकाचे जीवनमान खूप उचावलेले आहे शिवाय तेथे स्वातत्र्य आहे आचार आणि विचाराचे स्वातत्र्य आहे

उत्तर कोरियातली परिस्थिती वेगळी आहे अमेरिकन जीवनाचा जो झगमगाट आहे तो दक्षिणेत असला तरी उत्तर कोरियात नाही तेथे जीवनावश्यक वस्तूचे रेशनिंग असून भाव ठरलेले आहेत राहण्याची जागासुद्धा सरकारकडून मिळते. आरोग्यसेवा, शिक्षण यावर खर्च करावा लागत नाही. किंवा अगदी मर्यादित प्रमाणात करावा लागतो बेकारी आणि महागाई दिसत नसल्या तरी राहणीमान फार समृद्धीचे आहे असे वाटत नाही. सर्व रचनाच शासकीय नियोजनाप्रमाणे असल्यामुळे येथे उद्योजन-स्वातत्र्य नाही

उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियाना एकत्र आणण्याचे स्वप्न स्वत उत्तर कोरियाधिपती किम इल सुग हेसुद्धा पाहात आहेत. या दोन भागाना एकत्र आणणे हा केवळ भावनेचा प्रश्न नसून गहन, गुतागुतीचा आर्थिक आणि व्यावहारिक प्रश्न आहे याची त्याना जाण नसावी असे नाही

किम इल सुग या थोर नेत्याने आपल्या कुशल, निग्रही व धीरोदात्त नेतृत्वाखाली जपानी आणि अमेरिकी या दोन युद्धातून कोरियाला यशस्वीरीत्या

बाहेर काढले असले आणि देशाची मोठी प्रगती घडवून आणली असली, तरी काही गोष्टींचा विचार त्याना करावाच लागेल उत्तर कोरियन जनतेच्या अपेक्षा आणि आकांक्षा वाढत जाणार याची दखल त्याना घ्यावी लागेल माणूस हा साऱ्या जगाचा मध्यवर्ती बिंदू आहे अशा अर्थाचे जे त्याचे ज्यूच्ये तत्त्वज्ञान (Juche Philosophy) आहे त्या तत्त्वज्ञानाप्रमाणे सुद्धा माणूस, व्यक्ती याचे नव्या रचनेत काय स्थान असेल याचा विचार करावा लागेल साम्यवादी कोरियातल्या जनतेला जगात काय चालले आहे, दक्षिण कोरियात काय चालले आहे या वर्तमानापासून आतापर्यंत बरेच अधारात ठेवण्यात आलेले असले तरी त्याना त्याची जाणीव नजीकच्या भविष्यकाळात होईल हळूहळू आताही होत असेल हे विसरता येणार नाही शिवाय दक्षिणेकडच्या जनतेचा विचारही करावा लागेल उच्च राहणीमान, जीवनावश्यक आणि चैनीच्या विविध प्रकारच्या वस्तू याना चटावलेल्या या दाक्षिणात्याना एकत्रीकरणासाठी किंवा एकत्रीकरणानतर काही तडजोडी कराव्या लागल्या, तोशिस सोसावी लागली तर त्याना मानवेल काय ? उत्तर कोरियात असताना व्यक्तिस्वातत्र्य किंवा विचारस्वातत्र्य, मतस्वातत्र्य याबद्दल बोलणारे मला कोणी आढळले नाही आता विलिनीकरणानतर काय होणार ?

दोन्ही भागाना आपापली स्वायत्तता टिकवून एकत्र आणता येईल असाही एक विचार आहे. पण मला त्यात काही तथ्य वाटत नाही या सहजीवनाला काय अर्थ राहणार ? ऑलिंपिक्समध्ये किंवा आतरराष्ट्रीय स्पर्धांत दोन्ही कोरियाचे सघ एक झाले म्हणजे सपले काय ? मला तसे वाटत नाही मुक्तपणे सबध कोरियात सचार करण्याचेच नव्हे, तर कुठेही स्थायिक होण्याचे, लहान-मोठे उद्योग सुरू करण्याचे इ सर्व प्रकारचे स्वातत्र्य सर्वांना मिळाल्याशिवाय एकत्रीकरण किंवा विलीनीकरण खऱ्या अर्थाने झाले असे म्हणता येणार नाही

No Laughing Matter या स्टीव्हन ल्यूक्स आणि इसाक गल्नूर या प्राध्यापकानी सपादित केलेले राजकीय हास्यकथाचे एक पुस्तक माझ्या वाचनात आले त्यातल्या एका हास्यकथेची मला येथे आठवण होते

एक रशियन आणि एक चिनी असे दोघेजण शाततामय सहजीवनाच्या कल्पनेबद्दल चर्चा करीत होते त्या रशियन माणसाच्या मते भाडवलशाही आणि साम्यवाद याना एकमेकाच्या सोबतीने शाततेत जगणे शक्य आहे चिनी माणसाला हे मुळीच पटले नाही.

'ठीक आहे हे कसे शक्य आहे ते मी तुला दाखवितो' असे म्हणत तो रशियन इसम त्या चिन्याला मॉस्कोमधल्या एका प्राणिसंग्रहालयात घेऊन गेला तिथे पाहतात तो एक मेंढरू आणि लांडगा याना एकाच पिंजऱ्यात ठेवलेले होते

'ज्याप्रमाणे हा लांडगा आणि हे मेंढरू ही दोघ एकत्र राहू शकतात, त्याप्रमाणेच दोन एकमेकाच्या अगदी विरुद्ध असलेल्या समाज-व्यवस्थाही एकत्र राहू शकतात ' रशियन माणूस उत्तरला

ह्या दृश्याचा त्या चिनी माणसावर चागलाच परिणाम झाला

'पण हे सगळ तुम्हाला जमत तरी कस काय ? एकाच पिंजऱ्यात लाडगा आणि मेढरू एकत्र हे अजबच झाल ' तो चिनी म्हणाला

'त्यात अजब अस काहीच नाही थोडासा मॅनेजमेंटचा भाग आहे, दुसर काही नाही आम्ही काय करतो, दररोज सकाळी एक नव मेंढरू या पिंजऱ्यात ढकलतो ' रशियनाने उत्तर दिले

उत्तर कोरियातली साम्यवादी राजवट आणि दक्षिणेतील भाडवलवादी राजवट यानी सुखसमाधानाने एकत्र नादणे याचा अर्थ वरील कथेप्रमाणेसुद्धा असू शकेल

- साराश, हा सहजीवनाचा मामला वाटतो तितका सोपा नाही

जर्मन अनुभवाच्या सदर्भात या दोन्ही कोरियातील सबधित अधिकाऱ्याना एकत्र येऊन या प्रश्नावर दीर्घ विचारविनिमय करावा लागेल दोन कोरिया एकत्र आणण्याचा प्रश्न केवळ भावनिक राहिलेला नाही

येथपर्यतचा मजकूर लिहिल्यानतर उत्तर कोरिया म्हणजे साम्यवादी कोरियाच्या मडळींनी एकत्रीकरणाचा जो 'दशाकी कार्यक्रम' आखला आहे (10 Point Programme) तो वाचला Pyongyang Times या प्याँगयाग या उत्तर कोरियाच्या राजधानीतून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकाच्या प्रती हल्ली आम्हाला, तिकडे जाऊन आलेल्या लोकाना नेहमी मिळतात त्याप्रमाणेच ही प्रत माझ्याकडे आली

सागायचा मुद्दा हा, की एकत्रीकरणाचा दशाकी कार्यक्रम मी वाचला वाचला खरा पण तो वाचून मी खूप निराश झालो खरोखरच निराश झालो याचे कारण असे की अमेरिकन (आणि जपानी) लोकाच्या कारवायामुळे अलग

पडलेले हे एकाच देशातले लोक एकत्र यावेत असे मला खरोखरच वाटते

तर सागायचे कारण हेच की, हा दशाकी कार्यक्रम आणि आपल्या पडितजींचा पचशील कार्यक्रम यात काहीही फरक नाही 'शाततामय सहजीवन' Peaceful Co-existence असा या १० मुद्याचा अर्थ आहे पडितजींसारख्या एखाद्या कविमनाला जे फार चागले वाटेल ते इतराना तसे वाटेल असे नाही त्याप्रमाणेच हा दशाकी कार्यक्रम दक्षिण कोरियातल्या लोकाना मान्य होईल की नाही हा प्रश्न आहे या कार्यक्रमाची अमलबजावणी हासुद्धा एक महत्त्वाचा यक्षप्रश्न आहे

दोन वेगवेगळ्या, परस्परविरोधी अशा विचारसरणीत गुतलेले असे हे पूर्वी एक असलेल्या देशाचे तुकडे आहेत हे खऱ्या अर्थाने परत एकत्र आणणे ही सोपी गोष्ट नाही कदाचित सध्याच्या कोणत्याही दोन शेजारी राष्ट्रात जसे परस्पराशी मैत्रीचे, देवाणघेवाणीचे सबध व्यापारी तत्त्वावर असतात त्याप्रमाणेच कोरियाच्या या उत्तर आणि दक्षिण विभागाना एकमेकाशी ठेवणे हे हितकर आणि सोईस्कर ठरणार असेल

## वादाच्या भोवऱ्यात कोरिया

अलीकडच्या काळात किमचा कोरिया आणखीच एका वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे

अमेरिकेतल्या 'न्यूजविक' साप्ताहिकातून आणि इतरत्र एक खळबळजनक बातमी प्रसिद्ध झाली (२९ एप्रिल १९९३) ती अशी की किमच्या कोरियात सहारक अण्वस्त्रनिर्मिती सुरू असून त्यामुळे जागतिक शाततेला धोका निर्माण झाला आहे अमेरिकेने एन् पी टी (Non Proliferation treaty) किंवा 'अण्वस्त्र प्रसार बदी करारा'ची कल्पना काढली. भारताने या करारावर सही करण्याचे नाकारले त्याचप्रमाणे किमच्या कोरियानेही असला करारनामा करायला नकार दिला आहे एवढेच नव्हे तर, कोणत्याही तज्ज्ञ समितीने कोरियात येऊन पाहाणी करण्यासही त्याचा विरोध आहे 'आमच्या देशात आम्ही सार्वभौम असून कोणा साम्राज्यशहाच्या मर्जीनुसार आम्ही आमची मान तुकविणार नाही' असे उत्तर कोरियन अधिकारी म्हणत आहेत विशेष म्हणजे चीनने या कोरियन पवित्र्याला पाठिंबा दिला आहे कोरियन लोक असल्या अण्वस्त्रनिर्मितीसारख्या वावग्या गोष्टी करणार नाहीत असे या चिन्याचे म्हणणे आहे

या उलट अमेरिकनानी उत्तर कोरियाच्या दक्षिण सरहद्दीवर सचलने सुरू

केली असून ती आपणास धाकदपटशा करण्याच्या दृष्टीने चालू आहेत असा वैताग उत्तर कोरियन मडळी व्यक्त करीत आहेत कोरियनाचे म्हणणे असे की, 'टीम स्पिरिट ९३' (Team Spirit 93) या गोंडस नावाखाली ही जोड सचलने (Joint military exercises) केली जात असून आमच्यासारख्या छोट्या देशावर दबाव आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

अलीकडेच मला टपालातून आलेल्या 'प्योंगयाग टाइम्स'च्या अकात तर किम जाँग इल याना कमाडर इन चीफ नेमले असून उत्तर कोरियाची सेना एकदिलाने 'साम्राज्यशाही'शी मुकाबला करायला तयार आहे अशा अर्थाचे निवेदन प्रसिद्ध झाले आहे (१३ मार्च १९९३) किम जाँग इल म्हणजे अध्यक्ष किम इल सुग याचे चिरजीव सबध राष्ट्राला युद्धासाठी तयार राहण्याचे जे आवाहन किम जाँग इल यानी केले आहे त्यात त्याचा उल्लेख Supreme Commander of the Korean People's Army असा केलेला आहे (किम जाँग इल याना कोरियाच्या साम्यवादी पक्षात महत्त्वाचे स्थान असून शासनातही आहे त्यांना 'लाडके नेते' (Dear Leader) असेही प्रेमाने म्हणण्यात येते )

एकीकडे उत्तर कोरियाला अण्वस्त्र प्रसारबदी करारावर सही करण्यासाठी मुदत वाढवून दिली असून दुसरीकडे हे सर्व त्रागडे यूनोमध्ये नेण्याचे प्रयत्न चालू आहेत. हा प्रकार आपल्या सार्वभौमत्वावर घाला आहे असे उत्तर कोरियनाचे म्हणणे आहेच, पण त्याशिवाय त्याला चिनी-रशियन शासनानी पाठिंबा व्यक्त केला आहे

आता काय होणार ? हे मोठे प्रश्नाकित विधान आहे, आणि त्याचे उत्तर आपण नॉस्ट्रडॅमस असल्याशिवाय धडपणे देऊ शकणार नाही

## लोकशाही आणि साम्यवाद

साम्यवादी कोरियासारखे चिमुकले राष्ट्र आज जगातल्या महासत्तेपुढे दड थोपटीत उभे आहे हे दृष्य वरवर पाहता मोठे रोमाचकारी वाटत असले तरी ते तसे नाही

सोव्हिएट रशियाचे सर्वसत्ताधीश मिखाइल गोर्बाचेव्ह यानी कुप्रसिद्ध पोलादी पडदा दूर सारला एवढेच नव्हे, तर 'पेरेस्त्रोयका' आणि 'ग्लास्नॉस्त' ही दोन मूलतत्त्वे आणून सोव्हिएत रशियात लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली परिणामी त्याना स्वत चे पद गमवावे लागले आणि आज ते जवळजवळ अज्ञातवासात एका सामान्य माणसाचे जीवन जगत आहेत पण एवढी जबरदस्त किंमत त्यानी

मोजली खरी, तरीही रशियाला त्यापासून शाती आणि सुख या गोष्टी मिळालेल्या नाहीत. उलट या प्रचड देशात जवळजवळ अराजक माजलेले आहे युरोप आणि आशियात अस्ताव्यस्त पसरलेल्या या देशाच्या ठिकऱ्या उडाल्या आहेत आणि त्यातला एक दुसऱ्याला विचारीत नाही अशी स्थिती आहे

पण हे सगळे झाल्यामुळे काय झाले आहे ? जगभर इतरत्र असलेले कम्युनिस्ट किंवा साम्यवादी लोक एक तर गोंधळले आहेत, किंवा घाबरले आहेत (अर्थात आपल्या भारतातल्या साम्यवादी मडळीला घाबरण्याचे काही कारण दिसत नाही ते गोंधळले असले तरी त्याना घाबरण्याचे कारणही नाही आम्ही एकदर लोकच इतके बावळट आहोत, की आमच्यासारख्या पक्षाचे इतरत्र काहीही होवो, आम्ही मेंढरासारखे आमच्या 'नेत्या'च्या मागेच जात राहणार मग ते आम्हाला खड्ड्यात का नेईनात !)

पण मला खूप विचार केल्यानतर असे वाटते, की साम्यवाद हा पूर्णपणे सपला आहे, तो यशस्वी होणे अशक्य आहे आणि लोकशाही हीच कोणत्याही प्रकारच्या राजकीय व्यवस्थेला अतिम पर्याय आहे असे अजूनही सिद्ध झालेले नाही

याचे समर्थन दोन प्रकारे करता येईल

एक तर असे म्हणता येईल, की रशियातला किवा त्याच्या प्रभावळीतल्या आणखी कोणा साम्यवादी देशातला साम्यवाद सपला म्हणजे एकदर साम्यवादाच्या विचाराला तिलाजली देण्याची वेळ आली असे झालेले नाही. निदान आज तरी असे दिसते, की सुधारित का होईना, पण एक प्रकारचा साम्यवाद, चीनसारख्या महाकाय देशात अजून जिवत आहे त्याच्या कडव्या स्वरूपात तो क्यूबा आणि उत्तर कोरियामधे जिवत आहेच

पण यापेक्षाही एक महत्त्वाचा विचार मला येथे माडायचा आहे तो असा, की लोकशाही ही एकच खरी शासनव्यवस्था अशी जी सर्वसामान्य समजूत आहे ती मुळीच बरोबर नाही

भारताचे उदाहरण घ्या

आपण म्हणतो, की भारत हा जगातला सर्वात मोठा लोकशाही देश आहे येथील लोकसख्या तुलनेने सर्वाधिक असल्यामुळे आणि तेथे लोकशाहीचा डोलारा अनेक वर्षे उभा असल्यामुळे केवळ ज्याला हा लोकशाही देश आहे असे

म्हणायचे असेल त्याने खुशाल तसे म्हणावे आता भारत हा सर्वात मोठा लोकशाही देश आहे याचे श्रेय आमचे राज्यकर्ते किंवा कोणता राजकीय पक्ष आपल्याकडे घेणार नाहीत अशी मला आशा आहे ! कारण हे श्रेय असलेच तर ते आमच्या भारतीय जनतेचे आहे आमची लोकसख्या भरमसाट आहे, एवढेच नव्हे, तर तिची वाढही फार मोठ्या प्रमाणात होत असते. येथे परवापरवापर्यंत २१ वर्षे हे मतदानास पात्र ठरण्याचे वय होते ते आता १८ वर्षे झाले आहे त्यामुळे जवळजवळ सर्वानाच मतदानाचा हक्क प्राप्त झाला आहे. पण म्हणून भारत ही खऱ्या अर्थाने किंवा चागल्या अर्थाने सर्वात मोठी लोकशाही आहे असे मुळीच नाही

'मोठी' लोकशाही म्हणजे अडाणी आणि निरक्षर बहुसख्याकाची नव्हे मोठी लोकशाही म्हणजे जाणत्या, जबाबदार लोकाची लोकशाही तशी लोकशाही आपल्याकडे आहे असे म्हणण्याचे धाडस कोणी करू शकेल, करील असे मला वाटत नाही Government of the people. for the people and by the people जनतेतले, जनतेसाठी आणि जनतेने निवडलेले शासन म्हणजे लोकशाही, अशी व्याख्या आम्ही केव्हापासून पाठ करून ठेवली आहे आपली भारतीय लोकशाही अशी आहे काय, याचा विचार करण्याची गरज आहे आपले शासन जनतेतले असेल ते एवढ्याच अर्थाने, की निवडले गेलेले सगळे आपलेच म्हणजे भारतीय आहेत आपले शासन जनतेसाठी आहे किवा असेल, असे सगळेच पक्ष म्हणत असतात पक्षाचे निवडणूक जाहीरनामे वाचायला इतके चविष्ट असतात, की या पक्षातून निवडायचे तरी कोणाला असा प्रश्न येतो. पण पक्ष एकदा गादीवर आला म्हणजे काय होते ? निवडणुकीच्या वेळी दिलेली आश्वासने सोयीस्कररीत्या विसरली जातात उदाहरणार्थ राव सरकारने १०० दिवसात महागाई हटवू असे आश्वासन दिले होते त्याचे काय झाले ? १०० दिवसातच काय, आजतागायत महागाई कमी झालेली नाही बेरोजगारी वाढावी अशी जणू काही आपली योजनाच असल्याप्रमाणे आपल्याकडे बेकारी वाढत आहे अन्न, वस्त्र, निवारा या जगण्यासाठी लागणाऱ्या गरजा आपल्या शासनाने सर्व जनतेला पुरविल्या नाहीत, मग सुविधा तर बाजूलाच राहिल्या आम्हाला स्वातत्र्य आहे पण ते बेकार असण्याचे, बेघर असण्याचे आणि भुके मरण्याचे, अशी कित्येकाची स्थिती आहे

आपले शासन जनतेने निवडलेले आहे असे म्हणणे हे साध्या शब्दात सागायचे तर एक बकवास आहे निवडणुकामध्ये ज्या प्रकारचे भ्रष्टाचार सर्रास

होत असतात, (पाहा श्री गडाख याच्यावर श्री विखे पाटील यानी केलेल्या खटल्याचा निकाल) त्याची सर्वांना कल्पना आहेच, पण अलीकडे तर या क्षेत्रातही दहशतवादही बोकाळला आहे मतपेट्या पळविणे, धाकदपटशा, खून-खराबी हे प्रकार चालू असल्याचे वाचनात येते गुन्हेगार, बदमाष अशा मडळींनी उमेदवाराच्या मागे उभे राहून सूत्रे हलविणे हा प्रकार आता जुना झाला असून गुन्हेगार, टोळीवाले असे लोकच आमदारपदावर विराजमान होत आहेत हे आपण खरोखरच निवडलेले लोक आहेत काय ? शिवाय एकदा मतदान झाले, की पाच वर्षांपर्यंत उमेदवाराला आपल्या मतदाराची आठवणही येत नाही, या दोघाचे काही सोयरसुतक राहात नाही, हे तर सर्वच जाणतात लोकशाहीमध्ये नोकरशाहीची पोलादी पकड, नोकरशहाचा भ्रष्टाचार, त्याची अरेरावी आणि स्वार्थ साधण्याचे उद्योग याचाही विचार करावा लागेल

लोकशाही आपल्याकडेच नव्हे, तर इतरत्रही अशी अपयशी झाली आहे, होत आहे असे असूनही लोकशाहीचेच गोडवे गात बसणे हे आधळे आणि आणि मूढपणाचे आहे असे म्हटले तर त्यात काय चूक ? लोकशाही हा अखेरचा शब्द म्हणून का मानायचा ? सवाल असा आहे, की लोकशाहीचे लहानमोठे प्रयोग सतत आणि सपशेल फसत असतानासुद्धा लोकशाहीचाच जप करत बसणे हा अधश्रद्धेचाच प्रकार मानावा लागेल मानवाच्या अस्तित्वाचा विचार करीत असताना अखेरचा शब्द, अतिम सत्य असे काही असूच शकत नाही

कोणी म्हणेल, की लोकशाहीबद्दल जे खरे आहे, ते साम्यवादाबद्दलही खरे आहे असेलही पण येथे नुसत्या लोकशाही किंवा साम्यवादी मूलतत्त्वाचा विचार न करता विशिष्ट देशात विशिष्ट परिस्थितीत यापैकी कोणती विचारसरणी यशस्वी ठरली किवा ठरली नाही याचा विचार केला पाहिजे

उत्तर कोरियात साम्यवादी शासन आजपावेतो तरी अयशस्वी ठरले आहे असे वाटत नाही अर्थात याचे कारण, निदान एक महत्त्वाचे करण म्हणजे स्वत किम उल सुग याचे उत्तुग आणि समाजाच्या सर्व थरात आदरणीय असलेले व्यक्तिमत्त्व किम याचा अलौकिक स्वार्थत्याग आणि त्याचे धीरोदात्त नेतृत्व यामुळे हा देश जपानी आणि अमेरिकन 'साम्राज्यशहा'च्या विध्वसक आक्रमणावर मात करून अजून नाठ मानेने उभा आहे, आणि जमेल तेवढी आर्थिक, सामाजिक प्रगती साधण्यासाठी प्रयत्नशील आहे

पण कसोटीचा काळ यापुढेच आहे किम याचे वय आज ८२ वर्षांचे

आहे वयानुसारही त्याचा उत्साह, त्याच्या गाठीभेटी, त्याचे कुशल मार्गदर्शन यात काही कसूर होत असल्याचे दिसत नाही. तरीही माणसावर असलेल्या नैसर्गिक मर्यादा आपल्याला नजरेआड करता येत नाहीत किम उल सुग याचे चिरंजीव किम जाँग इल हे त्याचे उत्तराधिकारी समजले जातात त्यानीही पक्षाची बरीच कामे केली असून, महत्त्वाच्या जबाबदाऱ्या साभाळल्या आहेत किम जाँग इल किंवा 'लाडके नेते' (Dear Leader) याच्या गळ्यात यथावकाश नेतृत्वपदाची माळ पडते की काय हे ठरावयाचे आहे. पण थोर नेत्याचा पुत्र हे वलय त्याच्या भोवती आहे. याचा त्याना फायदा होण्याची शक्यता आहे. किम नतर त्याच्या चिरंजीवाकडे सत्ता येणे हा घराणेशाहीचा प्रकार ठरू शकेल असेही काही निरीक्षकाना वाटते खरे म्हणजे पुढे नेमके काय होईल हे आताच सागणे अवघड आहे

उत्तर आणि दक्षिण कोरिया या दोन छकलाचे एकत्रीकरण ही सर्व समस्याची अखेर असे होण्याऐवजी एका नव्या गभीर समस्येची सुरुवात असेही होऊ शकेल

कोरियन माणसाबद्दल जो लेख मी मागे लिहिला तेव्हा मी त्याना 'झपाटलेली' माणसे असे म्हटले आणि कोरियाला 'झपाटलेल्या माणसाचा देश' असे म्हटले हा झपाटून काम करण्याचा गुण जपानी माणसातही दिसतो

आजच्या परिस्थितीत हा काम करण्याचा कामच करीत राहण्याचा गुण सोन्यापेक्षाही दुर्मिळ असा गुण आहे आणि या गुणाच्या आधारेच पुढे येणाऱ्या अडचणीतून आणि अडथळ्यातून हा देश मार्ग काढेल असा आशावाद बाळगण्यास जागा आहे

हे विधान समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ इ विचारवताना भाबडेपणाचे वाटण्याची शक्यता आहे पण वाढते उत्पादन, चढते राहणीमान, प्रगत आर्थिक परिस्थिती याला पर्याय नाही असे मला येथे सुचवायचे आहे तरीही अर्थात राजकारण या देशाला कुठे नेते हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्यासाठी आपापले हात एकमेकावर ठेवून वाट पाहाणे एवढेच आता आपल्या हातात राहिले आहे !

* * *

# परिशिष्ट : कोरियाचे नेते

## आधुनिक कोरियाचा शिल्पकार : किम इल सुंग

आम्हाला कोरियाच्या 'सामाजिक शास्त्रज्ञाच्या संघटनेने' कोरियाला भेट देण्यासाठी बोलाविले होते कोरियातील निरनिराळी प्रेक्षणीय स्थळे, सस्था, गावे अशा ठिकाणी आम्हाला भिरभिरी हिंडविण्यात आले एखादा विश्रातीचा अर्धापाव दिवस सोडला तर आमच्या पायाना चक्रे लागली होती

कोरियात गेल्यावर साहजिकच आम्हाला कोरियाचे अध्यक्ष किम इल सुग याची भेट व्हावी अशी इच्छा होती आम्ही खूप प्रयत्न केले पण शेवटपर्यंत या ना त्या कारणाने ही भेट होऊ शकली नाही

यामुळे आमची निराशा झाली खरी शेवटच्या निरोप समारभात अध्यक्षातर्फे आलेले ग्रथ, मानचिन्हे इत्यादीही आम्हाला देण्यात आली पण यामुळे अर्थात आमचे समाधान झाले नाही कारण दोन युद्धाच्या विध्वसातून कोरियाला बाहेर काढून त्याला मोठ्या ऐश्वर्याप्रत नेणारा हा थोर नेता आम्हाला त्याच्या अगदी राजधानीत, त्याच्यापासून काही मैल अतरावर असून आणि आम्ही सरकारी पाहुणे, शिवाय निरुपद्रवी प्राध्यापक असूनही पाहता आला नाही प्रत्यक्ष भेटून त्याला अभिवादन करता आले नाही याची रुखरुख आम्हाला वाटणे साहजिकच होते

पण ही भेट जरी झाली नाही, तरीही आम्ही ज्या ज्या ठिकाणी गेलो तिथे तिथे किम उल सुग याचा ठसा उमटलेला होता, कसली ना कसली स्मृती तिथे जागी होती बहुतेक स्मारके, ठिकाणे, कारखाने, सहकार सस्था, विद्यापीठ, शाळा किम इल सुग याच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली होती मॉंजुदे या किम याच्या

जन्म गावी गेलो तिथे त्याची स्मृती जागती, जिवत होती यात आश्चर्य नाही तसेच 'ज्यूच्ये टॉवर' या ज्यूच्ये तत्त्वज्ञानाच्या गौरवार्थ बाधलेल्या प्रचड स्मारकाच्या भेटीच्या वेळी त्याची आठवण झाली यात काही नवल नाही पण मृत योद्ध्याचे स्मारक, सास्कृतिक प्रासाद, ग्रथालयाची भव्य इमारत, हॉस्पिटल, लहानग्याकरिता केलेली खेळ-घरे सगळ्यासगळ्या ठिकाणी किम उल सुग याचा प्रभाव दिसत होताच. आम्हाला भेटणारे लहानमोठे सगळे लोक, अधिकारी, कामगार, शेतकरी किम या आपल्या थोर नेत्याविषयी अतिशय आदराने आणि भक्तिभावाने बोलत होते या सगळ्यात किमविषयी असलेला आदर व्यक्त होत आहे असे वाटले दरारा किंवा भीती नाही

किम इल सुग याचा जन्म मॉंजुदे या एका खेडेगावातल्या एका शेतकरी कुटुबात एका झोपडीवजा घरात झाला १५ एप्रिल १९१२ हा त्याचा जन्मदिन एका मोठ्या राष्ट्रीय उत्सवासारखा हा दिवस आता साजरा केला जातो

इतिहासकार असे सागतात, की किम याचे कुटुब क्राती आणि देशाचे स्वातत्र्य या चळवळीत पिढ्यान्‌पिढ्या आघाडीवर होते साहजिकच क्रातितत्त्व आणि देशप्रेम याचे बाळकडू किम याना सुरुवातीपासूनच मिळाले होते

मार्क्स आणि लेनिन याच्या क्रातितत्त्वाचा कोरियाच्या परिस्थित्यनुरूप वापर करून कोरियात क्राती घडविण्याच्या दृष्टीने काय केले पाहिजे याचा किमनी विचार केला आणि त्यातूनच 'ज्यूच्ये' या तत्त्वज्ञानाचा उदय झाला अगदी सक्षेपाने सागायचे तर ज्यूच्ये तत्त्वज्ञानाचा अर्थ असा, की माणूस हा अखिल विश्वाच्या केद्रस्थानी आहे आणि हे तत्त्व लक्षात ठेवून सर्व राजकीय आणि सामाजिक चळवळीची उभारणी केली पाहिजे

वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी किम यानी DWI म्हणजे 'Down with imperialism (किंवा साम्राज्यशाहीला खाली खेचा') ही चळवळ सुरू केली हीच उत्तर कोरियातील क्रातिकारक साम्यवादी चळवळ ठरली देशाला स्वातत्र्य मिळवून देणे, तिथे साम्यवादाची प्रतिष्ठापना करणे आणि साऱ्या जगात साम्यवाद आणण्यासाठी प्रयत्न करणे ही या चळवळीची उद्दिष्टे होती

जिलिन इथल्या माध्यमिक शाळेत शिकत असताना १९२७ ते १९२९ या काळात किमनी तरुण विद्यार्थ्यांना आपल्या क्रातिकारक सघटनेच्या ध्वजाखाली जमा केले, आणि जपानी साम्राज्यशहा व देशातले प्रतिगामी युद्धपिपासू याच्या विरुद्ध लढण्यासाठी त्याना शिक्षण देऊन तयार केले ऑगस्ट

२८, १९२७ या दिवशी 'यग कम्युनिस्ट लीग ऑफ कोरिया' ही तरुण साम्यवाद्याची सघटना स्थापन केली १९२९ ते १९३० या साली कारावासात असताना कोरियन क्राती आणि सशस्त्र सघर्ष याबद्दलची रूपरेषा तयार केली

१९३० साली चीनमधील अधिवेशनात त्यानी कोरियन राज्यक्रातीची शास्त्रशुद्ध व्याख्या देऊन तिचे विवरण केले तसेच जपानी आक्रमणापासून कोरियाची मुक्ती करण्याचा कार्यक्रमही विशद केला ३ जुलै १९३० या दिवशी त्यानी पक्षाची पहिली सघटना सुरू केली सघटनेतील तरुणाना त्यानी स्वत प्रशिक्षण दिलेले होते कोरियाच्या कामगार पक्षाचीच ही सुरुवात होय १९३० हे महत्त्वाचे वर्ष होते जुलैमध्ये त्यानी कोरियन क्राति सेनेचीही स्थापना केली या सघटनेचे त्याना अध्यक्ष करण्यात आले जपानविरुद्ध लढा पुकारून आणि त्यात कोरियनाचे नेतृत्व करून किम यानी विजय मिळविला तो ऑगस्ट १५, १९४५ या दिवशी

कोरियातील लोकसभेची ही सुरुवात होती पक्ष, राज्य, आणि सेना याची उभारणी करून क्रातीची पूर्तता करण्याचा त्यानी निश्चय केला कोरियाच्या साम्यवादी पक्षाची मध्यवर्ती सघटना समिती त्यानी १० ऑक्टोबर १९४५ साली स्थापन करून वेगवेगळ्या सामाजिक सघटनाही सुरू केल्या त्यापैकी उत्तर कोरियातील कामगार सघटनाचे केंद्रीय मडळ ही एक महत्त्वाची सघटना होती अशा रीतीने त्यानी आपल्या कार्यात बहुसख्य जनतेला सामील करून घेतले

१८ फेब्रुवारी १९४६ रोजी एक लोकसमिती तयार झाली आणि किमना तिचे अध्यक्ष नेमण्यात आले कामगार आणि शेतकरी याच्या एकोप्यावर आधारलेली ही समिती म्हणजेच प्रजेचे शासन होते हे शासन साम्राज्यशाहीला व प्रतिगामी वृत्तींना विरोध करणारे व प्रजेची सत्ता गाजविणारे असे लोकशाही स्वरूपाचे शासन होते अगदी थोड्या कालावधीत किम यानी शेतीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या आणि उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केले येथून पुढे समाजवादी क्राती घडवून आणण्याच्या कार्यात त्यानी लोकाना प्रवृत्त केले

कोरियन प्रजासत्ताकाचे प्रमुख म्हणून फेब्रुवारी १९४७ साली त्याची निवड झाली त्यानतर त्यानी कोरियन जनतेची कायम स्वरूपाची सेना उभारली, (फेब्रु १९४८) ९ सप्टेंबर १९४८ रोजी कोरियाच्या लोकशाही प्रजासत्ताकाची (Democratic People's Republic of Korea - DPRK) स्थापना झाली आणि किम याना त्याचे पतप्रधान आणि राष्ट्रप्रमुख नेमण्यात आले

कोरियाचे सेनाप्रमुख म्हणून बरीच वर्षे किमनी स्वातंत्र्यसग्राम चालविला आणि अमेरिका व इतर राष्ट्राविरुद्ध देशाला विजय मिळवून दिला

जपान आणि अमेरिका व इतर राष्ट्रे याच्या विरुद्धच्या युद्धात किमच्या नेतृत्वाखाली कोरियनानी जय मिळविला हे महत्त्वाचे आहे त्यावरून किम याचे असामान्य सघटनाकौशल्य आणि समर्थ नेतृत्व याचे दर्शन घडतेच, पण या युद्धानतरच्या काळातही देशाचे नेतृत्व करून किम यानी देशाला प्रगतिपथावर नेले आणि आजतागायत ते देशाच्या नेतृत्वाची धुरा समर्थपणे साभाळीत आहेत. हे त्याच्या युद्धनेतृत्वापेक्षाही अधिक महत्त्वाचे आणि मोलाचे आहे

१९५५ च्या एप्रिलमध्ये देशाचा विकास घडवून आणण्याची जी योजना किमने तयार केली तीमध्ये जड उद्योगाचा (heavy industries) विकास आणि त्याबरोबर छोटे उद्योग आणि शेती याचा विकास यासबधीही योजना व कार्यक्रम तयार केले कोरियाच्या उत्तर भागात समाजवादाचा पाया घालून तो मजबूत करणे हे त्याचे उद्दिष्ट होते.

शेतीमध्ये त्यानी सहकाराला उत्तेजन दिले खेड्यातील हस्तोद्योग, भाडवली उद्योग आणि व्यापार या सर्वच क्षेत्रात किम यानी विकास घडवून आणला चॉलिमा ही प्रगतीची देवता आहे. या देवतेच्या नावाने किमनी प्रगतीचा वेग वाढविला सप्तवार्षिक योजना तयार केल्या

वैचारिक, तात्रिक आणि सास्कृतिक क्राति घडवून आणण्यासाठी किम प्रयत्नशील राहिले १९६१ सालापासून उद्योगामध्ये अद्ययावतता आणण्यासाठी त्यानी आग्रह धरला

देशाच्या सीमा असुरक्षित ठेवून चालणार नाही हे लक्षात घेऊन त्यानी देशसरक्षणासाठी आधुनिक शस्त्रास्त्रानी सज्ज अशी सेना तयार केली

देशासाठी समाजवादी तत्त्वावरून राज्यघटना तयार करून ती त्यानी मजूर करून घेतली देशातील शिक्षणालाही त्यानी महत्त्वाचे स्थान दिले तसेच समाजवादी शिक्षणावरही त्यानी प्रबध तयार केला (सप्टें १९७०) कोरियात एकसधता आणून त्याची प्रगती घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या शिक्षणव्यवस्थेची सविस्तर चर्चा या प्रबधात केलेली आहे

डिसेंबर १९७७ मध्ये किमनी ज्यूच्ये तत्त्वावर आधारलेल्या समाजरचनेतून समाजवादी आर्थिक क्राती घडवून आणण्याचे धोरण देशापुढे ठेवले

आणि त्याबरोबरच दुसऱ्या सप्तवार्षिक योजनेची दीर्घकालीन उद्दिष्टे जनतेपुढे माडली आधुनिकता आणि शास्त्रीय पाया या दोन्ही तत्त्वाना त्यानी विशेष महत्त्व दिले

१९७२ साली दुभगलेल्या राष्ट्राचे पुनश्च एकीकरण करण्याच्या दृष्टीने स्वातत्र्य, शाततापूर्ण एकीकरण, आणि राष्ट्रीय एकात्मता या तत्त्वाचा पुरस्कार किमनी केला आणि दोन्ही कोरियाचे 'फेडरल' (Federal) तत्त्वावर एकीकरण करावे असा प्रस्ताव माडला स्वातत्र्य, शाती आणि मित्रभाव हे कोरियाचे आतरराष्ट्रीय धोरण असेल असे त्यानी जाहीर केले.

जगातल्या साम्यवादी देशानी एकत्र यावे, साम्यवादाची जागतिक चळवळ पुढे चालावी असा किम याचा सतत प्रयत्न आहे जगात सहकार्य आणि मित्रता वाढावी अशी त्याची इच्छा आहे

किम इल सुग याच्या लेखनाचे एकदर ३८ खड आहेत त्यात १९३० ते १९८४ या वर्षात झालेल्या लेखनाचा समावेश आहे त्याच्या निवडक लेखनाचा सग्रह ९ खडात केलेला आहे या ग्रथातून राष्ट्रीय मुक्ती (liberation) वैयक्तिक मुक्ती, वर्गमुक्ती आणि मानवमुक्ती या विचाराचे स्पष्टीकरण दिले असून लोकशाहीप्रधान आणि समाजवादी क्रातीचे तत्त्वज्ञान, तिचे धोरण आणि तत्र याचे विवेचन केलेले आहे

पक्षातील सर्वात मोठी जबाबदारीची पदे त्यानी वर्षानुवर्षे साभाळली हेत त्याबद्दल त्याचा सर्वोच्च सन्मान म्हणजे १९९२ साली त्याना 'कोरियाचे श्रेष्ठ जनरल' (Generalissimo of the DPRK) म्हणून गौरविण्यात आले ज त्याना अनेकानेक पदव्या, सन्मान इ. देऊन अलकृत करण्यात आले

## किम इल सुंग = कोरिया

अल्प चरित्रावरून असे दिसते, की वयाच्या अवघ्या चवदाव्या वर्षी को स्वातत्र्य सग्रामात उडी घेतल्यापासून किम इल सुग यानी मागे पाहिले त्यानी सुरुवातीलाच तुरुगवास भोगला, मग शेकडो मैल पायी तुडवत ये जाऊन क्रातिशिक्षणाचे धडे घेतले आणि परत कोरियात येऊन देशाच्या मुक्तीसाठी आधी आणि नतर त्याच्या सरक्षणार्थ आणि प्रगतीसाठी आपली सगळी हयात वेचली देशासाठी इतक्या अलौकिक त्याग केलेला आणि सतत करीत राहीलेला परिपक्व नेता आजच्या जगात कुठेही हयात नाही

क्रिम आज ८२ वर्षाचे आहेत. त्यांना कौटुंबिक जीवन असे काही फारसे लाभलेले नाही क्रांतिकार्यात त्यांच्या बरोबरीने लढलेली त्यांची पत्नी ऐन तारुण्यात कालवश झाली तेव्हापासून त्यांचे वैयक्तिक जीवन हे जवळजवळ एकाकी आणि न संपणाऱ्या वाळवंटासारखे झाले असेल. पण या विलक्षण माणसाने देशालाच आपले कुटुंब मानले आहे आणि त्याच्या विवंचनेतच त्यांची कालक्रमणा होत आहे

पण देशाचे प्रश्न कधीही संपत नाहीत जुने न सुटलेले राहतातच, पण त्यापेक्षाही नवनवे निर्माण होत राहतात. आता एकत्रीकरणाची समस्या आहे त्यापेक्षाही तात्कालिक म्हणजे अण्वस्त्रबंदी कराराची समस्या आहे

या गहन समस्यातून हा असामान्य नेता आपल्या देशाला धोरणीपणाने कसा बाहेर काढतो याकडे आज साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे

REFBK-0027237

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८५८
ग्रंथ. शाखा